
निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

## निजामपूर-जैताणे
## ता. साक्री जि. धुळे

* नॅक प्रमाणित *



# ज्ञानदीप

वार्षिक नियतकालिक - २०१८-२०१९

# आदर्श कला महाविद्यालय

**निजामपूर - जैताणे ता. साक्री जि. धुळे**

*** नॅक पुर्नप्रमाणित ***

# ज्ञानदिप

**वार्षिक नियतकालिक**

**२०१८-१९**

**संपादक**

**डॉ. विजय जी. गुरव**

**सदस्य**

**प्रा. प्रविण बी. मोरे**

**सदस्य**

**प्रा. अजबराव रा. इंगळे**

**सदस्य**

**डॉ. प्रियंका पी. सुलाखे**

प्रकाशन स्थळ :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

प्रकाशन काळ :- वार्षिक

प्रकाशक :- प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

संपादक :- डॉ. विजय गजानन गुरव

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

मुद्रक :- ऋद्र क्रिएशन्स,
माणिक चौक, शिरीष कुमार स्मारक समोर,
नंदुरबार ता.जि. नंदुरबार. मो. ९८२३७२४७०५

(सदर अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | अध्यक्ष |
| २) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, वरीष्ठ महाविद्यालय |
| ३) | मा.भाईसो. श्री. सुहास विष्णूदास शाह | - | उपाध्यक्ष |
| ४) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, शालेय समिती |
| ५) | मा.दादासो. श्री. बारीक यादव पगारे | - | सदस्य |
| ६) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | खजिनदार |
| ७) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सचिव |
| ८) | मा.भाईसो. श्री. किशोर शांतिलाल शाह | - | सहसचिव |
| ९) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| १०) | मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ११) | मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी | - | सदस्य |
| १२) | मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे | - | सदस्य |

# आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे

## ❁ सन्माननीय सदस्य ❁

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.बाबासाो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष |
| २) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | सदस्य |
| ३) | मा.भाईसाो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सदस्य |
| ४) | मा.नानासाो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ५) | मा.भाईसाो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | सदस्य |
| ६) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| ७) | मा.प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार | - | सचिव |

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

❊ नॅक पुर्नप्रमाणित ❊

**❊ आमचे श्रद्धास्थान ❊**

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



## मा.काकासो.श्री. दशरथ नारायण पाटील

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

* नॅक पुर्नप्रमाणित *

*** आमचे प्रेरणास्थान ***

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे



**मा.बाबासो.ॲड.श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

❋ नॅक पुर्नप्रमाणित ❋



प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननिय पदाधिकारी

## निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय
सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

उपाध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.भाईसो. श्री. सुहास विष्णुदास शाह**

अध्यक्ष, शालेय समिती निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. बारीक**
**यादव पगारे**

खजिनदार निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.नानासो. श्री. दत्तात्रय**
**जगन्नाथ वाणी**

सचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. नितीनकुमार**
**मणिलाल शाह**

सहसचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. किशोर**
**शांतीलाल शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे**

# महाविद्यालय विकास समिती सदस्य



डॉ. सुधाकर लो. जाधव
(सदस्य)



डॉ. रविन्द्र पो. ठाकरे
(सदस्य)



प्रा. कांतीलाल दा. सोनवणे
(सदस्य)



डॉ. विजय ग. गुरव
(सदस्य)



श्री. अशोक द. खैरनार
(सदस्य)



प्रा. आतिश मेश्राम
(सदस्य)



डॉ. प्रियंका पी. सुलाखे
(सदस्य)



सौ. छाया बळीराम अहिरे
(सदस्य)

# प्राचार्यांचे मनोगत

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा **"ज्ञानदीप"** नियतकालिक अंक आपल्या हाती सुपूर्त करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये एफ.वाय.बी.ए. वर्गासाठी Choice Based Credit System सुरु करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी "Global Leadership and Presentation Skills" या विषयावर विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात तसेच महिला सशक्तीकरणासाठी महाविद्यालयीन युवतींसाठी "युवती व्यक्तीमत्व विकास" या विषयावर विद्यापीठस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्राध्यापकांच्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी या उद्देशाने "Women Empowerment and Gender Equality" या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान मिळावे यासाठी विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमणध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या दृष्टीकोनातून "सांस्कृतिक कार्यक्रम" व "युवारंग" सारखे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवने महाविद्यालयाला Academic Audit मध्ये 'A' Grade बहाल केले. याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.

ज्ञानाबरोबर श्रमाचे महत्त्व रूजावे म्हणून आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०० तास स्वच्छता मोहीम यशस्वीतेने राबविली व समाजसेवेचा वसा घेतला. विद्यार्थ्यांमधील साहित्यिक विकसीत व्हावेत, त्यांना लेखनाची आवड निर्माण व्हावी, त्यांची सृजनशीलता जपावी यासाठी **"ज्ञानदीप"** चा अंक प्रकाशित केला जातो. त्यात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता, कथा, वैचारिक लेख व संकलित लेख यांचा समावेश आहे. विद्यार्थी लेखकांचे अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा. **"ज्ञानदीप"** तयार करतांना मा. व्यवस्थापन मंडळ नि.जै. शिक्षण प्रसारक मंडळ आदर्श कला महाविद्यालय व्यवस्थापन समितीची प्रेरणा व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक बंधू-भगिनींचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.

धन्यवाद!

**प्रा.डॉ.अशोक पी. खैरनार**
प्राचार्य
आदर्श कला महाविद्यालय
निजामपूर-जैताणे

*****

# संपादकीय....

प्रिय वाचक मित्र हो,

सन २०१८-१९ चा वार्षिक **"ज्ञानदीप"** नियतकालीकाचा अंक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. या अंकात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व इत्यादी घटकांनी लिहिलेले लेख, संपादित लेख, कथा, कविता, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे व त्यांच्या कार्याचे प्रतिबिंब प्रकट झालेले दिसेल. हा अंक म्हणजे आमच्या महाविद्यालयाचे दर्शन घडविणारा आरसाच होय.

निजामपूर-जैताणे शिक्षण मंडळ संचलित आदर्श कला महाविद्यालय ग्रामिण भागात व माळमाथा परिसरात उच्च शिक्षणाचे बीजारोपण करणारे व या भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास करणारे महाविद्यालय आहे. या अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगात असलेल्या सुप्त लेखकाला जागृत करण्याचा प्रयत्न आम्ही करीत असतो.

आमचे महाविद्यालय शिक्षण, क्रिडा, संशोधन आणि सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी सर्व बाबतीत आपली क्षमता सिध्द करण्याचा प्रयत्न करीत आहे. महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी नवरात्र व्याख्यान मालेचे आयोजन केले जाते. वेगवेगळया क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक बोलावून विद्यार्थी व गावातील नागरिकांमध्ये जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न महाविद्यालयाच्या वतीने केला जातो. विद्यार्थीनीसाठी सात दिवसांचे "स्वयंसिध्दा" कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. आमच्या महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या चिकित्सक बुद्धीचा विकास करणे, ज्ञानाचा विकास करणे, नितीमत्ता जोपासणे तसेच विविध क्षेत्रातील कलागुण आत्मसात करून चौफेर विकासावर पुरेपुर भर देण्याचा प्रयत्न केला जातो. ज्ञानदानाच्या रुपाने विद्यार्थ्यांना आपले जीवन फुलविण्याची अभूतपूर्व संधी उपलब्ध करुन देणारे, भविष्यची स्वप्ने पाहायला, जगायला आणि साकार करायला प्रेरणा देणारे हे महाविद्यालय आहे.

या महाविद्यालयात शैक्षणिक, क्रिडा, वक्तृत्व, वादविवाद इ. क्षेत्रात नैपुण्य मिळविणारे विद्यार्थी जसे आहेत तसेच विविध क्षेत्रात संशोधन करुन यश मिळविणारे प्राध्यापक, संशोधन कार्यासाठी प्रेरणा देणारे आणि गती देणारे मार्गदर्शक, महाविद्यालयाचा विकास साधणारे प्राचार्य, ग्रामिण भागात शिक्षणाचे रोप लावणारे अध्यक्ष व जीव ओतून काम करणारे कर्मचारी वृंद आणि महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी व सामाजिक विकासासाठी तन-मन-धनाने झिजणारी आमची व्यवस्थापन समिती. या सर्वांच्या विविध यशाची यशोगाथा म्हणजे आमच्या महाविद्यालयाचा **"ज्ञानदीप"** अंक होय.

सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात आमचे ग्रामीण भागातील महाविद्यालय अगदी अग्रेसर मानले जाते. विविध उपक्रमांतर्गत उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल आमच्या महाविद्यालयास व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय तसेच महाविद्यालयीन स्तरावर विविध पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

आमच्या या सर्व कार्याला प्रेरणा देणारे महाविद्यालयाचे अध्यक्ष आदरणीय ॲड. बाबासाहेब शरदचंद्र शाह  व व्यवस्थापन मंडळ होय. त्यांच्याच प्रेरणेने, सहकार्याने आणि मार्गदर्शनाने हे सर्व साध्य झाले आहे. मा.प्राचार्य, प्राध्यापक बंधु, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु यांचेही बहुमोल सहकार्य लाभले. तसेच संपादक मंडळातील सर्व सहकारी, विद्यार्थी लेखक या अंकाचे प्रिंटींग करणारे, सजावट करणारे तसेच प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्वांचे ऋण स्विकारुन आणि या अंकात ज्या काही उणीवा असतील त्या माझ्या मर्यादा समजुन अंकाचा स्विकार करावा व प्रतिक्रिया कळवाव्यात अशी विनंती करतो.

धन्यवाद!

**डॉ. विजय ग. गुरव**
सहाय्यक प्राध्यापक
आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर जैताणे

*****

# ❁ अंतरंग ❁


- **वस्तु आणि सेवा कर -** कु. सुवर्णा पांडूरंग इंगळे
- **संभाजी व पोर्तुगीज -** कु. प्रियंका खुमा वळवी
- **पर्यावरण संतुलन प्रदुषणाच्या विळख्यात -** राकेश गोरख ठाकरे
- **जलाशयातील पाण्याचे नैसर्गिक शुद्धीकरण (विज्ञानकथा) -** कु. ठाकरे प्रिया भगवान
- **प्लास्टीक प्रदुषण एक शाप -** कु. राणे गायत्री अनिल
- **शेतकरी महिलांची परवड -** समाधान अनिल महिरे
- **दवंडी ते ट्विट -** हेमंत बापु वाघ
- **युद्ध -** कु. संगिता दगडू मोहने
- **छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांतीविषयी विचार -** कु. वळवी प्रियंका खुमा
- **स्त्री सबलीकरण -** सुनिता फोना पाडवी
- **स्त्री-वादापुढील आव्हाने -** वसावे रविता किर्ती
- **घटकराज्यांतर्गत राजकारणातील बदलते प्रवाह आणि भारतातील लोकशाही -** सुवर्णा पांडूरंग इंगळे
- **शेतकऱ्याची आत्महत्या : कारणे आणि उपाययोजना -** काळू कोंडू वाकसे
- **पर्यावरणास घातक प्लास्टिक -** कु. वाघ राधिका संजय
- **राष्ट्रनिर्मिती व चारित्र्यसंवर्धन -** कु. दक्षता पवार
- **प्लास्टिक बंदी काळाची गरज -** कु. जाधव अश्विनी अविनाश
- **Feminist Perspectives in Maya Angelou's Poetry -** Shaikh Misbah Sabir


## <u>अहवाल विभाग</u>


- **विद्यार्थी विकास अहवाल**
- **राष्ट्रीय सेवा योजना अहवाल**
- **Revised Assessment and Accreditation Framework of NAAC**
- **स्वयंसिद्धा अभियान अहवाल**
- **सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल**
- **चर्चासत्राचा अहवाल**
- **चौथा आंतरराष्ट्रीय योगा दिवस अहवाल**
- **परीक्षा अहवाल - शै.वर्ष २०१७-१८**
- **रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर अहवाल**
- **राष्ट्रीय क्रीडा दिन अहवाल**

- **आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धा**
- **इंग्रजी विभाग अहवाल**
- **समाजशास्त्र विभाग अहवाल**
- **संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग अहवाल**
- **इतिहास विभाग अहवाल**
- **ग्रंथालय विभाग अहवाल**
- **वैयक्तिक अहवाल -** प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. अजयबराव इंगळे
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा.डॉ. विजय ग. गुरव
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. कांतीलाल डी. सोनवणे
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. प्रविण बाबुराव मोरे
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. प्रणव गरूड
- **आर्थिक दुर्बल घटक योजना**
- **वार्षिक निकाल**
- **विविध शैक्षणिक समित्या**
- **प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यादी**

## भावपूर्ण श्रध्दांजली

परमेश्वर मृताच्या आत्म्यास चिरशांती देवो, हिच प्रभुचरणी प्रार्थना!



**कै.प्रा. मदनसिंग सुपडूसिंग राठोड**

(सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग)

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे

# वस्तु आणि सेवा कर




दिनांक १ एप्रिल १९१७ पासून देशभरात समान करपद्धती लागु झालेली आहे. स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी करसुधारणा आहे. नेमके जीएसटी काय आहे, हे अजूनसुद्धा बऱ्याच लोकांना माहिती नाही. मित्रांनो जीएसटी चा अर्थच असा आहे की, देशभरात एकच करप्रणाली असावी. सरर्व प्रकारच्या वस्तु आणि सेवांसाठी एकच करपद्धती लागु झालेली आहे आणि असेही या विधेयकाचे उदात्त स्वरूप आहे. पूर्वी केंद्र राज्य सरकारांचे २० हून अधिक कर करदात्याला भरावे लागत होते. जीएसटी लागु झाल्यापासून या सगळ्या करांची जागा फक्त एकच कराने घेतलेले आहे. तो म्हणजे जीएसटी. जीएसटी लागू झाल्यावर वस्तु आणि सेवांवर लागणारे बाकी सगळे कर रद्द झालेले आहेत. 'वन नेशन वन टॅक्स' या संकल्पनेवर जीएसटी आधारित आहे. गुडस् ॲण्ड टॅक्स नेटवर्क म्हणजे जीएसटी. ही एक बिगर सरकारी नॉन प्रॉफिट संस्था आहे. या संस्थेकडे जीएसटीएन पुरवणार आहे. जीएसटीचे रजिस्ट्रेशन टर्न फाईल करणे इत्यादी महत्त्वाची कामे जीएसटीएन करीत आहे.

- **वस्तु व सेवा कर -**

१) देशात वस्तु व सेवाकर अर्था जीएसटी लागू झाली आहे.

२) राज्याराज्यांतील वस्तु व सेवा यांचा पुरवठा व आयातीवर एकत्रित जीएसटी लावण्याचा अधिकार केंद्राकडे आहे. राज्य व केंद्राला जीएसटीबाबत कायदे करण्याचा अधिकार आहे.

३) दारू तसेच पाच पेट्रोलियम उत्पादनावर सध्या जीएसटी लागु आहे.

४) जीएसटी लागु झाल्यानंतर एखाद्या राज्याला नुकसान झाले तर पाच वर्षे केंद्राकडून भरपाई केली जात असते.

भारतामध्ये १ जुलै २०१७ पासूनच कर लागू करण्यात आला. देशभरात एकसमान करप्रणाली असावी असा उद्देश होता. त्यानुसार केंद्र आणि राज्य सरकारद्वारे त्यापूर्वी लागु असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द केले आणि ही करप्रणाली भारतात लागु केली आहे. जीएसटी लागु करण्याच्या अगोदर ३० जून २०१७ च्या रात्री संसदेचे विशेष अधिवेशन झाले होते आणि त्यात राष्ट्रपतींना मध्यरात्रीच्या सुमारास जीएसटी लागु झाली, अशी घोषणा केली होती. जीएसटी अंतर्गत १ जुलै २०१७ पासून ०%, ५%, १२%, १८% व २८% असे कर दर ठरविण्यात आले आहेत. जीएसटी म्हणजे वस्तु व सेवा कर असून तो वस्तु किंवा सेवांवर हा एकच कर यापुढे लागु आहे. अनेक विकसित देशात याच पद्धतीची करप्रणाली अस्तित्वात आहे. त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आलेली आहे. संपूर्ण देशामध्ये एक समान अप्रत्यक्ष कराची पद्धती असावी म्हणून वस्तु व सेवा कर प्रणालीचा म्हणजे जीएसटी प्रणालीचा म्हणजेच जीएसटीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र व राज्य सरकार यांच्या चर्चेअंती घेण्यात आलेला आहे. केंद्राचा जीएसटी आणि राज्यांचा जीएसटी स्वतंत्र आहे. केंद्र आणि राज्य यांचे संबंध भडक आहेत.

**जीएसटीएन मध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा किती वाटा आहे, हे समजून घेऊया.**

जीएसटीएन मध्ये केंद्र सरकारचा २४.५ टक्के वाटा आहे. तर राज्य सरकार आणि राज्यांच्या फायन्स

कमिट्यांचा २४.५ टक्के वाटा आहे. ICICI आणि HDFC सारख्या बँकांचा १०-१० टक्के वाटा आहे. तर एनएसई स्ट्रेटिजक इनव्हेस्टमेंट कंपनीचा ११ टक्के आणि एलआयसीचा १० टक्के वाटा आहे.

सेंट्रल एक्साइज ड्युटी (केंद्रीय उत्पादन शुल्क), सर्व्हिस टॅक्स (सेवा कर), ॲडिशनल कस्टम ड्युटी, स्पेशल ॲडिशनल ड्युटी ऑफ कस्टम (एसएडी), व्हॅल्यु ॲडेड टॅक्स (VAT), पर्चेस टॅक्स, लग्झरी टॅक्स कायमचे बंद झाले आहेत. या सगळ्यांच्या जागी एकच गुड्स ॲण्ड सर्व्हीसेस टॅक्स लागले.

- **जीएसटीचे फायदे खालील प्रमाणे आहेत -**

१) जीएसटी विधेयक पारदर्शक असून कायद्यात रूपांतरीत झाल्यावर अप्रत्यक्ष करांची आता कुठलीही व्यवस्था असणार नाही. म्हणजेच अप्रत्यक्ष कर शून्यावर येतो. विक्रीच्या इनव्हॉईसवर म्हणजे वस्तु विशेषणावर वस्तु सेवाकरांची नोंद असेल. म्हणजे ग्राहकाने दिलेला कर कशासाठी दिलेला आहे, कोणत्या सेवेसाठी दिलेला आहे, की वस्तु खरेदीसाठी दिलेला आहे, तो नक्की किती दिला आहे, वस्तुंची मुळ किंमत किती आणि वस्तु सेवाकर किती याचा पूर्ण तपशील स्पष्टपणे समजेल, अशी पारदर्शकता या विधेयकात आहे.

२) नोंदणीकृत व्यापारांना जीएसटी ची वेगळी किंमत मोजावी लागणार नाही. त्यामुळे छुपे कर दडून राहणार नाहीत. व्यवसाय करण्याचा खर्च कमी होईल.

३) केंद्र सरकारची प्रामुख्याने प्राप्तीची दोन साधने होती. त्यात एक प्राप्तीकर आणि दुसरा पेट्रोल-डिझेल कर आता या करात वैचित्र्य राहणार आहे.

४) जीएसटी प्रमाणालीत उत्पादन क्षेत्र व सेवा यांच्यात कराचा बोजा समान वाटला जाईल. कराचा पाया विस्तारित करून तसेच सवलती कमी करून हे साध्य करता येईल, असे विधेयकाच्या मूळ प्रारूपात सांगण्यात आले आहे.

५) केंद्राचा वस्तु - सेवा कर आणि राज्यांचा वस्तु - सेवा कर यांच्यावर उत्पादन खर्चावर कर लावला जाईल आणि विक्रीच्या ठिकाणी तो वसूल केला जाईल. त्यामुळे कंपन्यांचा पाया विस्तारला जाईल, असेही सांगण्यात येत आहे.

६) जकात, केंद्रीय विक्री कर, राज्याचा विक्रीकर, प्रवेशकर, परवाना शुल्क, उलाढाल कर असे विविध कर आता यापुढे संपुष्टात आलेले आहे. व्यवसाय करणे उद्योजकाला जास्त सोपे झाले आहे.

७) ज्या वस्तु व सेवांवर सध्या ३० ते ४० टक्के कर आहे. त्या स्वस्त झाल्यात कारण वस्तु - सेवाकरांची मर्यादा आता जास्तीत जास्त १८ टक्के ठेवण्यात आली आहे. असे सांगितले जात आहे की, या वस्तु सेवाकरांमुळे वाहने स्वस्त होतील.

- **जीएसटीचे तोटे खालीलप्रमाणे -**

१) वस्तु - सेवाकरात १८ टक्क्यांची मर्यादा घालण्याचे ठरवलेले आहे. पण ती मर्यादा वाढणार नाही. (shall not) असे आश्वासन देण्यात आलेले नाही. त्यामुळे ही करमर्यादा वाढू शकते. सध्या ज्या वस्तु आणि सेवांवर १८ टक्क्यांपेक्षा कमी कर आहेत. त्या वस्तुंना विधेयक कायद्यात रूपांतरित झाल्यापासून लगेच १८ टक्क्यांवर नेण्यात येईल. म्हणजे समजा सिनेमाच्या तिकिटावरील कर ६ टक्के आहे. तो १८ टक्के होऊ शकतो. हॉटेलातील खाणे महाग होईल. सध्या हॉटेलच्या वस्तुंवरील सेवा कर १२ टक्के आहे. तो लगेच १८ टक्के होईल. म्हणजे खाद्य पदार्थांच्या किंमती भडकतील.

२) केंद्र आणि राज्य यांचे संबंध भडकू शकतील. केंद्राचा जीएसटी आणि राज्याचा जीएसटी स्वतंत्र असेल. अशी तरतुद आहे. पण त्यातील जमा होणारा महसूल राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत त्यातून नाहीसा होईल. उदा.. महापालिकेची जकात रद्द होईल. आता त्या जागेवर महापालिकेच्या उत्पन्नाची दुसरी

व्यवस्था काय? याचे भयानक परिणाम म्हणजे महापालिका भिकारी होईल. राज्य सरकार किंवा केंद्र सरकारला जकात कराच्या उत्पन्नाची दुसरी व्यवस्था वेगळी करून द्यावी लागेल. विकासकामांना पैसा उपलब्ध होणार नाही. त्याहीपेक्षा भयानक म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना पगार देणेही सरकारला शक्य होणार नाही. राज्याची किंमतच शून्य होऊन जाईल. संघराज्य पद्धतीचा हा मोठा धोका आहे.

३) रिअल इस्टेट क्षेत्राला मोठा फटका बसेल. नव्या घरांच्या किंमती ८ टक्क्यांनी वाढतील. सध्याच फक्त मुंबईत दीड लाख फ्लॅट पडून आहेत. ते आणखीन महाग होतील आणि त्या फ्लॅटचा खरेदीदार मिळणे आणखी अवघड होईल. बिल्डर अडचणीत आले तर मजुरांपासून तंत्रज्ञानापर्यंत बेकारी वाढेल.

४) देशातील किमान १६ राज्यांनी या वस्तु - सेवाकर विधेयकावर मंजुरी दिली पाहिजे. तरच हे विधेयक कायद्यात रूपांतरित होईल. आसाम सरकारने ते अगोदर मंजूर केलेले आहे. महाराष्ट्र, गोवा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात, हरियाणा या राज्यांत भाजपाची सत्ता असल्यामुळे तिथे हे विधेयक मंजूर होईल. मात्र १६ राज्यांचा पाठिंबा अवघड आहे.


**कु. सुवर्णा पांडूरंग इंगळे**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## संभाजी व पोर्तुगीज

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर पन्हाळ्याला असतानाच संभाजीने पोर्तुगीजांशी सलोखा प्रस्थापित करण्यासाठी रामोजी नाईक ठाकूर या वकीलाकरवी पत्र पाठविले. त्यानंतर १६८१ च्या मे महिन्यात संभाजी डिचोलीला गेला असताना पोर्तुगीज गव्हर्नरने तहाची निकड लावली. त्याप्रमाणे येसाजी गंभीरराव नावाच्या वकीलास संभाजीने गोव्यास पाठविले. तो बरेच दिवस गोव्याला होता.



१६८२ मध्ये संभाजीने कारवार जवळील अंजदीव हे बेट ताब्यात घेऊन तेथे किल्ला बांधण्याची तयारी सुरू केली. हे बेट मराठ्यांच्या ताब्यात जाणे गोवेकर पोर्तुगीजांना धोक्याचे वाटले. त्यामुळे अंजदीववर आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे या दृष्टिने पोर्तुगीजांनी प्रयत्न सुरू केले. या सुमारास संभाजीने अरबांशीही संधान बांधले होते. अरब हे पोर्तुगीजांचे शत्रू असल्यामुळे संभाजीचे हे राजकारण गोवेकरांना पसंत पडले नाही. तेव्हा संभाजीला विरोध करण्याचे ठरवून ५ मे १६८२ रोजी पोर्तुगीजांनी अंजदीव बेट ताब्यात घेतले. एवढेच नव्हे तर येथे किल्लाही बांधला. मात्र या घटनेने संभाजी व पोर्तुगीज यांचे संबंध बिघडू शकले नाहीत. उलट डिचोली आणि कुडाळ यांच्या परिसरात दारूच्या कारखान्यासाठी लागणारी आवश्यक साधन सामुग्री समुद्र मार्गे नेण्यास पोर्तुगीजांनी संभाजीला परवानगी दिली.

मार्च १६८२ मध्ये दक्षिणेत उतरल्यावर औरंगजेबाने शेख महंमद नावाचा आपला वकील गोव्याला पाठविला. पोर्तुगीजांनी संभाजी विरोधी मदत करावी असा प्रस्ताव या वकीलाने गोव्याच्या विजरई समोर (व्हाइसरॉय) मांडला. परंतु मराठ्यांविरूद्ध मोगलांना मदत करण्याचे विजरईने वरकरणी साफ नाकारले. त्यानंतर शेख महंमद परत गेल्यावर विजरईने (याचे नाव कोंदि द आल्व्होर) औरंगजेबाला पत्र

पाठवून आपला पाठिंबा व्यक्त केला आणि संभाजीचा पराभव झाल्यावर दक्षिण कोकणचा भाग पोर्तुगीजांना द्यावा असे कळविले. यावरून पोर्तुगीजांच्या दुटप्पी वर्तनाची कल्पना येण्यासारखी आहे. गोव्याच्या विजरईने आपल्या मुलुखातून दक्षिण कोकणात जाण्यासाठी मोगलांना परवानगीही दिली. या कारणामुळे पोर्तुगीज व संभाजी यांच्यातील सलोखा पार संपुष्टात आला.

विजरई कोंदि द आल्व्होर याने तर संभाजी विरूद्ध एक कटच रचलेला होता. १६८३ च्या ऑगस्टमध्ये (श्रावण महिन्यात) गोकुळअष्टमीच्या जत्रेसाठी नारवे या गावी संभाजी येणार असल्याचे समजताच दगाबाजी करून त्याला पकडण्याचा घाट विजरईने घातला. पण त्याचा बेत तडीस जाऊ शकला नाही. बहुधा संभाजी नारव्याला आलाच नसावा. या सुमारास मराठ्यांनी रेवदंडा किल्ल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोर्तुगीजांनी तो उधळून लावला. याच वेळी मराठ्यांनी चौलवर हल्ला चढवला (जुलै १६८३). चौलवरील मराठ्यांच्या वेढ्याची पकड कमी व्हावी म्हणून विजरईने फोंड्यावर स्वारी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे नोव्हेंबरच्या एक तारखेस प्रभावी तोफखाना घेऊन विजरई फोंड्याजववळ येऊन धडकला.

किल्ल्याला भगदाड पाडून पोर्तुगीजांनी आत घुसण्याचा प्रयत्न चालवला. परंतु मराठ्यांच्या चिवट प्रतिकारामुळे त्यांना यश मिळेना. तेवढ्यात स्वतः संभाजी राजापूरहून झंझावाती वेगाने फोंड्यास आला. ते पाहून पोर्तुगीजांची घाबरगुंडी उडाली. या लढाईत येसाजी कंक याने अतुल पराक्रम गाजवला. कित्येक पोर्तुगीज जीव वाचविण्यासाठी पळून गेले. अखेर विजरईने वेढा उठविला. संभाजीच्या कीर्तीत भर घालणारा हा एक नेत्रदीपक विजय होय. या संदर्भात जेथे शकावलीत पुढीलप्रमाणे नोंद आढळते. कृष्णाजी बिन येसाजी कंक यास हशमाची हजारी होती. त्यावरी फोंडियाच्या फोटास फिरंगियानी लगड केली. तेव्हा राजश्री स्वामी राजापुरीहून स्वार होऊन फोंडियास गेले ते वख्ती खाडीवरी गनिमासी गाठी घालून झुंज बहुतच केले. येसाजी कंकाप्रमाणे त्याचा मुलगा कृष्णाजी यानेही या युद्धात आपल्या शौर्याची चमक दाखवली. येसाजी व कृष्णाजी यांना या युद्धात अनेक जखमा झाल्या. त्या अवस्थेतच पुढे कृष्णाजीला वीरमरण आले. शिवाजीच्या विरोधात असलेल्या केशव प्रभु खेम सावंत आदी देसायांनी या युद्धात पोर्तुगीजांना मदत केली होती. फोंड्याला विजय मिळवल्यावर संभाजीने जवळच मर्दनगड नावाचा किल्ला बांधला.

इकडे रेवदंडा - चौल या ठिकाणी मराठ्यांचा वेढा चालूच होता. २४ नोव्हेंबर १६८६ रोजी रात्री पोर्तुगीजांच्या जुवे नावाच्या बेटावर हल्ला करून मराठ्यांनी तेथील किल्ला ताब्यात घेतला. याचवेळी गोव्यावर हल्ला करण्याचा संभाजीचा विचार होता. परंतू नदीला भरती आल्यामुळे त्याला ते शक्य झाले नाही. याचवेळी संभाजीचा घोडा पाण्याच्या धारेला लागला असताना स्वामिभक्त खंडो बल्लाळने जिवाची पर्वा न करता आपल्या राजाचे प्राण वाचवले. या प्रसंगानंतर डिसेंबर १६८६ मध्ये मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या बारदेश व साष्ट या ठाण्यावर हल्ला केला. यावेळी पोर्तुगीजांची अक्षरशः तारांबळ उडाली. त्यांचे अनन्वित हाल झाले. बारदेश व साष्ट ताब्यात आल्यावर मराठ्यांनी गोवा जिंकण्याची तयारी सुरू केली. परंतू याचवेळी मोगलांनी स्वराज्यात धुमाकूळ घातल्यामुळे संभाजीला घाईघाईने रायगडास परतावे लागले. एकाच वेळी दोन आघाड्यांवरील युद्ध टाळण्यासाठी संभाजीने पोर्तुगीजांशी तह करण्याचे ठरविले व त्यासाठी शहाजादा अकबर व कवी कलश यांची नियुक्ती केली. भीमगडाच्या जंगलात तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. अखेर मर्दनगडावर तह पूर्ण झाला.

परंतू पोर्तुगीज व संभाजी यांचा तह टिकू शकला नाही. मोगलांचे साह्य मिळाल्यामुळे १६८५ मध्ये पोर्तुगीजांनी मराठ्यांविरूद्ध उचल खाल्ली. केशव प्रभु वगौर देसायांना हाताशी धरून पोर्तुगीजांनी संभाजीच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली. जिवदन, कमणदुर्ग, अशेरी हे मराठ्यांचे किल्ले त्यांनी जिंकले. देसायांच्या मदतीने मोगलांनी १६८९ मध्ये फोंडाही ताब्यात घेतलेला होता.


आतापर्यंत पाहिलेल्या तपशिलावरून संभाजीने पोर्तुगीजांवर मात करण्याचा कसा प्रयत्न केला होता याची कल्पना येईल. मोगलांच्या स्वारीचा धोका नसता तर संभाजीने गोवा जिंकला असता व पोर्तुगीजांना भारतातील गाशा गुंडाळावा लागला असता.

**कु. प्रियंका खुमा वळवी**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## पर्यावरण संतुलन प्रदुषणाच्या विळख्यात



जगामध्ये पर्यावरणीय संतुलनाचा विचार करता संपूर्ण जगात वेगवेगळ्या स्तरावर पर्यावरणाचे असंतुलन झाल्याचे निदर्शनात येत आहे. वातावरण हा घटक संपूर्ण पृथ्वीसाठी एक मोठी समस्या आहे. तर जलप्रदुषण, मृदाप्रदुषण यासारके घटक स्थानानुरूप वेगवेगळ्या भागात कमी जास्त प्रमाणात प्रदुषीत झाले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता महाराष्ट्रात देखील वरील सर्व घटकाच्या बाबतीत पर्यावरणाचे असंतुलन विविध घटकांसाठी वेगवेगळ्या स्तरावर दिसून येते. राज्यातील खाणकाम व्यवसाया प्रदुषणात भर घालणारा एक प्रभावी घटक आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होते. परंतु राज्यातील काही खाणी बंद पडल्यामुळे वाहनाची वर्दळ थांबून प्रदुषण नियंत्रित झालेले आहे. हे खरे असले तरी वाढत्या प्रदुषणाला आणखी किती तरी बाबी जबाबदार आहेत. त्याची दखल घेऊन उपाययोजना व्हायला हवी. त्याकरिता एखादी अफलातून कल्पना करून ती प्रत्यक्षात उतरविण्याचा विचार केला किंवा प्रयत्न तरी त्याचा परिणाम शून्यापेक्षा अधिक असेल असे वाटत नाही.

हे सर्व प्रकर्षाने जाणवण्याचे कारण म्हणजे राज्याच्या पर्यावरण व वनमंत्री श्रीमती एलिना साल्ढाणा यांनी एक अफलातून योजना राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे. सायकल वाहतुकीसाठी वेगळे रस्ते तयार करून मोटर वाहन वाहतुकीचे प्रमाण कमी करण्याचा त्यांचा मानस आहे. सायकल वाहतुकीसाठी वेगळे रस्ते योजना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडणार असल्याचे त्यांनी बोलून दाखविले आहे.

सायकल चालविण्याचा व्यायाम हा आरोग्य संवर्धन आहे. हृदयरोग व अन्य काही रोगांवर नियंत्रण ठेवण्यास सायकलिंग हा उत्तम उपाय असल्याचे त्याचे म्हणणे गैर नाही. कारण चालणे नि पोहणे ह्यातून जो व्यायाम होतो त्यापेक्षाही जास्त सायकलिंगमुळे होतो. ह्या गोष्टीत तज्ञांचाही दुजोरा आहे. पन्नाशी उलटल्यावर अति रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह यासारख्या व्याधी जडण्याचा धोका हल्ली कालामानानुरूप वाढला आहे. वयोवृद्ध मंडळी चालण्याचा व्यायाम करू शकतात. पोहण्याची शक्ती असती नि व्यायाम केला असता तर त्यांना रोग जडले नसते. पर्यावरण मंत्री एलिना

साण्ढाणा यांच्या मतानुसार तरूण, युवक, कर्मचारी आदींनी दुचाकी-चारचाकी वाहनाऐवजी नोकरी-धंद्यात कामावर जाण्यासाठी सायकलीचा वापर केल्यास वाढते. प्रदुषण कमी होईल कल्पना फारच छान आहे. पण प्रत्यक्षात येण्यास किंवा आणण्यास कठीण आहे, त्याला अनेक कारणे आहेत.

पर्यावरणमंत्री एलिना हल्लीच चीनला भेट देऊन परतल्याने तेथील मध्यम व इतर वर्गीय लोकांकडून होणाऱ्या सायकल वाहतुकीच्या पसंतीने प्रभावित झाल्या आहेत. पण चीनमध्ये अशी परिस्थिती आढळण्यास तशीच कारणे आहेत. चीनमध्ये गेली पन्नास वर्षे कम्युनिस्ट राजवट होती. शिवाय तेथील आर्थिक परिस्थिती वेगळी होती. वैयक्तिक संपत्ती गोळा करण्यावर बंधने होती. चीनने आपली उत्पादन क्षमता वाढविली नि आज जगातील अनेक देशांत आपल्या माल वस्तुस बाजारपेठ मिळविली. आज चीनमधील परिस्थिती बदलत चालली आहे. पुर्वी तिथे चैनी वस्तू खरेदी करण्यावर बंदी होती म्हणा. पण आज तेथील लोकही चीनमधील ही परिस्थिती मोटर सायकल किंवा कार स्वतःसाठी विकत घेऊ शकतात. कित्येक दशक कम्युनिस्ट राजवटीखाली दबल्या गेलेल्या तेथील जनतेला स्वतःच्या गरजा भागवून आपली जीवनशैली व दर्जा इच्छेनुसार घडविण्याचे भाग्य प्राप्त झाले आहे. आज चीनमध्ये सायकल चालविण्याची रूढी म्हणा किंवा जबरदस्तीतून जडलेली सवय म्हणा हा प्रकार कमी होत चालला आहे. आणखी काही येत्या वर्षात चीनमध्ये ही सायकलीचे राज्य जाऊन मोटारीचे राज्य येईल हेही ध्यानात घ्यावयास हवे. बदलती परिस्थिती नि काळ यानुसार मनुष्याचा जीवनशैली दर्जात बदल, सुधारणा ह्या गोष्टी आपसूक घडायचाच. म्हणून ह्या पार्श्वभूमीवर पर्यावरणमंत्री एंजिला साल्ढाणा ह्यांनी सखोल विचार करण्याची अत्यावश्यकता आहे. राज्यातील प्रदुषण कमी करण्यासाठी वाहनांची संख्या कमी करा, मोटर सायकल किंवा कार ऐवजी सायकलींचा वापर करा असा सल्ला देण्याचा नैतिक अधिकार राज्यातील मंत्र्यांना आहेच कुठे मुळी? अहो बेसुमार भू उत्खननाला कोणी परवानगी दिली. खनिज वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदुषणाने जनारोग्य बिघडले. त्यावेळी मंत्र्यांनी हे प्रकार कसे खपवून घेतले?

सरकारी वाहने प्रदुषण विरहित बनविली आहेत काय? राज्यातील वाहनांची संख्या लोकसंख्येच्या ५० ते ६० टक्के एवढी आहे. पण ही वाहनसंख्येस कोण जबाबदार? आज राज्यातील सार्वजनिक बस वाहतुक सेवा कोलमडली आहे, अपुरी आहे, गैरसोयीची आहे. त्यामुळे सरकारी नोकरी कर्मचारी, अधिकारी, खाजगी आस्थापनांतील नोकरवर्ग स्वतःच्या दुचाकी वापरणे पसंत करतात. कारण कामावर वेळेवर पोहोचण्यासाठी वाहतुक सेवेवर अवलंबून राहू शकत नाही. नोकऱ्या, कामधंदे सारे शहराकडे असल्याने गावापासून जी शहरे ८-१० किमी. अंतरावर आहेत तिथे कामावर वेळेत कसे पोहोचणार? म्हणून बँक कर्ज काढून देखील दुचाकी खरेदी करून नोकरदार आपली वाहने स्वतंत्र करून घेतो.

राज्यात एकूण प्रवासी संख्या किती आहे? त्या तुलनेत वाहतुक सेवा पुरेशी आहे का? त्याचा शोध घेऊन उपाययोजना झालेली नाही. म्हणून मोटरसायकली, कार आदी वाहनांऐवजी सायकली चालविण्याचा पर्यावरण मंत्र्यांचा सल्ला बूमरँग होईल.

प्रदुषण वाढू नये म्हणून उपाय हवेत, त्याचबरोबर पर्यावरण रक्षण नि संवर्धनही व्हायला हवे. पर्यावरणाचे रक्षण होण्याऐवजी गेली दोन दशके त्याचा मोठ्या प्रममाणात ऱ्हास झाला. जलसंपत्ती नि वनसंपत्तीचे रक्षण करण्यास राज्य सरकार अपयशी ठरले, हे सत्य मान्य करावेच लागेल. कारण त्याचे दुष्परिणाम आज गोमतकीय जनता प्रत्यक्ष डोळ्यांनी बघतच नाही तर भोगते आहे. आलिशान बंगल्यात

वास्तव्य करून वातानुकूलित चेंबरमध्ये बसून नि वातानुकूलित खास गाडीतून दौरे-भेटी करणाऱ्या मंत्र्यांना सायकल वापर सल्ले देणे अगदी सोपे आहे. भर दुपारी, रखरखत्या उन्हांत रस्त्यावर पायी चालणाऱ्यांना काय दाह सहन करावा लागतो याचा एकवार अनुभव घ्या. रस्त्यांच्या बाजूला असलेल्या झाडांची कत्तल झाली, रस्ते रूंद झाले पण त्या रूंद रस्त्याच्या बाजूंना ना रोपे ना झाड. हे कसले पर्यावरण रक्षण नि संवर्धन?

वनस्पती नष्ट झाली वनराई दिसणे कठीण! उघडे-नागडे डोंगर! अशा परिस्थितीत अन्न, पाणी, निवारा यासाठी वन्य प्राण्यांची मानवी वस्तीवर अतिक्रमण केले तर त्यांचा काय दोष किंवा गुन्हा?

झरे, तळी, अहोळ, नदी, नाले उपसण्याची गरज आहे. जलस्त्रोत जिवंत असे राहतीत हे पाहिले पाहिजे. जल नि वनसंपत्तीचे रक्षणच नव्हे तर ती वाढविण्याची गरज आहे. या संपत्तीचे संवर्धन झाले तर वाढत्या प्रदुषणातही पर्यावरण संतुलनावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. पर्यावर तथा वनमंत्री श्रीमती एलिना साल्ढाणा यांची कल्पना चांगली आहे.

**राकेश गोरख ठाकरे**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## जलाशयातील पाण्याचे नैसर्गिक शुद्धीकरण (विज्ञानकथा)

जलाशयातील पाण्याचे स्तरीभवन - पाण्याच्या तापमानात खोलीप्रमाणे बदल होत असल्यामुळे जलाशयातील पाण्याचे निरनिराळ्या तापमानाप्रमाणे निरनिराळ्या थरात वर्गीकरण करता येते. अशी विभागणी म्हणजेच स्तरीभवन होय.

स्तरीभवनात ऑक्सिकरण (Oxidation) व अपचयन (Reduction) या दोन्ही क्रिडा घडत असतत हे लक्षा ठेवले पाहिजे. पृष्ठभागावरचे पाणी गरज असल्याने खोलीवरच्या गार पाण्यापेक्षा त्याचे विशिष्ट गुरूत्व कमी असते. त्यामुळे साठलेल्या पाण्याचे स्तरीभवन होऊन ऑक्सिकरण व अपचयन अशा परस्पर विरोधी क्रिया एकाच वेळी चालल्याचा विरोधाभास निर्माण होतो.



मात्र पृष्ठभागालगतचे पाणी ४ सें. पर्यंत थंड होते. तेव्हा त्याचे विशिष्ट गुरूत्व (Specific gravity) सर्वात जास्त होऊन ते तळाशी जाते व तेथील विस्थापित गरम पाणी सुद्धा ४ सें. पर्यंत थंड झाल्यावर पुन्हा तळाकडे परत येते. पाण्याच्या साठ्यातील सर्व पाण्याचे तापमान ४ सें. एवढे थंड होईपर्यंत ही क्रिया चालू राहते. त्यापेक्षा तापण्याचे पाण्याचे तापमान कमी झाले की त्याचे विशिष्ट गुरूत्व कमी होते. कारण पाण्याच्या एक विशिष्ट गुणधर्म असा आहे की त्याची घनता ० सें. पेक्षा ४ सें. लाच जास्तीत जास्त असते. जर हवेचे तापमान गोठप बिंदूच्या खाली गेले तर त्याहीपेक्षा कमी विशिष्ट गुरूत्वाच्या पाण्याचे बर्फात रूपांतर होते. पाणी गोठत असताना ते प्रसरण पावते व त्यामुळे बर्फ पाण्यावर तरंगतो.

उन्हाळा सुरू झाल्यावर पृष्ठभागावरील ४ सें. तापमानाचे पाणी, त्याच्य सान्निध्यातील हवा व सूर्यप्रकाशामुळे गरम होऊ मागता लागते. ही क्रिया पाण्याच्या पृष्ठभागाखालील ५ ते १० मीटर खोलीपर्यंत पाणी गरम होईपर्यंत चालू राहते व यावेळी त्यापेक्षा

जास्त खोलीवरचे पाणी थंड राहते. त्यावेळी त्या दोन थरांमध्ये विशेष भिन्नता आढळून येते व यंन जोडणारा या मधल्या धरामध्ये तापमानी जलद उतार झालेला दिसून येतो. मधल्या अरूंद थरातील तापमानात होणारा बदल दाखविणारी आलेखावर या तापमान उताराला थर्मोक्लाईन असे म्हणतात. (थर्मोक्लोईन - दोन भिन्न तापमान असणाऱ्या पाण्याच्या थरांना जोडणार्या अरूंद थरातील तापमानात होणारा बदल दाखविणारी आलेखावर काढता येणारी रेषा.) येथे प्रत्येक मीटर खोलीला १ सें. किंवा त्यापेक्षा जास्त तापमानाला फरक आढळतो. थर्मोक्लाईनच्या पातळीची पृष्ठभागाखाली असणारी खोली, हवामान विषयक परिस्थिती, जलाशयाची खोली व क्षेत्रफळ आणि वाऱ्यामुळे प्रवाह निर्माण होण्याची व लाटांमुळे पृष्ठभाग ढवळला जाण्याची शक्ता शक्यता या सर्व गोष्टींवर अवलंबून असते.

ज्याठिकाणी पाण्याचे तापमान ४ सें. च्या खाली जात नाही, अशा जलाशयाच्या पृष्ठभागावरील हवा, पाणी व सूर्यप्रकाशामुळे गरम होते. हे गरम पाणी, वाऱ्यामुळे निर्माण झालेल्या प्रवाहांच्या योगे खालच्या गार पाण्यात मिसळते. परंतु या प्रवाहांच्या मर्यादेपेक्षा जास्त खोलीवरच्या पाण्याचा थर सदैव थंड राहतो. अशा परिस्थितीत थर्मोक्लाईन वर्षभर टिकून राहतो. परंतू त्याची पृष्ठभागाखालची खोली ऋतूमान व हवामानाप्रमाणे बदलते. थोडक्यात म्हणजे खोल जलाशयतल पाणी तीन थरात विभागलेले असते. हे थर असे - वरचा थर अभिसरणाचा, मधला थर धर्मोक्लाईनचा आणि खालचा थर स्थित राहणारा. (अभिसरण - द्रवामध्ये उष्णतेचे संक्रमण होत असताना कणांची हालचाल होऊन प्रवाह निर्माण होतात. यालाच अभिसरण असे म्हणतात. पाण्याचा पृष्ठभाग सूर्यप्रकाशाने गरम होतो व रात्री थंड होतो. त्यामुळे वरच्या थरात अभिसरण होते.)

पृष्ठभागावरील अभिसरणाच्या थरातील गरम पाण्यात हवा सतत विरघळत असते. तसेच वाऱ्यामुळे पाण्यात हव मिसळण्याचे कार्य होत असते. त्यामुळे येथील पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन आढळतो. पाण्यात विरघळलेल्या स्थितीत असलेले लोह व मँगेनीज यांचे क्षार अभिसरणामुळे पृष्ठभागालगच्या पाण्यात मिसळले गेले की तेथील ऑक्सिजनमुळे त्यांचे ऑक्सिकरण होते. अशी तयार झालेली संयुगे पाण्यात अविद्राव्य असतात. त्यामुळे ती अभिसरणाच्या थरातून खालच्या थरात व येथे तेथून पाण्याच्या तळाशी जातात. या तळाशीच लोह व मँगेनीज यांचे क्षार पाण्यात विरघळतात.

म्हणजे सर्वसाधारणपणे सांगायचे झाल्यास उन्हाळा व हिवाळ्यातील पाण्याच्या अभिसरणामुळे पूर्ण मिसळण्याच्या क्रियेचा काळ सोडला तर इतर वेळी पृष्ठभागावरील गरम पाण्यात लोह व मँगेनीज यांचे क्षार विशेष प्रमाणात सापडत नाहीत. थर्मोक्लाईनच्या खालच्या स्थिर थरातील पाण्यात ऑक्सिजन नसतो व असला तरी तो अतिशय अल्प प्रमाणात असतो. याचे कारण म्हणजे कार्बनी पदार्थांचे ऑक्सिकरण होत असताना ज्या रासायनिक क्रिया होतात त्यामध्ये हा ऑक्सिजन वापरला जातो. यामुळे पुन्हा कार्बन डाय ऑक्साईड वायु (कार्बोनिक आम्ल) तयार होतो व त्यामुळे पाण्याचा पीएच्. कमी होतो. (कोर्बोनिक आम्ह - $H_2CO_3$ पाण्यात कार्बन डाय ऑक्साईड विरघळल्याने हे आम्ल तयार होते.) पाण्यात वाहून आलेल्या दगड, मातीतील लोह वा मँगेनीज विरघळण्यासाठी या कमी झालेल्या पीएच.ची मदत होते.

याशिवाय पाण्यात ऑक्सिजन नसल्यामुळे सल्फेटचे सल्फाईडमध्ये रूपांतर होऊन पाण्यात दुर्गंधी निर्माण करणार हायड्रोजन सल्फाईड, फेरस सल्फाईड यासारखी द्रव्ये तयार होतात. तसेच कार्बनी पदार्थांचे

विघटन होऊन रंगद्रव्ये, वाईट चव व घाण वास असणारे पदार्थ तयार होतील. अशा क्रियांना चालना मिळते. थर्मोक्लाईनच्या खालच्या बाजूस असलेल्या शांत व स्थिर अशा पाण्यात पुढील गुणधर्म आढळून येतात. ऑक्सिजनची उणीव, कार्बन डाय ऑक्साईडचे जास्त प्रमाण, शुद्ध पाण्याच्या पीएच. पक्षा एच. याशिवाय लोह, मँगेनीज व सल्फाईड ही खनिजे ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात असतात त्या ठिकाणी त्यांचे विद्राव्य क्षार आणि बेचव व दुर्गंधी निर्माण करणारे पदार्थही या पाण्यात आढळतात.

थर्मोक्लाईनच्या वरच्या थरात शेवाळे व कर्ब ग्रहणक्रियेसाठी सूर्यप्रकाशाची आवश्यकता असणाऱ्या लहान पाण वनस्पतींच्या वाढीसाठी अनुकूल परिस्थिती असते. कार्बन डाय ऑक्साईड वायूमधील कार्बन ग्रहण करीत असताना या वनस्पती ऑक्सिजन बाहेर सोडतात. त्यामुळे पी.एच. वाढतो आणि लोह व मँगेनीज यांचे ऑक्सिकरण होण्यास आणखी पोषक वातावरण निर्माण होते. या उलट प्राणी वर्गातील जीवाणी कर्बग्रहणक्रिया करीत नसल्याने त्यांना सूर्यप्रकाशाची आवश्यकता नसते व त्यामुळे हे जीवाणी जेथे अन्न मूबलक असेल तेथे स्थलांतर करू शकतात. पृष्ठभागावरील पाण्यातील शेवाळाचा उपयोग प्राणी वर्गातील जीवाणूंना अन्न म्हणून होतो. जास्त खोलीवरही असे शेवाळे आढळते. जलाशयाच्या तळातील शेवाळे भिन्न प्रकारचे असते. शिवाय पृष्ठभागावरील निर्जीव शेवाळे पाण्याच्या तळाशी जाते आणि तेथे ते कुजते. हे जीवाणू कूजणारे शेवाळे व पाण्याच्या प्रकारचे असते. शिवाय पृष्ठभागावरील निर्जीव शेवाळे पाण्याच्या तळाशी जाते आणि तेथे ते कुजते. हे जीवाणू कुजणार शेवाळे व पाण्याच्या तळाशी बसणारे इतर कार्बनी पदार्थ यांचा अन्न म्हणून उपयोग करतात.

अवरोधक जलाशयात पाणी साठविले असता पाण्याचे नैसर्गिकरित्या शुद्धीकरण होण्यस अनुकूल परिस्थिती निर्माण होते. पण याबरोबरच त्यात काही हानीकारक बदल घडण्याची शक्यता असते. या पुस्तकात ज्या अनेक गोष्टींची चर्चा केली आहे त्यातील पहिली गोष्ट महणजे परिचालकांना जलाशयातील परिस्थितीचे शक्य तेवढे नियंत्रण कसे करता येईल याविषयीची माहिती असणे. .

- **मुलभूत तत्त्वे -**

पाणी एका जागी साठवून ठेवले असताना खालील फायदे होतात -

१) अवसादन व मलजल मिसळल्यामुळे पाणी दूषित झाले असल्यास पाण्यात जीवाणू आढळतात. पाणी साठविण्याच्या क्रियेमध्ये तर असतात.

२) अवसादन क्रियेमुळे पाण्यातील गाळ तळाशी बसतो.

३) सांडपाणी व मलजल मिसळल्यामुळे पाणी दूषित झाले असल्यास जीवाणू आढळतात. पाणी साठविण्याच्या क्रियेमध्ये जीवाणूंना जगण्यास प्रतिकूल अशी परिस्थिती निर्माण होते.

४) पाण्यात ऑक्सिजन विरघळतो व त्याच्या रासायनिक क्रियेमुळे पाण्यातील अशुद्ध द्रव्यांचे स्वरूप बदलते.

या शुद्धीकरणाच्या क्रियाबरोबरच खालील हानीकारक क्रियांमुळेही पाण्याच्या दर्जात फरक पडतो.

१) पाणी साठविल्यामुळे विशिष्ट जीवाणूंची वाढ होते व त्यांच्या क्रियेमुळे पाण्याचा दर्जा खालावत.

२) पाण्याबरोबर माती व खडक यांच्यातील लोह व मँगेनीज वाहून येतात. त्यांचे अपचयन होऊन ते पाण्यात विरघळतात.

**कु. ठाकरे प्रिया भगवान**

**एफ.वाय.बी.ए.**

*****




**राष्ट्रीय चर्चासत्र**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आदर्श कला महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात पुस्तकाचे प्रकाशन करतांना मान्यवर.




महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आदर्श कला महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात अध्यक्षिय भाषण करतांना करतांना बाबासो. ॲड. शरदचंद्रजी शाह.




लिंग समानता व सबलीकरण विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. श्रीराम परिहार.




**राष्ट्रीय चर्चासत्र**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उद्घाटनपर भाषण करतांना प्राचार्या डॉ. बिमलेश तेवतीया.




महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना श्री. लक्ष्मण मानकर.




राष्ट्रीय चर्चासत्रात प्राचार्य राजेंद्र अहिरे, एस.जी. पाटील महाविद्यालय, साक्री यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार.




**विद्यापीठस्तरीय कार्यशाळा**

विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे उद्‌घाटन पर भाषण करतांना प्राचार्य डॉ. राजेंद्र आर. अहिरे.



डॉ. मोहिनी गुरव (नाशिक) विद्यापीठस्तरीय कार्यशाळेमध्ये विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना.




विद्यापीठस्तरीय कार्यशाळेत मनोगत व्यक्त करतांना जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबारचा विद्यार्थी.



स्विडन येथील ब्रिगीडा वाल्डेन यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. अशोक खैरनार.




स्विडन येथील ब्रिगीडा वाल्डेन स्विडन शिक्षण पद्धती आणि भारतीय शिक्षण पद्धती या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना.




महाविद्यालयाचे अध्यक्ष बाबासाो. शरदचंद्र शाह यांच्या समवेत प्राचार्य डॉ. अशोक खैरनार आणि ब्रिगीडा वाल्डेन प्रश्नोत्तर सत्रात.



**क्रॉसकंट्री स्पर्धा**

क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव अंतर्गत नंदुरबार विभागिय आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री (पुरूष/महिला)स्पर्धेत हिरवा झेंडा दाखवतांना प्राचार्य डॉ. अशोक खैरनार व इतर मान्यवर



क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव अंतर्गत नंदुरबार विभागिय आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री (पुरूष/महिला) स्पर्धेचा बहिस वितरण समारंभ.



क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव अंतर्गत नंदुरबार विभागिय आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री (पुरूष/महिला) स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस देतांना बाबासाो. ॲड. शरदचंद्र जगन्नाथ शाह.

## रा.से.यो.




रा.से.यो. एककाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार.




रा.से.यो. एककाच्या स्थापना दिनी मार्गदर्शन करतांना डॉ. आर.के. जाधव.




राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त मार्गदर्शन करतांना डॉ. विजय गुरव.

# प्लास्टीक प्रदुषण एक शाप



पर्यावरण म्हणजे आसपासच्या वातावरणात प्रामुख्याने वापरण्यात येणारी संज्ञा ज्यामुळे जीव सजीव असतात आणि अशाप्रकारे हवा, पाणी, अन्न आणि सुर्यप्रकाश यांचा समावेश आहे. जे जीवसृष्टीचे कार्य करण्यासाठी सर्व प्राणीमात्र आणि वनस्पतींच्या गरजांवर आधारित आहेत. पर्यावरणास इतर जीवंत प्राण्यांचा देखील समावेश होतो. तापमान, हवा, पाऊस इ. सध्याच्या शाळांमध्ये भविष्यातील नागरिकांना पर्यावरण विषयक शिक्षणाला औपचारिक आणि अनौपचारिक पद्धतीने दिले जाते तर मानवतेन या धोक्यापासून मुक्त होऊ शकतो. आपल्यामध्ये वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, परमाणू प्रदूषण, पर्यावरणीय असमतोल आणि उष्णता आणि किरणोत्सर्गाचे प्रमाण आम्हाला आढळते. या प्रदूषणामुळे आजचे वाताविरण शुद्ध आणि नैसर्ग्कि नाही. खालील कृती पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत करू शकते.

प्रदूषणाची तपासणी करण्यासाठी पर्यावरणाला आरोग्यपूर्ण आणि स्वच्छ बनविण्यासाठी अधिक आणि अधिक उदयाने तयार करावी. कारखान्यांनी घरापासून लांब अंतरावर जागा शोधली पाहिजे. नद्या गलिच्छ पाणी आणि घाणेपासून संरक्षण करण्यासाठी आहेत. प्रवाशांच्या वाहनांच्या धुरापासून तपासणी करावी. आवाज कमी करण्यासाठी त्यांनी सायकल वापरावी. पिण्याचे पाणी स्वच्छ आणि झाकण असलेल्या भांड्यांमध्ये ठेवले पाहिजे.

जागतिक तापमानवाढीमुळे पर्यावरण रक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज झाली असून युवकांनी अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या समस्येवर मार्ग काढणे आवश्यक आहे. आजकाल वेगळेच वातावरण अनुभवायला येते. पावसाळ्यात सुद्धा उकाडा जाणवतो. थंडीच्या दिवसात तर कडाक्याची थंडी केव्हा आली? केव्हा येणार? याची स्मृती जागवावी लागते. उन्हाळा हा बारमाही बाराखडीसारखा असतो. घाम आणि तहान ही तर नित्याचीच चिंता मानवी जीवनाला त्रस्त करीत असते, सतावीत असते, व्याकूळ करीत असते. असे सुर, असे व्यथित सुर, असे प्रतिकुलतेचा कंठशोध करणारे सुर, जीवन व्यथित करतात. कोणते बरे कारण असेल या व्याकुळतेला? मानवनिर्मित कृतघ्नतेला? जीवनाचे विधायक गणिक हे परिश्रमाच्या बेरजेवर, दुष्टपणाच्या शून्यातील वजाबाकीवर, संपन्नतेच्या गुणाकारावर आणि संकुचित वृत्तीच्या भागाकारावर अवलंबून असते. गणितातील जर कॅलक्युलेटर कसाही हाताळला गेला तर अचूक उत्तराची अपेक्षा कशी बरी करावी?

देई पर्यावरणाला संरक्षण
वनराईचे रक्षण
देई पर्यावरणाला संरक्षण
पाण्याच्या संचयाचे रक्षण
देई पर्यावरणाला संरक्षण
नैसर्गिक संपत्तीचे रक्षण
देई पर्यावरणाला संरक्षण

आपले पर्यावरण कशावर निर्भर आहे? निसर्ग नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यावर! मनुष्य ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे. योग्य-अयोग्य याचा विचार करण्याची क्षमता, खरं म्हणजे पूर्ण क्षमता, मनुष्याच्या ठिकाणी असते. संवर्धन ही संहार यावरच पर्यावरणाचे संरक्षण अधोरेखित झालेल असते. मनुष्याची सहिष्णू वृत्ती, स्वार्थाची चढती भाजणी अन्

कनवाळूपणाची उतरती भाजणी यातून पर्यावरणाचे जतन कसे बरे होईल?

जतन करा, जतन करा
निसर्गाची हिरवी शाल जतन करा
जतन करा, जतन करा
अक्षय धनाचे जतन करा
जतन करा, जतन करा
समृद्धीचा संचय जतन करा

या काव्यांशाचा मतितार्थ लक्षात ठेवणे पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. सुमारे खनिज संपत्तीची लुट, काँक्रीटची तापदायक जंगले यावर जर अंकुश लावला तरच पर्यावरणाचे संरक्षण शक्य आहे. खरं म्हणजे ती काळाची गरज आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मनुष्याच्या मुलभूत गरजांना प्राधान्य देणारे, अग्रक्रम देणारे, भूषण ठरणारी मानवी वृत्ती पर्यावरणाला पूरक ठरणारी असते, प्रेरक ठरणारी असते, प्रेरणावर्धक ठरणारी असते. निसर्गाचे संतुलन सानिध्य ज्यावेळी बिघडते, तापदायक ठरते, त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडले याला कोण कारणीभूत?

आजकाल सर्व प्रकारची माध्यमे, पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्याबद्दल आपली मते आग्रहाने मांडीत असतात. विविध संघटना, पर्यावरणप्रेमी, पर्यावरणास अनुकूल आणि हितदायक गोष्टींचा भावनिक आग्रह धरतात. मग तो आग्रह वृक्ष संवर्धनाचा असो, अनावश्यक वृक्षतोडीला पायबंद आणि प्रतिबंध करणारा हट्टाग्रह अन् हक्काग्रह असो, डोंगर पठाराचे रूपांतर बिनशेतीत करण्याचा सत्याग्रहाला विरोध असे. केरकचऱ्याचे वैज्ञानिकदृष्ट्या आरोग्यवर्धक नियोजन असो, अनिर्बंध पाण्याचा अपव्यय असो, हवा प्रदुषणाची वाढती व्याप्ती असो, या प्रकारच्या साऱ्याच सामाजिक समस्यांचा निकोप समाज व्यवस्थेला घातक ठरतात, दुषणावह ठरतात, तापदायक ठरतात, असे नाही का आपल्याला वाटत? हिरवेगार माळरान, हिरवी शाल पांघरलेली आपली मायभूमी स्वच्छ जलाशये, मग त्या विहिरी असोत, तलाव वा नद्या असोत, पर्यावरणाला बाधक न ठरणारे खोदकाम असो, बांधकाम असो, याचा पुरस्कार ज्यावेळी समाजात होत असतो, त्यावेळी पर्यावरणाचे संतुलन अस्थिर, अस्वस्थ होत असते. याबद्दल कुणाचेही दुमत असू शकत नाही. विषारी द्रव्यांची विल्हेवाट लावली, प्रदुषण मुक्त कारखान्यांना प्रोत्साहन देण्याची वृत्ती, प्लास्टीकचा अल्प उपयोग अन् योग्य पर्यावरणपूरक नियंत्रण, कमी हवा प्रदूषण करणारी वाहने, झाडांची लागवड, अन् योग्य निगा, पर्यावरणाला विशेष बाधा न आणणाऱ्या कृत्रिम अडथळ्यांना प्रतिबंध सौरशक्तीचा अधिकाधिक उपयोग इ. कडे ज्यावेळी डोळस वृत्ती, अनुकूल वृत्ती दिसेल तिच काळाची गरज आहे. अन्यथा कोणते भीषण चित्र भविष्यात समाजात दिसेल याचा उहापोह करणारी या काव्यपंक्ती -

काँक्रीटची जंगले,
ठरतील संहारक उपद्व्याप,
देईल जनांना संताप,
बेसुमार वृक्षतोड,
देईल संहाराल जोड,
विषारी द्रव्याचा ताप,
होईल भितीचा बाप,
अशाने होईल प्रदूषण,
करील मानवांचे शोषण,
हे जर टाळायचे असेल तर
निसर्ग नियमांचे पालन करूया,
भयमुक्त, संहारमुक्त जीवन जगूया,
अन् पर्यावरणाचे रक्षण करूया.

ग्रामीण भागात प्रामुख्याने जनजागृती करून कायमस्वरूपी प्लास्टिक बंदी करणे काळाची गरज आहे. असे मत पर्यावरण तज्ञ नंदकिशोर गांधी यांनी जिल्हा परिषद कार्यशाळेत व्यक्त केले. गेले १५

वर्षांपासून महाराष्ट्रात विविध योजनांद्वारे घनकचरा व सांडपाणी या विषयावर काम सुरू आहे. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही प्लास्टिक वापर वाढल्याने त्यावर उपाययोजना करण्यासाठी २३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना काढून महाराष्ट्रात प्लास्टिक व थर्माकोल बंदी घातली. या अधिसूचनेबद्दल लोकांना माहिती व्हावी तसे अंमल बजावणी यंत्रणेला अधिसूचनेच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी जिल्ह्यातील जिल्हा परिषद पुणे सर्व तालुक्यांत गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य, शिक्षण अधिकारी, कर्मचार व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक अशा दीड हजार लोकांची कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी गांधी यांनी प्लास्टीक वापराबाबत कायदे-नियम, त्याचे तोटे, पर्यावरणावर दुष्परिणाम, प्लास्टिक पर्याय या विषयांवर मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, प्लास्टिकचे दुष्परिणामही समोर आहेत. त्यामुळे पर्यावरणाच्या भयंकर गंभीर समस्या वाढलेल्या आहेत. अनेकांना कोणते प्लास्टिक विकत घ्यावे कोणते नाही याची सुद्धा माहिती नसते. आता आपणास ती माहिती प्रत्येकाला सांगावी लागेल. शासनाच्या अधिसूचनेद्वारे अंमलबजावणी शंभर टक्के यशस्वी करावी लागेल. प्लास्टीक हे आपल्या आयुष्याचा इतका सहज भाग झाला आहे. त्याची वेगळी माहिती करून घ्यावी असे कोणालाही वाटत नाही. लोकांना या वैशिष्ट्यपूर्ण प्लास्टिक पदार्थांचा उपयोग कशा पद्धतीने करता येईल हे पुढे मांडले आहे.

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, रूडकीच्य संशोधकांनी अशा तंत्रज्ञानाचा विकास केला आहे, ज्याचा उपयोग सामान्य लोकांना देखिल प्लॅस्टिक कचऱ्यापासून विटा, टाईल्स इ. अशी उपयुक्त उत्पादने बनविण्याच्या कामी पडतील. या तंत्रज्ञानाचा विकास करणाऱ्य शास्त्रज्ञांच्या मते, उच्च घनतेचे पदार्थयुक्त पॉलिथीन साहित्यासोबत काही रेशेदार घटक आणि इन्स्टीस्ट्युटद्वारे विकसित केलेल्या विशेष प्रकारच्या जैविक रसायनांचा वापर करून अशा प्रकारच्या उत्पादनांची निर्मिती केली जाऊ शकते.

आयआयटी, रूडकीच्या रसायन अभियांत्रिकी विभागाच शास्त्रज्ञ डॉ. शिशिर सिन्हा यांनी असे सांगितले की, हे अत्यंत सोयीचे तंत्रज्ञान आहे. ज्याचा उपयोग सामान्य लोकांना देखील करता येईल. यासाठी प्लास्टिक, रेशेदार सेंद्रीय साहित्य आणि जैविक रसायने यांच्या मिश्रणाला ११० ते १४० डिग्री सेल्सिअस पर्यंत गरम करावे लागते. नंतर हे मिश्रण थंड होऊ दिल्यानंतर यापासून उत्तम अशा टाईल्स किंवा विटा तयार करता येतात. यामध्ये शोध समूहाने ओलेफिन या रसायनावर आधारित एका जैविक रसायनाचा विकास केला आहे. हे जैविक रसायन प्लास्टिक पोलिमर आणि फायबर यांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी मदत करते. डॉ. सिन्हा यांच्या घरगुती सामुग्रीचा उपयोग करून देखील या जैविक रसायनांची निर्मिती केली जाऊ शकते.

प्लास्टीकचा कचरा, तुललेल्या आणि फुटलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पाईप, बॉटल्स आणि बेकार होणारे मोबाईल कव्हर इत्यादी वापरून अशा प्रकारच्या उत्पादनांची निर्मिती करता येईल. रेशेदार घटक म्हणून गहू, धान किंवा मक्याचा भुसा, ताग आणि नारळाची करवंटी तसेच साल वापरता येऊ शकते.

कॅरीबॅगशी नाते तोडा,
पर्यावरणाशी नाते जोडा!!

**कु. राणे गायत्री अनिल**
**एस.वाय.बी.ए.**

*****

# शेतकरी महिलांची परवड



शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबांची अवस्था दयनीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबांची अवस्था दयनीय बनते. पति निधनाचे दुःख बाजुला सारून अनेक शेतकरी महिलांची जगण्यासाठी धडपड चालू असते. मात्र अशा महिलांना होणारा त्रास व त्यासाठी सरकारने काय करणे गरजेचे आहे. यावर प्रकाश टाकणारा लेख खालील प्रमाणे.

नित्याने पडणारा दुष्काळ आणि कापूस सोयाबीनचे होणारे नुकसान याने धुळे जिल्ह्यातील गोरख निंबा ठाकरे हे खूप हताश होते. पण विहिर झाली कि शेतीला पाणी मिळेल या आशेने त्यांनी एक लाखांचे कर्ज काढून विहिर खोदायला सुरूवात केली. पण पाणी काही लागले नाही. बँकेचे कर्ज आणि नातेवाईकांचे घेतलेले उसने पैसे त्यांना फारच डोईजड होऊ लागले आणि शेवटी २०१८ साली त्यांनी गळफास घेऊन त्याने आत्महत्या केली. आपला नवरा गेला, दुःखातून त्यांच्या पत्नी सुरेखाबाई ठाकरे या सावरताहेत तोवरच नवऱ्याची केलेली आत्महत्या ही पात्र कि अपात्र आहे यावर शासन दरबारी वाद सुरू झाला. गोरख निंबा ठाकरे यांनी घेतलेले कर्ज शेतीकामासाठी घेतले होते. पीक निघायच्या आधीच आत्महत्या केल्याचा निकष लाऊन शासनाने ती आत्महत्या अपात्र ठरवली.

नंदुरबार जिल्ह्यातील साहेबरावने ६ वेळेस आत्महत्येचा प्रयत्न केला. प्रत्येक वेळी राधाबाई आणि इतर कुटुंबियांनी त्यांना वाचवले. या सगळ्यात करावे लागलेला दवाखान्याचा खर्च नातलगांकडून उसनवारी करून भागवला. शेतात साहेबरावाची काळजी या सर्व गोष्टींनी राधाबाईंच्या पूर्णपणे खचून गेलेल्या त्यातच त्यांच्या नवऱ्याने स्वतःला संपवून टाकले आणि राधाबाईंच्या आयुष्याला वेगळे वळण लागले. शेतीस व पहिल्या मुलीच्या लग्नासाठी एक लाख कर्ज घेतले होते. ते फिटले नाही. तोवर दुसऱ्या पोरीचे लग्न कसं हणाल अशी चिंता त्यांना लागली. त्यासाठी परत कर्ज घेतले. बँकेचे २६ हजार रू. कर्ज होतेच सरकारकडून तातडीची मदत मिळाली खरी पण ३० हजार रूपयांचा चेक वढवायला गेल्या तर त्यातून बँकेने २६ हजार वळणे करून घेतले आणि चार हजार तेवढे हातात आले. शेवटी कर्ज फेडायला घरची बैलजोडी विकली. सततची नापिकी आणि घरचे वाढते खर्च याने कर्जाचा डोंगर वाढतच गेला.

शिरपूर जिल्ह्यातील अनिता हीच्या नवऱ्याने आत्महत्या केली तेव्हा केवळ २१ वर्षांची होती आणि गर्भवती होती. सावकाराचे कर्ज होते. आणि शेततली नापिकी म्हणून विळा घेऊन आत्महत्या केली. कर्ज सावकाराचे होते आणि सावकार नोंदणीकृत नव्हता. म्हणून ही आत्महत्या शासनाने अपात्र ठरवली आणि अनिता तातडीच्या मदतीला मुकली.

कायमची नापिकी आणि वाढते कर्ज याने शिंदखेडा जि. हिनाबाईच्या नवऱ्याला मानसिक आजार झाला आणि त्याला कंटाळून त्याने आत्महत्या केली. मानसिक आजाराचा रूग्ण म्हणून मदतीला मुकली. कंटाळून आत्महत्या त्यांच्या आत्महत्येची नोंद झाल्यामुळे ही शेतकरी आत्महत्या म्हणून पात्र ठरली नाही. इंदुबाई, अनिता, राधाबाई यांच्यासारख्या अनेक आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकरी महिला २१ नोव्हेंबर रोजी मुंबईत आपले प्रश्न आणि मागण्या घेऊन आल्या होत्या. महिला किसान अधिकार मंच (मकाम) ने

पुकारलेल्या या आंदोलनात त्या हिरीरीने आपले प्रश्न मांडत होत्या. त्यातला त्यांचा एक मुख्य सवाल होता आम्हाला तातडीची मदत का मिळाली नाही? त्यांच्या नवऱ्यांची आत्महत्या ही मदतीस पात्र आहे किंवा नाही या भोवऱ्यात त्या अडकलेल्यास मदत मागत होत्या.

- **काय आहे तातडीची मदत योजना -**

महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या सिद्ध झाल्यास त्या कुटुंबातील वारसांना एक लाख रू. तातडीची मदत मिळेल असे सरकारने जाहीर केले आहे. त्यामध्ये राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात आत्महत्या केल्याचे निदर्शनास झाल्यानंतर संबंधित पोलीस अधिकाऱ्यामार्फत प्राथमिक तपास तातडीने करावा. त्यानंतर शेतकरी आत्महत्येची सखोल चौकशी संबंधित तहसिलदार, पोलीस अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्या पथकाने जागेवर प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करावी. घटना घडल्यास त्यापासून भेट दऊन तपासणी करावी. घटना घडल्या दिवसाच्या आत जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल अध्यक्षतेखालील समितीने प्राप्त अहवालावरून तातडीने मदतचा निर्णय घेऊन आत्महत्या घडल्यापासून १५ दिवसांच्या आत मदत देण्यात यावी. आत्महत्येची कारणे तपासून ती आत्महत्या मदतीस पात्र अथवा अपात्र हे या समितीने ठरविणे अपेक्षित आहे. आत्महत्या नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज फरतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे घडली असल्यास ती पात्र ठरते. आत्महत्या पात्र असेल तर मृत शेतकऱ्यांच्या वारसांना रू. एक लाख मदत देणार आहेत.

पुढे फेब्रुवारी २०१८ मध्ये आत्महत्या करणारी व्यक्ती ही शेतकरी होती किंवा कसे या बाबतचा निकष सुधारण्यात आला. त्यानुसार मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणतेही व्यक्ती शेतजमिन धारण करित असेल तर सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहीत धरण्यात येईल व अशा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने कर्ज घेतले असल्यास ती व्यक्ती आजही मदतीसाठी पात्र ठरवण्यात आली. पण आजही निकषांमधील महत्त्वाच्या त्रुटी कायम आहेत. अपात्र कोण ठरतात ज्यांच्या नावे जमीन नाही. पण जमिनी भाड्याने घेऊन कसणारे शेतकरी आणि महिला किंवा जमिनीचा ताबा आहे पण मालकीचे उतारे नाहीत असे दलित, आदिवासी, शेतकरी त्या वर्षात नापिकी असेल पण गेले असेल तरी ती शेतकरी आत्महत्या म्हणून ग्राह्य धरली जात नाही. दुसरे म्हणजे सावकार नोंदणीकृत नसेल किंवा इतर मार्गाने उसने घेऊन कर्जबाजारी झाले असतील तर तेही ग्राह्य धरले जात नाही.

शेती व्यतिरिक्त मुलांचे शिक्षण, लग्न, आरोग्यासाठी कर्ज अधिकृत सावकारांकडून मिळणे कठीणच आहे. तर बँकेचे एक कर्ज असताना दुसरे मिळणे बहुतेक वेळेस मिळत नाही. अशा वेळेस ती कर्ज नात्यागोत्यातूनच उसने घेणार किंवा सावकाराकडे जाणार. जे सरकाराच्या शेतकरी आत्महत्येच्या निकषात बसतच नाही. मराठवाड्यात व विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये मकामने अलीकडेच असलेल्या अभ्यासातून दिसून आले की, शिक्षण, आरोग्य, शेती, लग्न या सर्व गोष्टींसाठी शेतकरी कुटुंबांना कर्ज घ्यावे लागते.

एनसी आरबीच्या आकडेवारीनुसार १९२५ ते २०१८ दरम्यान महाराष्ट्रात ६५ हजार शेतकरी आत्महत्या झाल्यात. महसुल विभागाच्या माहितीनुसार नक्की किती आत्महत्या झाल्या यांची माहिती शासनाकडून सहज उपलब्ध होत नाही. ए.पी. खैरनार यांनी हा मुद्दा अनेकदा मांडला होता. मकामने मिळवलेल्या माहितीनुसार २००१ ते २०१८ च्या कालावधीत मराठवाडा आणि विदर्भात १३ हजार शेतकरी आत्महत्या या पात्र ठरवलेल्या एनसीआरबीच्या आकडेवारीच्या केवळ २०% यावरून शेतकरी आहत्महत्या अपात्र ठरवण्याकडे शासनाचा कल अधिक दिसतो आणि एकदा का पात्र/अपात्र प्रश्न

संपला कि शासन त्या महिलेबरोबर संवाद पूर्णपणे थांबवतो. ती कशी जगत आहे, तिच्या मुलांचे शिक्षण सुरू आहे का नाही? तिला तिचे आयुष्य नव्याने उभे करण्याच्या दृष्टीने काय मदत हवी आहे या विषयी शासन फारसे काही करताना दिसत नाही.

- **मदतीची रक्कम वाढवावी -**

आणखी एक कळीचा मुद्दा म्हणजे सर्वाधिक शेतकरी आत्महत्या असलेल्या राज्य सरकारकडून तातडीच्या मदतीच्या (एक लाख रू.) रकमेत १३ वर्षानंतर काहीही वाढ झालेली नाही. याउलट २०१७-१८ दरम्यान आंध्र प्रदेशमध्ये ही रक्कम रू. ३.५० लाख तर तेलंगणा आणि कर्नाटकात ही रक्कम रू. ५ लाख केली आहे.

एकूण काय, पतीच्या आत्महत्येनंतर मानसिक आघातात जगणारी महिला पतिवरील कर्जाची परतफेड घर चालवण्यासाठी कामधंदा, मुलांचे शिक्षण, आजारपण अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या एक स्त्री म्हणून पार पाडत आहे. त्यात मालमत्तेवरून होणारे वाद, सामाजिक प्रतिबंध, समाजकंटकांना त्रास हेही तिलाच सहन करावे लागतात. या सगळ्यांचा सरकार कधी तरी गांभिर्याने विचार करणार का?

नवऱ्याने कर्जापायी जीव दिला. माझ्या नशिबीही कर्जच आलं. राधाबाई, अनिता, इंदुबाई सारख्या सर्व शेतकरी महिलांची ही भावना सरकारला हे खरंच बदलायचं असेल तर त्यांचे पहिले पाऊल म्हणजे पात्र, अपात्र निकष पुन्हा तपासून बघून त्यात सुधारणा करणे. तातडीच्या मदतीची रक्कम इतर राज्यांप्रमाणे ५ लाख रू. इतकी वाढवावी. प्रामुख्याने तिला शेतकरी समजून तिच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे हे करायलाच हवे.

**समाधान अनिल महिरे**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## दवंडी ते ट्विट



एकेकाळी गावात तराळ असायचा. गतकालखंडात गावाबाहेर उपेक्षित दलितांची वस्ती असे. हे महारवाडे, मांगवाडे, रामोशीवाडे गावांनी आणि जातीपातीचा अभिनिवेश असलेल्या गावकऱ्यांनी मनस्वी जोपासले होते. त्याचा गावकीला आसुरी आनंद होता... या अमानवी दृष्टीकोनाचा फार अभिमान होता. गावाकुसाबाहेरच्या या बहिष्कृत, अंधारल्या जगात खितपत पडलेल्या लोकांना गावात यायला मज्जाव असे. जर यायचं झालंच तर त्याच्या अटी असत. या लोकांनी गावात येताना कसं यायचं, त्याचं वर्तन कसं असावं, त्यांची देहबोली कशी असावी याचे काही दंडक असत. ते न पाळणाऱ्यांना त्याची सजा दिली जाई. आज काळ बदललाय. अस्पृश्यता बऱ्यापैकी नष्ट झालीय. बुरसटलेल्या विचारांचा पगडा असलेल्या वृत्तीचे वर्चस्व ज्या प्रांतंत आहे तिथल्या सनातनी लोकवस्त्या वगळता सर्वत्र बदल होत चाललाय. मानसिकता काही कारणांनी का होईना बदलते आहे. आता गावोगावचे महारवाडे गेले. मात्र त्यांची जागा भीमनगरांनी घेतलीय. नावं बदलली, तरी वृत्ती मात्र काहीशी तशीच आहे. छुपा भेद आहेच. पण पुर्वी इतका जहालपणा आता उरलेला नाही. अरे ला कारे म्हणणारा वर्ग आता बाह्या सरसावून उभा ठाकतो.

तेव्हा ॠतू आताच्यासारखे लहरी नव्हते. चाकरमान्याने आपली दिनचर्या घड्याळाच्या काट्यावर हाकावी तसे ॠतूचक्र चाले. क्वचित त्यात बदल होत.

पण त्यात फारशी दाहकता नसे. अवकाळी ऊन, पाऊस, वादळे असे. पण त्याची काळजी घेत त्याला जीव लावत. तेव्हा नुसतं ओरबाडण्याकडे कल नव्हता. गावाची ठेवण देखील ठाशीव असे. चहु दिशेला शीव असे, वेश असे. वेशीवरच देऊळ, चावडी, पार, गावतळं, जातीच्या प्रभावनुसार आळेंची रचना असा सगळा मामला असे.

गुरं वाळायला नेणाऱ्या गुराख्यांसाठी कुरणं होती, माळ होते, हाळ होते. डोळ्याला साफ दिसेल असं निळं आभाळ होतं. हिरवाई होती. पाऊलवाटा होत्या. त्यात दगड-धोंडे होते अन् काटेकुटेही होते. माणसांच्या डोक्यावर स्वार झालेली जातीपातीची अन् खोट्या इभ्रतीची भुतंखेतं सोडली तर लोकांची नियत चांगली होती.

अशा त्या गावात तराळ यायचा. यायचा म्हणजे कसा? तर त्यांच्या घरी गावकीच्या कारभाऱ्याचा माणूस जायचा. बहुत करून घरगडीच जायचा. गावाबाहेरच्या कुडाच्या घरात गावातून एखादाच इसम हप्त्याकाठी यायचा. अन् तोही फक्त तराळाच्या घरी आलेला माणूस स्वतःची शरी इथकं पुसायचा की, आजुबाजुची माणसं त्याला नुसती न्याहाळात बसायची. त्याच्या निकट जायची कुणाला अनुमती नसे. तो तराळाच्या दाराबाहेर येऊन त्याला नावाने पुकारे. तराळाच्या घरी गावातून माणूस आला म्हणजे काहीतरी निरोप आला आहे याची खात्रीच. तराळाला तो निरोप त्याच्या घरी क्वचितच सांगितला जाईल. जरी सांगितला गेला तरी गावात दवंडी दिल्याशिवाय त्याच्या वस्तीत वाच्यता करण्याची परवानगी नसे.

त्याला हेच काम होतं असं नव्हे. गावकीचं टपाल, कागदपत्रांची भेंडोळी, लखोटे पंचक्रोशीतील गावोगावच्या पाटील, तलाठ्यास, महालकारी, मामलेदारास नेऊन द्यावे लागत. गावात हाकी देत फिरताना जो कुणी मेलं तर त्याच्यानुसार सांगावा देऊन भागत नसे, तर त्याच्या गोवऱ्या टाकायचं कामही लागे. तेव्हा म्हणच होती, पाटलाचं लग्न अन् महाराला भुषण! तर या लग्नासाठी त्याला रक्त ओकेपर्यंत राबावं लागे. सगळं वऱ्हाड गाडीघोड्यावर, छकड्यात असे अन् हा मैलोगणती पायी जाई. वऱ्हाडी बैलांच्या चारापाण्याची व्यवस्था केल्याशिवाय त्याच्या पोटात उष्टे खरकटे पडत नसे. दवंडीच्या कामाबद्दल त्याला जे मिळे ते अगदीच किरकोळ असे. पण आपल्याला गावात यायला मिळतं याचं समाधान मोबदल्यापेक्षा त्याला अधिक सुखकर वाटे. गावातल्या अन्य बलुतेदारांनाही त्यांच्या कामाच्या बदल्यात सामान सुमान, धान्य, कापड धोपड दिले जाई.

आता बलुती लोप पावलीत. कुणी कोणतंही काम केलं तरी चालतं. भेदभाव कमी झालाय. पण काहींच्या अंतःकरणात तो विखार अजूनही कायम आहे. कालौघात दवंडीही नष्ट झालीय. मात्र सोशल मिडीयाच्या माध्यमातुन दवंडीचं नवं डिजीटल रूप अवतीर्ण झालंय. फोनची सदी संपलीय. संगणक, स्मार्टफोनच्या गारूडात अवघं विश्व बुडून गेलंय. एक ट्विट करताच आपल्या भावना आपल्याशी जोडल्या गेलेल्या लोकांकडे त्वरित पोहोचतात. ते लोकंही त्यावर व्यक्त होतात. त्यांच्या व्यक्त होण्यावरही काही जण प्रतिसाद देतात. हे सगळं दृश्य स्वरूपात दिसतं. तराळाने दिलेल्या दवंडीचे असेच होते. त्यावर लोक व्यक्त होत पण त्या प्रतिसादांना दृश्यस्वरूप नव्हतं. दवंडीच्या रूपाने पुर्वीच्या गावजीवनात घोषणा होत. ज्यांनी ही दवंडी अनुभवली आहे त्यांच्या स्मृतींच्या कुपीत ती दडलेली असेल. आता सोशल मिडीया गावाच्याही उंबरठ्यावर येऊन धडकलाय. गावाने वाईट वागणूक दिलेला तराळ आता नाहीये, पण आपसात कलह माजवणाऱ्या या डिजीटल नवदवंड्यां गावात

सुकाळ झाल्यास उरला सुरला सलोखाही संपण्याची भीती गावकुसाच्या मातीला वाटतेय.

**हेमंत बापु वाघ**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# युद्ध



आदिम काळापासून आजतागायत युद्ध ही मानवी समूहामध्ये सतत होत आलेली घटना आहे. युद्धाची भयानकता पटवून देण्याची आवश्यकता नाही. अगणित लोकांचे जीवन ते नष्ट करते. सुरळीत दैनंदिन जीवनाची घडी त्यामुळे नष्ट होते. युद्ध मानवी जातीचे अस्तित्वच धोक्यात आणते. युद्ध ही नाविन्याची गोष्ट नाही. मानवी इतिहासाची पाने युद्धाच्या घटनांनी भरलेली आहेत. पूर्वी युद्ध ही सतत आणि सर्वत्र घडणारी घटना होती. मानवी इतिहासात युद्ध विरहीत असा कोणताही कालखंड नाही.

"तुम्हास शांतता पाहिजे असेल तर युद्धाला समजून घेणे आवश्यक आहे." लिडीट हार्डचे हे म्हणने त्याने केलेल्या मानवी स्वभावाच्या अभ्यासाचा परिपाक आहे. सावलीचे महत्त्व उन्हाशिवाय किंवा प्रकाशाची आवश्यकता अंधाराशिवाय स्पष्ट होत नाही. म्हणून खरी शांतता प्रस्थापित करण्यासाठी युद्ध म्हणजे काय? हे समजून घेणे अपरिहार्य आहे. आदि मानवापासून आतापर्यंतच्या उत्क्रांतीमुळे बदलत्या मानवी जीवनात युद्धाचे स्थान कधीच नष्ट झालेली नाही. मानवी सभ्यता आणि संस्कृतीचा विकास युद्धाशी निगडीत आहे. समाजाचे अस्तित्व किंवा विकास युद्धामुळेच नियंत्रित होत आहे. म्हणजेच लहान-मोठ्या, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरूष, नागरीक-सैनिक इत्यादी सर्वांनी युद्धाविषयी महिती प्राप्त करणे जरूरीचे आहे.

- **युद्धाचा अर्थ -**

युद्धाचे विश्लेषण करण्यापुर्वी युद्ध कशाला म्हणतात आणि ते पोलीस कारवाई, नाकेबंदी, बहिष्कार अशा प्रकारच्या कारवायांपेक्षा कसे भिन्न आहे हे पाहणे आवश्यक आहे. युद्ध हा शब्दप्रयोग आजकाल अनेक प्रकारे केला जातो. शितयुद्ध, मर्यादित युद्ध, सर्वंकष युद्ध, पारंपारीक युद्ध, अपारंपारिक युद्ध, यादवी युद्ध, गनिमी युद्ध, प्रतिबंधात्मक युद्ध, राजकिय यद्ध, प्रचार युद्ध, मानसशास्त्रीय युद्ध अशा प्रकारच्या अनेक शब्दप्रयोगाशी आपण परिचित आहोत. पुर्वी युद्ध ही संकल्पना दोन किंवा अधिक सैन्यांतर्गत सशस्त्र संघर्ष यापुरती मर्यादित होती. आज सशस्त्र दलांच्या प्रत्यक्ष वापरा व्यतिरिक्त इतर अनेक प्रकारच्या शत्रुत्वाच्या कृत्यांचाही अंतर्भाव युद्ध या संकल्पनेत होतो. युद्ध हा संकल्पनेची व्याप्ती आता अशाप्रकारे वाढलेली आहे. त्यामुळे युद्धाची मर्यादित दृष्टीकोनातून आणि व्यापक दृष्टीकोनातून व्याख्या केली जाऊ शकते. इंग्रजी शब्दकोशाप्रमाणे परकिय सत्तेच्या विरूद्ध अगर देशांतर्गत विरोधी गटांच्या विरूद्ध सैन्य दलांचा वापर म्हणजे युद्ध होय.

युद्ध ही स्वतंत्र अशी घटना नसून सातत्याने चाललेल्या राजकीय व्यवहाराचाच तो एक भाग आहे. राजकीय धोरणाचा, शस्त्रास्त्राच्या साहाय्याने झालेला तो अविष्कार असतो. एक लेखकाने म्हटल्या प्रमाणे, "युद्ध ही राजकीय युद्ध ही राजकीय कृती असते, राजकीय परिस्थितीतून ती उद्‌भवते आणि राजकीय हेतूचा तो परिणाम असतो."

युद्ध ही स्वतंत्र अशी घटना नसून सातत्याने चाललेल्या राजकीय व्यवहाराचाच तो एक भाग आहे.

राजकीय धोरणाचा शस्त्रास्त्राच्या साहाय्याने झालेला तो अविष्कार असतो. एका लेखकाने म्हटल्याप्रमाणे, "युद्ध ही राजकीय कृती असते, राजकीय परिस्थितीतून ती उद्‌भवते आणि राजकीय हेतूचा तो परिणाम असतो."

युद्ध हे समूह संघर्षाचे रूप आहे. समूह संघर्ष अनेक प्रकारांनी चालू ठेवले जाऊ शकतात. त्यापैकी युद्ध हा एक प्रकार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात राष्ट्राचे उद्दिष्ट व धोरणे परस्पर विरोधी असतात. त्यामुळे यांच्यात संघर्ष निर्माण होतात. दोन देशातील परस्पर विरोध असह्य होतो किंवा त्यास भयंकर स्वरूप प्राप्त होते. तेव्हाच युद्ध होत असते. काही वेळा एखादे शत्रू स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी युद्धास प्रवृत्त होते. आजचे आधुनिक युद्ध राजकिय उद्दिष्टासाठी, आर्थिक हित साध्य करण्यासाठी किंवा प्रतिष्ठेसाठी लढले जाते. अनेक प्रकारच्या युद्धांपैकी सैनिकी स्वरूपाचे युद्ध महत्त्वाचे असते. सैनिक युद्धात सैनिकांची जमवाजमव करणे, दळणवळणाची व्यवस्था पाहणे, लष्करी साहित्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करणे, शस्त्रास्त्रांची व्यवस्था करणे. लष्करी साहित्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करणे, शत्रुचा प्रदेश व्यापणे व शेवटी जय किंवा पराजय इत्यादी बाबीचा त्यात समावेश असतो. युद्ध हे घोषणा करून किंवा घोषणा न करताही होत असते.

दोन व्यक्तींच्या सक्रिय संघर्षाला मारामारी म्हणतात, दोन व्यक्ती समूहाच्या मारामारीला दंगा म्हणतात, दोन देशांच्या संघर्षास, परस्परांच्या क्रुर हत्या करण्याच्या स्थावर, जंगम मालमत्तेचा विध्वंस करणाऱ्या संघर्षास युद्ध म्हणतात. त्याला अनेक कारणे असू शकतात. परंतु युद्धखोरी हा मानवी स्वभावधर्म आहे. म्हणून जगात युद्धे होत असतात.

देशाच्या सामरिक सामर्थ्यातील विषमता, युद्धाची शक्यता आणि धोका निर्माण करीत असतात. शक्तीशाली राष्ट्रे कमकुवत देशांना धमकीने, आपल्या सामर्थ्याचा प्रदर्शनाने व वेळप्रसंगी सामर्थ्याचा उपयोग करून आपले उद्दिष्ट्य व हित साध्य करून घेत असतात. म्हणून सामर्थ्याची विशेषतः सामरिक सामर्थ्याची स्पर्धा सुरू झालेली आहे. या स्पर्धेचा हेतू आपला दबाव व प्रभाव निर्माण करणे असतो. यशाचा बिंदू नसलेली ही स्पर्धा आहे तिला मर्यादा नाहीत.

- **युद्धाच्या व्याख्या -**

अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ, भूगोलतज्ञ, मनोवैज्ञानिक, सामाजिक विचारवंतांनी युद्धाची व्याख्या आपापल्या शब्दात निरनिराळ्या प्रकारे केली आहे.

आद्य मानवी सृष्टीचा अभ्यासक मनू म्हणतो, साम, दाम आणि भेद या तिन्ही उपयांमध्ये राजाला यश आले नाही तर सैन्य शक्तीद्वारे युद्ध करावे. सुरूवातीलाच युद्धामुळे शत्रुला जिंकण्याचा प्रयत्न करू नये, कारण युद्ध सुरू झाल्यानंतर या द्विपक्षामध्ये हार-जीत अनिश्चित असते.

जर्मनीचा सुप्रसिद्ध जनरल क्लॉझिवट्झने युद्ध व्याख्येच्या संदर्भात स्पष्ट केले की, "युद्ध म्हणजे निरनिराळ्या साधन संपत्तीची राष्ट्रीय नीती धोरणाला सुरू ठेवण्याशिवाय दुसरे काही नाही."

"प्रतिस्पर्ध्याला आपली इच्छा मान्य करण्यास भाग पाडण्यासाठी बळाचा वापर करून केलेली कृती म्हणजे युद्ध होय."

महान विचारवंत मोल्टके यांच्या विचारानुसार, "युद्ध राज्याचे एक महान कार्य आहे, ते जीवन आणि मृत्युचे स्थान आहे. सुरक्षा आणि विनाशाचा रस्ता आहे. त्याचा अभ्यास अतिशय परिश्रमपूर्वक करणे आवश्यक आहे."

हॉफमन निकरसन यांच्या मतानुसार, "युद्ध हे दोन परस्पर विरोधी धोरणाचे आचरण करणाऱ्या दोन मानवी समाजातील एकत्रित शक्तीच्या त्या प्रयोगाचे नाव आहे की, ज्यामध्ये एक समाज दुसऱ्यावर आपली इच्छा लादतो."

एम.आय. मिडलारस्कीच्या विचारानुसार, "युद्ध हे एक असे संघटित कार्य आहेत की ज्याचा परिणाम अमर्याद भौतिक विनाश आणि जीवनमानाच्या स्तराचा विनाश असतो. तसा अन्य कोणत्याही संकटाद्वारे शक्य नसतो."

मॅलीनोव्हस्की या मानवशास्त्रज्ञाने युद्धाविषयी माहिती देतांना स्पष्ट केले की, आपापल्या धोरणांचे आचरण करतांना उत्पन्न होणाऱ्या त्या विवादास, जो दोन स्वतंत्र राजकीय घटनांच्या संघटित सैनिक शक्तीमाध्यमातून कार्यान्वित होतो, त्याला युद्ध असे म्हणतात.

पामर आणि पार्किन्सच्या विचारानुसार, "शांती तात्पुरत्या संधीप्रमाणे असते जिच्यामध्ये विचारांचा प्रत्येक समर्थक योग्य परिस्थिती प्राप्त करण्यासाठी एक दुसऱ्याला धोका देण्यासाठी तयार असतो."

आपल्या युद्धाच्या अभ्यासात क्विन्सी राईट यांच्या मते, "युद्ध हे संघटित मानवी समाजाच्या संदर्भात कायद्याची अशी स्थिती आणि संघर्षाचे प्रतिक आहे की, ज्यामध्ये कायदेशीर समानता, शत्रूत्व आणि हिंसेचा अतिरेक समाविष्ट आहे."

ब्रिटानिका या शब्दकोषामध्ये परस्परा विरोधी धोरण असलेल्या दोन मानवीय गटांमध्ये संघटित शक्तीचा उपयोग करून एका गटाने आपले धोरण दुसऱ्या गटावर लादण्याच्या प्रयत्नास युद्ध संबोधले आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवहारामध्ये राज्याराज्यांची ध्येय-धोरणे आणि उद्दिष्टे भिन्न-भिन्न असतात. ते परस्पराविषयी सुद्धा असतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य आहे. तो संघर्ष विकोपास जातो. तेव्हा त्याचे स्वरूप भयानक बनते, त्यालाच युद्ध असे म्हणतात.

थोडक्यात युद्धाची व्याख्या करताना स्पष्टपणे मांडता येईल की, एका राष्ट्राने आपली इच्छा दुसऱ्या राष्ट्रावर बळजबरीने, अहिंसात्मकरित्या किंवा हिंसात्मकरित्या लादणे म्हणजे युद्ध होय. युद्धामध्ये भावनांना स्थान नसते. युद्धात इच्छा, आकांक्षांचा संघर्ष महत्त्वाचा असतो. आकांक्षा पूर्तीसाठी निरनिरालया मार्गांचा अवलंब केला जातो. ते मार्ग ज्या स्वरूपाचे असतील तसे स्वरूप युद्धाला प्राप्त होते.

युद्ध क्षेत्रिय, राजकीय, आर्थिक हित किंवा प्रतिष्ठा अशा विविध उद्दिष्टांसाठी लढले जाते. युद्ध हे क्षेत्रिय राजकीय, आर्थिक, सैनिक किंवा मनोवैज्ञानिक स्वरूपाचेही असू शकते. आजच्या युद्धाचे स्वरूप प्रचारात्मक आहे. युद्ध जिंकण्यासाठी प्रचाराचा उपयोग केला आहे.

**कु. संगिता दगडू मोहने**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

# छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांतीविषयी विचार



सामाजिक क्रांतीवाचून राजकीय स्वातंत्र्य मिळाले तर त्याचा लाभ समाजातील उच्चवर्णीय लोकांनाच होणार हे काळ्या दगडावरच्या रेघेइतके स्पष्ट असल्यामुळे शाहू महाराज सामाजिक परिवर्तनाच्या अनेक योजना जाणीवपूर्वक राबवत आलेच होते. सामाजिक क्रांतीची वाटचाल सर्वांगीण सामाजिक विषमतेचे उच्चाटन झाल्याखेरीज सुरूच

होऊ शकणार नाही, हे शाहू छत्रपतींनी पुरते ओळखले होते. जन्माधिष्ठीत श्रेष्ठ कनिष्ठता जी वर्ण व्यवस्थेने समाज जीवनात घट्ट रूजविली होती आणि धर्मसंस्थेने वज्रलेप करून ठेवली होती. तिला सुरूंग लावण्याचा परोपरीने प्रयत्न त्यांनी त्यामुळेच केलेला दिसून येतो.

यापैकी कशावरही शाहू महाराजांचा विश्वास नव्हता. सामाजिक क्रांतीखेरीज राजकीय किंवा आर्थिक क्रांती होऊच शकत नाही आणि झालीच तरी ती चिरस्थायी होऊन तिचे लाभ समाजातील सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोगता येतील हे तर मुळीच संभवत नाही. हे त्यांना ठाऊक होते. स्वातंत्र्य कायमच संकटात असते. सर्व व्यक्तींचा दर्जा, हक्क आणि संधी यांच्या समतेखेरीज स्थिर स्वातंत्र्य संभवतच नाही. या गृहित कृत्यावर शाहू महाराजांनी सर्व धोरण आधारलेली होती.

- **सरंजामशाहीची पाळेमुळे खणून काढली -**

सर्वांना शिक्षण घेण्याची मुभा देणे, पेशवाईतील अनिष्ट रूढी पायंडांना आळा घालणे आणि नोकरशाहीची आधुनिक चौकट निर्माण करून सर्व लोक दृष्टींनी समर्थ व्हावेत आणि त्यांनी आपल्या कारभाराची धुरा स्वतःच सांभाळावी हेच त्यांच्या मते आदर्श चित्र होते. मात्र ब्रिटीशांच्या तावडीतून देश स्वातंत्र्य करण्याचे राष्ट्रवाद्यांचे मार्ग त्यांना दुरगामी पाहता येतो. त्यांच्यावर आधारित सरंजामशाहीवरच त्यांनी प्रहार केला. त्या सरंजामशाहीचा आधार जर साम्राज्यशाहीला कायम मिळत राहील असता तर परकीय राज्यकर्ते इतक्या लवकर या देशातून गेलेच नसते असे म्हटल्यास ते अतिशयोक्ति होणार नाही.

- **अस्पृश्योद्धाराची धोरणे आणि कार्य -**

भारतीय समाजातील सर्वाधिक उपेक्षित आणि वर्ण व्यवस्थेचा चौकटीबाहेर दास गुलामाचे आयुष्य कंठणारा किंबहुना दासस गुलामांपेक्षाही पशूकोटी ीतील जीवनमान वाट्याला आलेला घटक म्हणून तथाकथित अस्पृश्यांचा उल्लेख करता या आणि अशा अनेक व्यावहारिक गोष्टी धाडसीपणे अंमलात आणून शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रमाला युगधर्माच्या योग्यतेस पोहोचवले होते.

- **जातिभेद निराकरण -**

जगामध्ये अन्यत्र कोठेही नसलेली जाति व्यवस्था आणि तद्तर्गत जन्मसिद्ध उच्चनीचता हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण होते. कर्मविपाक सिद्धांताने ती उच्चनीचता गत जन्माशी आणि ईश्वरी इच्छेशी जोडून टाकल्यामाळे सर्वांनी तिचा निमुटपणे स्विकार केला होता. इंग्रजी राजवटीसोबत जो बुद्धी प्रामाण्यवाद आणि व्यक्त स्वातंत्र्य विचार या देशात आला त्यामुळे प्रथमच या व्यवस्थेतील अंगभूत अन्यायाकडे सामाजिक चिंतकांचे लक्ष गेले आणि त्यातील तर्कदृष्टता ध्यानात आली.

- **पुढाकार उच्चवर्णीयांनी द्यावा -**

जातिभेद निर्मुलनाची गरज आहे हे एकदा मान्य केल्यावर दुसरा प्रश्न साहजिकच असा पडतो की या कामी पुढाकार कोणी घ्यायचा आणि त्यांचे चटकन उत्तर असे की, सर्वाधिक बळी पडले. त्या हलके मानल्या गेलेल्यांनीच जातिभेद मोडण्याचा कामी अग्रेसर असावे? पण महाराजांचे मत निराळे होते. त्यांच्या मते या खालच्या मानल्या गेलेल्या लोकांनी त्या दृष्टीने कितीही प्रयत्न केले तरी त्यांचा तादृश उपयोग होणार नाही. उलट फक्त त्यांनीच असे प्रयत्न सुरू ठेवले. महर्षी शिंदे यांच्या शब्दांमुळे सांगायचे तर, "भेटी व्यवहारात नव्हे तर उघड उघड रोटी व बेटी व्यवहारातही शाहू महाराज स्वतः छाती ठोकून जितके तयार होते त्याहून जास्त तयार मला दुसरा कोणीही लोकनायक दिसला नाही."

- **जातिपरिषदांचे स्वागतार्ह कार्य -**

प्रत्येक जातीने स्वतःच्या संघटना करून त्यांच्याकरवी साहजिकच हिताचे उपक्रम करवून

घेण्यास संख्येत वाढ होत असल्याची वस्तुस्थिती नोंदवून महाराज म्हणतात, "काही पर्यायांपर्यंत जातिभेद व जात्याभिमान सुटत नाही.... (पण) ज्या समाजात आपण वाढतो त्या समाजाला अभिमान वाटला पाहिजेत. त्या समाजाच्या बाहेर एक मोठा फारच मोठा समाज आहे व त्याचीही सेवा आपण केली पाहिजे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. म्हणूनच जातीचा अभिमान अगदी मर्यादीत असावा. ...... जात्याभिमान हा परिषदांनी जातिभेद, जातिमत्सर व जातितद्वेष तीव्र करण्याचा खटाटोप करता कामा नये, असा इशाराही महाराजांनी वारंवार दिला आहे."

- **जातिभेदावर आंतरजातीय विवाहांचा तोडगा -**

जातिभेद नष्ट कसा करता येईल यासंबंधी शाहू महाराजांनी अनेक दिशांनी विचार केलेला दिसून येतो, त्यालाच एक मार्ग भिन्न जाती मध्ये शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर निर्माण होणे हा त्यांना दिसत होता. रोटी व्यवहारास जितक्या सहजपणे समाजमान्यता मिळण्याची शक्यता होती. तेवढी ती बेटी व्यवहाराबाबत नव्हती हे ते जाणून होते. त्यामुळेच त्यांनी या बाबतीत कायद्याचा जास्तीत जास्त वापर करून घेण्याचा निर्णय घेतला. त्या कायद्यानुसार संघर्ष पेटला होता.

- **ब्राम्हण वर्चस्वाला शह -**

समाजातील भिन्न जातींच्या दर्जामध्ये आणि अधिकारांमध्ये तफावत जेवढी जास्त असेल तेवढा तो समाज विघटीत राहण्याची शक्यता मोठी असते. हे ओळखून शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामध्ये काही बदल करण्याचे ठरवले. सर्वच सरकारी विभागांमध्ये विशेषतः शिक्षण विभागामध्ये ब्राम्हणवर्गाचा अधिक भरणा असल्यामुळे तिथे खोडसपणा करण्याची भरपूर संधी त्याला मिळत. म्हणून त्या विभागाची आमुलाग्र फेररचना करणे छत्रपती शाहूंना अगत्याचे वाटत होते.

- **कुलकर्णी वतने बंद केली -**

रयतेत विद्येचा प्रसार होऊ लागल्याने तिला जास्त हक्क देण्याची वेळ आली आहे. या जाणीवेतून शाहू महाराजांनी बिकानेर, त्रावणकोर, वगैरे संस्थांप्रमाणे प्रजेला ग्रामपंचायती देण्याचा निर्णय घेतला आहे. हे त्यांच्या प्रत्ययास आले होते. अशाप्रकारे दलित, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक शुद्रादी बहुजन समाज आणि स्त्रिया यांच्यावर पुत्रवत प्रेमाचा वर्षाव करून पुत्र वियोगाचा दुःखावर महाराजांनी मात केली.

**कु. वळवी प्रियंका खुमा**
**एस.वाय.बी.ए.**

*****

## स्त्री सबलीकरण



स्त्री अधिकारवाढ किंवा स्त्रीवाद यास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या विचारसरणीत सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात स्त्री-पुरूष समानता स्थापित करणे आणि शोषणुक्त समाजाची स्थापना करणे अभिप्रेत आहे. स्त्री अधिकारवाद हा लिंगभेदावर आधारित पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध करतो व पुरूष प्रधान व्यवस्थेच्या विरूद्ध आवाज उठवितो. स्त्री हक्कासाठी व आवाज उठविण्याची सुरूवात हीच स्त्रीवादी चळवळीची आणि विचारसरणीची सुरूवात करू शकते. स्त्री ही कोणत्याही देशाची, वर्गाची, जातीधर्माची यांच्यात एक

भगिनीसमाज वृत्ती निर्माण करू. सर्व स्त्रियांनी अन्यायी पुरूष वर्गाविरूद्ध एकत्रितपणे लढा उभारणे व स्त्रीमुक्त प्राप्त करणे हेच या चळवळीचे ध्येय आहे.

स्त्रियांना पुरूषांबरोबर समानतेची वागणूक व हक्क प्राप्त करून देणे व परंपरागत पारतंत्र्यातून स्त्रीला स्वातंत्र्य मिळवून देणे हीच स्त्रीवादाची नवीन परिभाषा आहे. त्यामुळे स्त्रीवाद ही केवळ एक विचारसरणी वा विचारप्रणाली नसून ती स्त्री मुक्ती चळवळ देखील आहे.

२१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना राजकारणात आणि समाजकारणात पुन्हा स्त्री सबलीकरणाचा प्रश्न उभा राहतो व त्यासाठी वेगवेगळ्या योजना, कार्यक्रम, सोयीसुविधा, विविध कायदे करून स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न केले जातात. सर्व देशाच्या राजकीय प्रक्रियेत स्त्री सबलीकरण हा परवलीचा शब्दप्रयोग ठरला आहे.

स्त्रीवादी चळवळीची ती प्रमुख मागणी ठरते. स्त्री जोपर्यंत सबल होत नाही तोपर्यंत ती शोषण मुक्त होऊ शकत नाही आणि जोपर्यंत ती शोषण मुक्त होत नाही तोपर्यंत ती सबल होणार नाही. आणि ती सबल झाल्याशिवाय ती स्वतंत्र होऊ शकणार नाही. म्हणूनच स्त्रीवादी विचारांचा अभ्यास करतांना स्त्री सबलीकरणाचा आढावा घेणे आवश्यक ठरते.

स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रीला बलवान करणे. तिला बलवान होण्यासाठी बळ देणे आवश्यक आहे व ते बल ही सत्ता मिळाल्याशिवाय शक्त्‍ नाही. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय.

स्त्री सबलीकरणाच्या मार्गातील अडथळे म्हणून दारिद्र्य, अज्ञान, अंधविश्वास, गुलामगिरी इत्यादी घटकांचा उल्लेख करता येईल. त्यांचे निर्मुलन करण्यासाठी सुचारीत सुनियोजित योजनांचा अवलंब व्हावा. सामाजिक सुधारणांचा वेग वाढवावा. शिक्षणाचे प्रमाण सुधारावे. घटनात्मक उपाययोजनांची नीट अंमलबजावणी व्हावी. त्याचबरोबर जाणीव जागृती करून राजकीय ईच्छाशक्तीचा वापर करून स्त्रियांचा राजकीय सहभाग कसा वाढेल या दृष्टीने प्रयत्न व्हावेत.

**सुनिता फोना पाडवी**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# स्त्री-वादापुढील आव्हाने



स्त्री मुक्त होण्यासाठी एकूणच प्रस्थापित समाज व्यवस्थेत सर्व अर्थाने परिवर्तन अभिप्रेत आहे. कोणत्याही व्यवस्थेत येणारी परिवर्तन ही भाषा, साहित्याच्या माध्यमातून येतात. तेव्हा भाषा आणि साहित्यातील पारंपारिक स्त्री विरोधी भूमिकांची मांडणी बदलावी लागेल. संस्कृतीचा कणा तिचे नीतीमूल्ये संस्कार हे असतात. म्हणूनच म. फुले, डॉ. आंबेडकर नवीन समाज व्यवस्थेची मांडणी करतांना परंपरागत समाज व्यवस्थेचे आधार असलेल्या ग्रंथावर टिका करतात. त्यांची होळी करतात. स्त्रीमुक्ती चळवळीला देखील असा पद्धतशीर प्रयत्न करणे आवश्यक आहे. या संदर्भात बऱ्याच प्रमाणात वैचारिक मांडणी होत आहे. परंतु त्यात विस्कळीतपणा मोठ्या प्रमाणावर आढळतो.

स्त्रीमुक्त चळवळ सक्षम होण्यासाठी या चळवळीचा आधार असलेली स्त्री खऱ्या अर्थाने सक्षम करणे आवश्यक आहे. म्हणून स्त्री सबलीकरणावर

अधिकाधिक भर देणे, सर्व क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग वाढविणे आवश्यक ठरते.

आधुनिक काळातील स्त्री ही प्राप्त परिस्थितीवर मात करून पुरूषांच्याबरोबर सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. स्त्री स्वातंत्र्यामुळे स्त्रीच्या पदरी काही प्रमाणात यशस्वीताही आली आहे. मात्र असे असले तरी प्रस्थापित पुरूषप्रधान सत्ता मुकपणे याचा स्वीकार करेल अशी परिस्थिती ती अशी परिस्थिती आहे. उलट पारंपारिक धर्मवाद, कर्मकांड, बुवाबाजी इत्यादीद्वारे प्राचीन पुरूषप्रधान व्यवस्था कायम व स्थिर ठेवण्याचा प्रयत्न पुरूष व्यवस्थेकडून जोमाने होत आहे. त्यास शह देण्याची क्षमता अद्याप स्त्री चळवळीत दिसत नाही.

स्त्री मुक्ती याचा चुकीचा अर्थ अनेकदा घेतला जाऊन पुरूष वर्गाविषयी गैरसमज, त्यांच्याशी असणारी असहयोग वृत्ती यामुळे स्त्री चळवळ एकाकी पडण्याची भिती व्यक्त केली जाते. स्त्रीमुक्ती म्हणजे पुरूष वर्गाचा द्वेष ही नकारात्मक भूमिका काढून टाकून पुरूष वर्गाच्या सहकार्याने स्त्री प्रगती घडवून आणता येऊ शकते यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

स्त्रीवादी वा स्त्री चळवळीच्या काही घटकांकडून पुरूष वर्चस्वास विरोध म्हणून एकाकी भूमिका दुसऱ्या अतिरेकी भूमिकेचा स्वीकार केला जातो. स्त्री स्वातंत्र्याऐवजी स्वैराचाराचा स्वीकार करू लागते व विवाह, कुटुंब संस्था नाकारते. त्यातून नवीनच समस्या जन्माला येतात. स्त्री स्वातंत्र्य होण्याऐवजी अधिक असुरक्षित होण्याची शक्यता वाढते. त्यातूनच स्त्रीच अनेकदा बळी ठरल्याची उदाहरणे आढळतात.

स्त्रीवादी चळवळीसमोर भीषण प्रश्न आहे. तो स्त्रियांची कमी होणारी लोकसंख्या, स्त्री भ्रूणहत्या, बलात्कार, लैंगिक शोषण, मातृत्व नाकारण्याची वृत्ती, गर्भपातांचे वाढते प्रमाण, कुटुंब संस्था, विवाह संस्था नाकारण्याची वृत्ती, कुमारी माता होण्याची तयारी इत्यादी सर्व मार्गारेट मीड यांनी यासाठी स्त्रीने संयमी वृत्तीने वागावे यावर भर दिला आहे. म्हणून पुरूष वर्गाचा तिरस्कार हा या चळवळीचा आधार न राहता पुरूष सहयोगातून स्त्री मुक्ती, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे याची जाणीव ठेऊन स्त्री चळवळ ही हितसंबंधी गट वा दबावगट म्हणून भूमिका संपन्न करू शकते व स्त्रीशक्ती हा आधार बनून राजकीय व्यवस्थेत सक्रीय होऊन आपले अधिकार, हक्क, स्वातंत्र्य प्राप्त करू शकते. स्त्रीवादी चळवळीचे त्या दृष्टीकोनातून अजून खूप मोठा पल्ला गाठावयाचा आहे. जागतिकीकरणाच्या वेगवान परिवर्तनाच्या काळात त्यास अधिक गती येईल व स्त्री-पुरूष समानतेवर आधारित नागरी व्यवस्था प्रस्थापित होऊन मानव जातीचे भवितव्य उज्ज्वल ठरेल. म्हणून काही उपाययोजना आखणे देखील आवश्यक आहे.

- **उपाययोजना -**

१) स्त्रीमुक्ती बरोबर स्त्रीशक्ती विकसित होण्यासाठी स्त्रीचे सबलीकरण होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी विस्कळीत स्वरूपात असलेली स्त्री चळवळ एकसंघ स्वरूपात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहेत.

२) स्त्री चळवळ ही दबावगटात रूपांतरीत झाल्याशिवाय स्त्रियांना त्यांचे हक्क प्राप्त होणार नाहीत. म्हणून स्त्रीशक्ती म्हणून ही चळवळ वाढली पाहिजे.

३) आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर मान्यता दिलेले अधिकार स्त्रियांना कसे उपभोगता येतील म्हणून उपाययोजना झाली पाहिजे.

४) शासकीय पातळीवर लैंगिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना झाली पाहिजे.

५) मुलांबरोबर मुलींनाही समान हक्क वागणूक मिळाली पाहिजे.

६) शासकीय प्रयत्नांबरोबर स्थानिक पातळीवर संघटनात्मक प्रयत्न होऊन स्त्री संघटनांची

उभारणी केली पाहिजे व त्याद्वारे स्थानिक स्त्री विकासाचे कार्यक्रम आखले पाहिजेत.

७) जागतिकीकरणासोबत माहितीचा प्रस्फोट झाला आहे. तेव्हा माहितीचा अधिकार वापरून ज्ञानाधिष्ठीत निर्मितीसाठी प्रयत्न झाले पाहिजे.

८) शिक्षणाचा हक्क, कायद्याचे ज्ञान, अधिकार प्राप्ती इत्यादीसाठी आर्थिक तसेच अन्य धोरणांद्वारे अंमलबजावणी करून अधिकाधिक स्त्री शक्तीकरण घडवून आणल्याशिवाय स्त्री मुक्तीचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. म्हणून तसे प्रयत्न केले जावेत.

**वसावे रविता किर्ती**
**एस.वाय.बी.ए.**

*****

# घटकराज्यांतर्गत राजकारणातील बदलते प्रवाह आणि भारतातील लोकशाही



१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर भारताने घटना निर्मितीची प्रक्रिया देखील लोकशाहीस अनुरूप स्वीकारली. प्रत्येक कलम स्वीकारतांना व त्यात बदल करतांना लोकशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. १९५२ पासून ते आजपर्यंत भारतात ज्या निवडणूका पार पाडल्या त्यात शांततेने बदल झाले. जगातील निवडणूका व सत्तेत शांततामय मार्गाने झालेला बदल जनतेच्या मतास अनुसरून सत्ताधिशांना दिलेले राजीनामे पाहता भारतात लोकशाही स्थिरावलेली आहे, असे दिसते. यशस्वी लोकशाहीच्या औपचारिक अटी भारतीय लोकशाही पूर्ण करते. यशस्वी लोकशाहीसाठी दोन गोष्टींची पूर्तता होणे गरजेचे आहे. एक म्हणजे सत्तेसाठी खुली स्पर्धा आवश्यक आहे. सत्ता प्राप्तीसाठी घटनेने दिलेला एक निश्चित मार्ग आहे. त्या मार्गाचाच अवलंब करावा लागतो. सत्ता प्राप्त करण्याची संधी सर्वांनाच आहे. लोकशाही सिद्धांतानुसार सत्तेवर असणाऱ्या गटात पुन्हा सत्तेवर राहण्यासाठी निश्चित मुदतीनंतर स्पर्धेत असण्यासाठी सत्तेच्या स्पर्धेत असणाऱ्या इतर राजकीय गटांबरोबरच स्पर्धा करावी लागते. दुसरी अट आहे सहभाग. यानुसार नागरीक मोठ्या प्रमाणात निर्वाचन प्रक्रियेत सहभागी होतात.

१९९६ नंतर भारतात प्रादेशिक पक्ष महत्त्वाचे ठरले आहेत. एच.डी. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार हे प्रामुख्याने प्रादेशिक पक्षांचे सरकार होते. तेव्हापासून प्रादेशिक पक्षांची भावना संकुचित झाल्याचे दिसते. घटक राज्यातील प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय राजकारणात सुद्धा प्रभावी भूमिका घेत आहे. भारतीय लोकशाहीच्या बाबतीत अमेरिकेच्या कार्नेल विद्यापीठातील प्रोफेसर क्लीस्टन रॉसिटर यांनी असे म्हटले आहे की, मी जन्मभर राज्यशास्त्र शिकविले आहे पण लोकशाही नांदलेली समाज व्यवस्थेला आवश्यक मानल्या गेलेल्या घटकवयांचा मागमूस नसतांना कुठेही लोकशाही नांदलेली मी पाहिली नाही. परंतु या सिद्धांताला भारत हा एकच अपवाद आहे.

- **राज्यांतर्गत पक्षिय राजकारण आणि लोकशाही प्रक्रिया -**

१९६७ साली भारतातील सोळा राज्यांत विधानसभा निवडणुका झाल्या. त्यापैकी बिहार, केरळ, मद्रास, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि

पश्चिम बंगाल या आठ राज्यात काँग्रेसला निरपवाद बहुमत मिळाले नाही आणि अनेक विरोधी पक्षांची संयुक्त सरकारे उभी राहिली. इतर राज्यातीलही त्या पक्षाची आमदारांचे संख्याबळ घटले. १९६७ पासून तर आजपर्यंतच्या निवडणूका होईपर्यंतच्या काळातील भारताच्या राजकीय व संसदीय क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणून राज्याराज्यातील आघाड्यांच्या सरकारचा उल्लेख करावा लागेल. या आघाड्या कोणत्याही तत्त्वांवर, तत्वज्ञानावर व कार्यक्रमावर झालेल्या नव्हत्या तर केवळ भिन्न विचारसरणीचेच नव्हे तर अनेक परस्परांचे हाडवैरीही होते.

दिर्घकाळ या देशात केंद्र व राज्ये या दोन्ही पातळयांवर काँग्रेस पक्षच सत्तेवर राहिल्यामुळे विरोधी पक्षांमध्ये तीव्र हताशा झाली होती. काँग्रेस विरोधाचेच राजकारण त्यांच्यापैकी अनेक पक्षांनी चालविल्यामुळे त्या नकारात्मक आधारावर येऊन काँग्रेसला सत्तेवरून खेचण्याचे मनसुबे त्यांनी बरेच वर्ष रचले होते. परंतु १९६७ नंतरच्या निकालांनी राज्यसभेचया संरचनेत पायाभूत बदल झाले. याचा परिणाम विरोधी पक्षांना किमान काही राज्यात तरी सत्तारूढ होण्यास संधी मिळाली. काँग्रेसेत्तर अति उजव्यांपासून आणि अति डाव्यांपर्यंतच्या राजकीय पक्षांनी आपले तत्त्व वैचारिक कंगोरे बोथट करून परस्परांशी हातमिळवणी केली. अनेक आमदारांनी आपल्या पक्षनिष्ठा रात्रीतूनच नव्हे तर तासातासांनी बदलून मंत्रीपदे मिळविली. या पक्षांतरासाठी अनेक मानसशास्त्रीय तसेच सामाजिक व आर्थिक कारणे होती. पण त्यामुळे आघाड्यांच्या सरकारमध्ये कमालीचे अस्थैर्य निर्माण झाले. मार्च १९६७ ते १९७१ या कालावधीत एका पाठोपाठ अशी ३२ सरकारे कोसळली. ही अभूतपूर्व किमया पक्षांतराची होती. एका आमदाराने ५ वेळा पक्ष बदलला होता आणि त्याने ५ दिवस मंत्रीपद उपभोगले. अनेक पक्षांतरे सत्तारूढ आघाडीतल्याच एका पक्षातून दुसऱ्या पक्षात झाल्याची उदाहरणे आहेत. यात काँग्रेस पक्षही फार मागे नव्हता.

१९८९ पासून आघाड्यांच्या राजकारणाचे भारताच्या राजकारणातील दुसरे पर्व त्रिशंकु लोकसभांमुळे झाले. जे घटकराज्यांच्या पातळीपर्यंत सीमित होते व केंद्र पातळीवरही घडून आले. १९८९ आणि १९९१ या दोन लोकसभा निवडणूका म्हणजे भारतीय राजकारणातील दुसऱ्या आघाडी पर्वाची नांदी होती. अनेक प्रादेशिक पक्ष राज्यात काँग्रेसला पर्यायी शासन किंवा प्रभावी व स्थायी असा विरोध देऊ शकले नसले तरी त्यांनी स्वातंत्र्य व लोकशाहीचा संदेश कानाकोपऱ्यात नेऊन पोहोचविला हे अमान्य करता येणार नाही. राजकीय शिक्षण देण्याचे त्यांचे काम कमी महत्त्वाचे नाही. अनेक स्थानिक लोकांच्या गरजा व महत्वाकांक्षा लक्षात घेऊन त्यांनी स्थानिक स्वरूपाच्या संघटना स्थापन केल्या. काँग्रेस पक्षातून बाहेर पडलेल्या काही गटांनी वेगळ्या पक्षाची स्थापना केल्यावर ते जास्त काळ टिकू शकले नसले व एक तर परत काँग्रेसमध्येच ते सामिल झाले किंवा विरोधी पक्षात विलीन झाले असले तरी काहींनी पक्षातील बेबंदशाही व राजकीय भ्रष्टाचार निपटून काढण्याचा प्रयत्न केला. काही राज्यातून प्रादेशिक पक्षांनी उत्तम व कार्यक्षम शासन दिले. उदा. पंजाब, तामीळनाडू, आंध्रप्रदेश व पश्चिम बंगाल इ. बंगाल मध्ये स्थानिक डाव्या पक्षांची युती मार्क्सवादी, साम्यवादी पक्षांनी घडवून आणली. केरळातही अशा युती आढळतात. ओरीसा, बिहार व महाराष्ट्र या राज्यात राष्ट्रीय पक्षांना त्यांच्यावर अवलंबून राहणे भाग पडले.

- **विभागीय असमतोलाच्या राजकारणाचे अविष्कार आणि भारतीय लोकशाही -**

भारतात काही प्रादेशिक पक्षांना राष्ट्रीय पक्षाची पार्श्वभूमी नाही. आपल्या समाजाच्या किंवा समुदायाच्या हितसंबंधाची जपणूक करण्यास जे पक्ष निर्माण झाले. उदा. द्रमुक, अन्नाद्रमुक, अकाली.

सामुदायीक हितसंबंधावर त्यांचे बळ निर्माण झाले असले तरी अशा पक्षांच्या विकासात काही विशिष्ट व्यक्तींचा बराच प्रभाव पडला. प्रादेशिक पक्षांविरूद्ध राष्ट्रीय पक्ष किंवा त्यांच्या स्थानिकत्वाबद्दल व संकुचितपणाबद्दल कांगावा केला असला तरी त्यांच्या या विशेष करून काँग्रेस पक्षाच्या विरोधात जनमत गेल्याने प्रादेशिक पक्षांना महत्त्व प्राप्त झाले आणि त्यांना स्थायीकत्व लाभले. कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र येथील प्रादेशिक पक्षांचे बळ वाढण्यापुर्वी ती राज्ये काँग्रेसचा बालेकिल्ला होती. परंतु आपापसातील हेवेदावे केंद्र सरकारचा घटक राज्यामध्ये अनावश्यक हस्तक्षेप अशा काही कारणांनी काँग्रेसचा पराभव सहज शक्य झाला. शिवाय स्थानिक अस्मितेवर व सांस्कृतिक अलगीकरणावर भर देऊन प्रादेशिक पक्षांवर आपली स्थिती मजबूत करून घेतली. आसामच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची केंद्राची वृत्ती होती. तेथे लोकमत इतके विरोधात गेले की, आसाम गणतंत्र परिषदेने निवडणुकीवर मोठ्या प्रमाणात बहिष्कार यशस्वी केला. कालांतराने या पक्षाचे तेथे शासन निर्माण झाले.

१९९६ साली १४ प्रादेशिक पक्षांनी संसदेत आपले स्थान मिळवून घेतले. त्यापैकी शिवसेना, अकाली दल, हरीयाणा विकास पार्टी, गोमातक पक्ष अशा ११ प्रादेशिक पक्षांचा पाठींबा मिळवून घेतला. बसपा या युतीत सामील झाला नाही व तटस्थ राहिला. प्रमुक तेलगु देसम, आगाप, तामिळ मणिला काँग्रेस व उत्तर प्रदेशातील समाजवादी पार्टी या प्रादेशिक पक्षांनी हे गठबंधन तयार करण्यास विशेष पुढाकार घेतला. अशाप्रकारे प्रादेशिक पक्ष केंद्रिय राजकारणात बरेच प्रभावी ठरले आहेत.

- **राज्यांतर्गत स्थानिक राजकारणाचे बदलते स्वरूप आणि लोकशाही -**

महाराष्ट्रातील स्थानिक शासन यंत्रणेत शहरी भागासाठी मनपा, नगरपालिका व काही कॅन्टोटमेंट क्षेत्रासाठीची कॅन्टोन्ट बोर्डस तर ग्रामीण भागात गाव पातळीवर ग्रामपंचायती, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना आहे. १९५८ च्या कायद्यानुसार ग्राम पंचायती अस्तित्वात आल्या आहेत. बलवंतराय मेहता समितीच्या अहवालानंतर महाराष्ट्र सरकारने वसंतराव नाईक समिती नेमली व तिच्या अहवालानुसार (१९६१) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची स्थापना करण्यात आली. स्थानिक शासनाचा घटनात्मक दर्जा देणाऱ्या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीने देशभरातील स्थानिक शासनाच्या रचनेत व अधिकारातही काही बदल केले. वेळेवर निवडणूका घेण्याचे बंधन, राखीव जागा, आर्थिक उत्पादनाची निश्चिती आणि राज्यांतर्गत अधिकार विभाजन ही या दुरूस्तीची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.

सन २०११ मध्ये काही राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणूका झाल्या तर काही राज्यांतून वेगळ्या राज्यांच्या मागण्यापुढे आल्या. तेलंगणाची मागणी होतच आहे. परंतु आसाम आणि पश्चिम बंगालमधून आधीपासून होत असलेल्या मागण्या पुढे येत आहेत. बंगालमध्ये गुरखा लँण्डची मागणी करणाऱ्या नेत्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि केंद्रिय गृहमंत्री पी. चिदंबरम यांच्याशी चर्चा होऊन गुरखा विकास परिषदेला त्याला बजेट आणि त्यांच्या अखत्यारीत ज्यादा विषय देण्यात आले. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती यांनी उत्तर प्रदेश विभाजनाचा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात सोडून दिला आणि त्यांची तिथली ३४ वर्षांची राजवट संपुष्टात आली. तमिळनाडूत यंदा बहुचर्चित सत्तांतर झाले. तेथे द्रमुक नेत्या जयललीता १० वर्षानंतर पुन्हा मुख्यमंत्री बनल्या. राजस्थापनात कधी गुर्जर आंदोलन, कधी जातीय दंगल, तर कधी भ्रष्टाचाराचे आरोप यामुळे काँग्रेसला हादरे बसले.

अशा पद्धतीने स्थित्यंतर लोकशाहीला पोषक आहे. नव्या सामाजिक शक्तींचा निवडणूक प्रक्रियेतील प्रवेश राजकारणावर परिणाम केल्याखेरिज राहणार नाही.

**सुवर्णा पांडूरंग इंगळे**
**एफ.वाय.बी.ए.**

*****

# शेतकऱ्याची आत्महत्या : कारणे आणि उपाययोजना



भारत हा कृषीप्रधान देश असून भारतात अगोदर ८०% लोक शेतीचा व्यवसाय करीत होते. त्यातील १०% शेती येथील औद्योगिकीकरण व गृहनिर्माण संस्थांसाठी गेली असल्यामुळे ७०% लोक शेतीचा व्यवसाय करतात. त्यामुळे शेती हा चालीस अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. भारतीय राजकारण आणि अर्थकारणात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राची भूमी ही साधूसंतांची पवित्र भूमी आहे. म्हणूनच की काय? येथील शेतकरी देखिल नितीवान धार्मिक श्रद्धाळू तसेच परंपरावादी आहेत. प्रत्येकाचे विचार आणि वर्षानपद्धत वेगवेगळी असल्यामुळे शेतकरी संघटीत होत नाही. झालेच तर राजकीय पक्ष त्याची फोडाफोडी करतात. घरातील माणसांवर प्रेम करणारा शेतकरी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता आपले जीवन संपवून घेत आहेत. कारण शेतकऱ्यावर कर्जाचा डोंगर कोसळला असून अनंत अडचणींवर कसा तरी मात करीत शेती करताना निसर्गाच्या लहरीपणामुळे वाढत्या महागाईमुळे शेतकरी कुटुंबाचा शेवट जीवन जगणेच कठीण झाले आहे.

- **शेतकऱ्याची आत्महत्येची कारणे -**

**पर्जन्यमान -** भारतीय शेती मान्सूनचा जुगार मानला जातो. पावसाच्या बाबतीत प्रादेशिक विषमता आढळते. पीक काढण्याच्या वेळी पाऊस येणे, पाऊस पडून पूर-महापूर येऊन शेतीचे अतोनात नुकसान झाल्यान शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होते. हे एक शेतकऱ्याच्या आत्महत्येला कारण ठरू शकते.

**जलसिंचन सुविधेचा अभाव -** जलसिंचन सुविधेचा अभावामुळे देखिल शेतकरी आत्महत्या करू लागला आहे. कारण जलसिंचनाअभावी उत्पन्नात घट होते. यातून बियाण्यांचा देखील खर्च निघत नाही. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात कोरडवाहून शेती केली जाते.

**शेतीपूरक व्यवसायाचा अभाव -** भांडवलाची अडचण बँकाचा पतपुरवठा कमी यामुळे शेतीपूरक व्यवसाय अडचणीत येत आहे. शेतकरी शेती उत्पन्नातून आपल्या गरजा भागावू शकत नाही. तेव्हा पुर्वी काढलेले कर्ज तो कसे फेडणार? बँकांकडून व सावकारांकडून होत असलेला पैशांसाठीचा तगादा इत्यादी कारणे आत्महत्येस कारणीभूत ठरतात.

**शेतकऱ्यांच्या मालाला भाव कमी -** केंद्र व राज्य सरकार यांनी जाहिर केलेल्या शेतमालाच्या भावामध्ये सुसुत्रता न्सते. तसेच राजकीय शासकीय भावाने शेतमालाची विक्री होतांना दिसत नाही. व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची लूट होते. कापसाचे एकरकमी चुकारे मिळत नाही. एकंदरीत पाहता उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा भाव कमी असतो. अशाप्रकारे शेतीमध्ये आरिष्ट निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

**उत्पन्न कमी -** शेतीपूरक व्यवसायाचा अभाव रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. शेतजमिनीचे धारण क्षेत्र कमी यामुळे खर्चाची तोंड मिळवणी होत नाही.

**कृषी खर्चात वाढ -** कृषीमध्ये आवश्यक असलेली आदाने, त्यांचे वाढलेले प्रचंड भाव, बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, मजूरी, माल वाहतुक इ. साधने या सर्व साधनांच्या किंमती वाढत्या आहेत. शेतमालाच्या किंमती वाढल्या पण त्या आदानांच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे खर्च व कृषीमूल्य समतुल्य झाले. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न खर्चापेक्षा कमी असल्याने शेतकरी वैफल्यग्रस्त झाला आहे. या वैफल्यातून तो आत्महत्या करीत आहे.

**थकबाकीची समस्या -** शेतकरी बँकेकडून कर्ज घेते पण शेतकऱ्याला ते कर्ज फेडणे शक्य होत नाही. तीन वर्षात एखादे वर्ष शेतकऱ्यांना समाधानी जाते. असा निष्कर्ष काढला जातो. तेव्हा शेतकरी प्रत्येक वर्षी कर्ज फेडू शकत नाहीत. परिणामी त्याला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. सावकारांचे दाम दुप्पट होत राहाते. शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडतो. शेवटी तो आत्महत्या करतो.

**शेतकऱ्यांचा अज्ञानपणा -** शासन ज्या योजना राबवते त्या योजनांचे शेतकऱ्यांना परिपूर्ण ज्ञान नसते. म्हणून त्याचा फायदा सावकार व्यापारी आडत दुकानदार, भोंदू लोक अज्ञानाचा फायदा घेतात. त्यास शेतकरी बळी पडतो. पण या सर्वांचा परिणाम शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढवण्यात होत आहे.

**दारिद्र्य -** अठरा विश्व दारिद्र्य हे शेतकऱ्याच्या पदरी आहे. त्याची गणना दारिद्र्यात केली जाते. त्याची आर्थिक स्थिती नाजूक असते. त्यात थोडीही ढवळाढवळी झाली तर त्याला त्याचा फटका बसतो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे दारिद्र्य त्याला जीवनाबद्दल उदासीन व बेजबाब दार बनविते म्हणून ते आत्महत्येस प्रवृत्त ठरतो.

**नवे शेतीतंत्र -** मध्यम लहान शेतकरी पारंपारिक पद्धतीने शेती करतात. ते श्रमसंस्कृती हीच आपली जीवनशैली मानत. पण नव्या शेती तंत्रामुळे शेती जुगार झाला आहे. आंध्रप्रदेशातील आधुनिक कृषी तंत्राने शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडते. नवतंत्रज्ञानात भांडवल गुंतवणे, बाजारपेठेवर अवलंबून राहणे, शेतीपूरक व्यवसायावर मर्यादा येतात. हे परिणाम यामध्ये होतात. यामध्ये मध्यम व लहान शेतकरी भरडले जातात. त्याची परिणीती आत्महत्येस होते.

**सरकारी धोरण -** शेतकऱ्यांवरील आत्महत्येचे संकट हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सरकारी धोरणामध्ये आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने जे शेती विषयक धोरण राबवले. ते अप्रत्यक्षपणे पण व्यापक स्वरूपात आत्महत्येस जबाबदार आहे. गेल्या १९५० ते १९९० या ४० वर्षात शेती संबंधीच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला असता तर आज हे संकट आले नसते.

**शेती विषयक राष्ट्रीय धोरणाचा अभाव -** शेतीसाठी राष्ट्रीय धोरण नाही. उलट निर्यातीवर मर्यादा व आयातीला प्रोत्साहन आहे. शेती विषयक कायदे, पीक विमा, सवलती, विज विषयक धोरण, कर्ज पुरवठा यामध्ये नव्या सुधारणा घडवून आणण्यास असे सरकारला वाटत नाही. सरकारचे धोरण व शेतकऱ्यांचे मरण अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो आहे.

**नियोजनाचा अभाव -** शेती म्हणजे उपजीविकेचे साधन आहे अशी आशा आपल्या समाजाची संकूचित धोरण आहे. कोणते पीक कधी घ्यावे? कसे घ्यावे? माल कुणाकडे विक्री करावा? खर्च उत्पन्न याचा हिशोब नसणे. धर्मावर, आरोग्यावर किती खर्च करावा याचा ताळमेळ शेतकऱ्यांकडे नसतो.

**आर्थिक टंचाई -** पीक बुडाल्यास बँकांची थकबाकी असल्यास रोजगार उत्पादन इत्यादी उत्पन्नाचे

मार्गच बंद पडल्यास शेतकऱ्यांना आर्थिक टंचाईचा सामना करावा लागतो. तेव्हा आर्थिक मदत न मिळाल्यास दैनंदिन खर्चाच्या समस्येमुळे तसेच अचानक उद्‌भवलेले आजार, भांडण इत्यादी शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करतात.

**इतर -** संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, असाध्य आजार, व्यसनाधिनता, प्रक्रिया उद्योगाचा अभाव, गाव पातळीवरील राजकारण, अकार्यक्षम कृषी उत्पन्न बाजार समित्या, शेतकऱ्यांचे परावलंबित्व हे देखिल शेतकरी आत्महत्येस कारणीभूत घटक आहेत.

- **आत्महत्येवरील उपाययोजना -**

शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करीत आहेत. असा कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी यापुर्वी देखील सरकारने व्याजमाफी, यासारखे उपाय केले. आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने पॅकेजची घोषणा केली आहे. पण आत्महत्या थांबलेल्या नाहीत. कर्जबाजारीपणाची कारणे लक्षात घेऊन त्यादृष्टीने शासाकीय स्तरावर पुढील उपाय करण्याची नितांत आवश्यकता आहे.

१) राज्याचा सिंचन अनुशेष तातडीने पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. अपूरे सिंचन प्रकल्प त्वरित पूर्ण करावेत.

२) पीक विमा योजना सर्व पीकांसाठी लागू करण्यात यावी व नुकसान/नापीकी झाल्यास त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी.

३) रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रीय शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे यासाठी विनामूल्य प्रशिक्षण सेवा उपलब्ध करावी.

४) पशूपालन, कुक्कुटपालन, दुध व्यवसाय यासारख्या शेतीपूरक व्यवसायांचे प्रशिक्षण व अर्थसहाय्य करून देण्यात यावे.

५) शेतमाल विपणन व्यवस्थेतील सर्व मध्यस्थांचे, दलालांचे उच्चाटन करण्यात यावे.

६) कमी पावसावर येणाऱ्या कमी कालावधी लागणाऱ्या अनेक पिकांच्या जाती विकसित कराव्यात.

७) शेतकऱ्यांना सिंचन सोई उपलब्ध करून देण्यासाठी कमीत-कमी व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात यावा.

८) सर्व शेतमालाच्या आधारभूत किंमती निर्धारीत करून त्याच किंमतीवर माल खरेदीची सक्ती करण्यात यावी.

९) अल्प भूधारक व सिमांत शेतकऱ्यांना तीन टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे.

१०) खाजगी सावकारी व्यवसाय पूर्णपणे नियंत्रित करण्यात यावा. सावकारांविरूद्ध आपल्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन सावकारांना योग्य ती शिक्षा देण्यात यावी.

११) शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय व राज्य पातळीवर कृषी महामंडळे निर्माण करावेत.

१२) सहकारी चळवळ अधिक विस्तारीत व मजबूत बनवावी.

१३) शेतकऱ्यांना माफक दरात खते, बी-बियाणे तात्काळ उपलब्ध होण्यासाठी योग्य ती यंत्रणा उभी करण्यात यावी.

१४) शेतमाल साठवून ठेवण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी गोदामे उपलब्ध करून द्यावीत.

१५) हुंडाबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

- **निष्कर्ष -**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा देशावरील सर्वात मोठा कलंक आहे. या समस्येकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टीकोन राजकीय दिसून येतो. मात्र हा राजकीय प्रश्न नसून जीवन जगण्याच्या असमर्थतेतून निर्माण झालेला प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन योग्य त्या कारणांचा शोध घेतला जातो.

अनुदान आणि पॅकेजच्या माध्यमातून आपण या प्रश्नांची तीव्रता कमी करून टाकतो. मात्र संपूर्ण सोडवू शकत नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनस्तरांचा विचार करून तो उंचावणे शक्य नसेल तर आहे त्या पातळीपेक्षा कमी होणार नाही याची दखल घेऊन धोरणे ठरवावी. आत्महत्येसाठी शेतकऱ्यांना जबाबदार धरताना आपण स्वतः त्या स्थितीत असतो. तर काय केले असते. याचा थोडा विचार करावा. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या या शेतकऱ्यांच्या आहेत. त्याचा आपल्या सोबत संबंध काय असा विचार न करता त्या कमी कशा पद्धतीने करता येईल याचा विचार करावा.

जागतिकीकरणाचे गोडवे गात असताना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा असा फुकटचा सल्ला देऊन मोकळे होताना थोडा विचार करावा. भारतीय शेतकऱ्यांत ८१.२% प्रमाण अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांचे आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा इच्छा असतानाही या शेतकऱ्यांना घेता येणार नाही. यासाठी या शेतकऱ्यांना परवडणार नाही याचा विचार करावा. यासाठी काही नवीन पद्धतीचा अवलंब करता येईल का? याचा विचार करावा.

शेती विषयक नियोजन ठरवताना आपण स्वतः एक सीमांत व अल्पभूधारक शेतकरी आहोत असे समजून त्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन कृषी विषयक धोरणे ठरवावी. तेव्हाच त्यांचा खरा फायदा भारतीय शेतकऱ्यांना होईल अन्यथा भांडवलशाही व्यवस्थेत नव्याने जन्मास येत असलेल्या भांडवलदार शेतकरींना या शासनाच्या योजनेचा फायदा होईल. शासनास वाटेल आपण शेतकऱ्यांसाठी धोरणे राबवली आहेत. मात्र खरा शेतकरी हा देशोधडीला लागल्याशिवाय राहणार नाही. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय दुसरा मार्गच उरणार नाही.

याबरोबर सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेती सोडा धंदा करा असा फुकटचा सल्ला देणे योग्य नाही. कारण ज्यांच्याजवळ शेतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी पैसा नाही त्यांनी भांडवल कुठून आणावे. त्यामुळे त्यांना शेती करण्याशिवाय पर्याय नाही. म्हणून शेती क्षेत्रावरील जोखीम कमी करणारी व अडचणींच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी असणारी धोरणे असावीत.

शेतकरी आत्महत्येच्या समस्यांवर पर्याय म्हणून सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामूहिक शेती पद्धतीचा वापर करून उत्पादन खर्च कमी करून फायदा मिळवता येईल. शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सर्वच प्रकारची मदत करावी तरंच भारतीय शेती व शेतकरी जागतिकीकरणात टिकू शकेल. अन्यथा भारतीय शेती क्षेत्राची पिछेहाट झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच शेतकऱ्यांना आत्महत्येशिवाय मार्गच राहणार नाही.

**काळू कोंडू वाकसे**
**टी.वाय.बी.ए.**

*****

## पर्यावरणास घातक प्लास्टिक



पर्यावरण म्हणजे काय? खरचं हो पर्यावरण कशाला म्हणायचे. तर पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचे वातावरण. ऊन, वारा, पाऊस तसेच वातावरण, जलावरण आणि शिलावरण ह्या गोष्टीचा

समावेश पर्यावरणात होत असतो. तर हे पर्यावरण कसे टिकवून ठेवायचे हे आजच्या तरूणाईच्या हातात आहे. आजची तरूणाई पर्यावरणाचा थोडाही विचार न करता कुठेतरी भरकटत चालली आहे. अहो! आजच्या तरूणाईला पर्यावरण हेच कळत नाही. अहो आज जिकडे-तिकडे पाहावे टु व्हीलर, फोर व्हीलरच्या साहाय्याने फिरणारी तरूणाई वायु प्रदुषणाला कारणीभूत नाही का? तर होय हिच तरूणाई वायु प्रदुषणाला कारणीभूत ठरते. अहो मोठमोठाले डीजे, बँड, गाड्यांच्या आवाजाने होणारे ध्वनी प्रदुषणाल देखील तरूणाईच कारणीभूत ठरते.

पुर्वी आपल्या गावातली नदी अगदी स्वच्छ आणि निर्मळतेने वाहणारी नदी आज आपल्याला दुषित दिसते. गावाचे सांडपाणी तिच्या पात्रात सोडले जाते. अहो, किती निर्मळ, मोहक वाहणारी नदी ती तिला देखील या मानव जातीच्या प्राण्याने प्रदुषित केली. गावातील सर्वच कचरा तिच्या पात्रात टाकला जातो. अहो मी तर म्हणते की प्रत्येकाच्या घरात तीन बकेट असायलाच हव्या. एका बकेटमध्ये ओला कचरा, दुसऱ्या बकेटमध्ये कोरडा कचरा आणि तिसऱ्या बकेटमध्ये पुनः वापर होणारा कचरा. ओला कचरा म्हणजे जसे की आपण केळी खातो, त्याची साल बाहेर न फेकता ओल्या कचऱ्याच्या बकेटमध्ये टाकली गेली पाहिजे. तसेच आपण आंबे, सीताफळ, पपई इत्यादी फळांची सालटे किंवा त्याचा काही उर्वरित भाग ओल्या कचऱ्याच्या बकेटमध्ये टाकला गेला पाहिजे. तसेच कोरडा कचरा म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्या, पेपर, रद्दी कागद इत्यादी वस्तु कोरड्या कचऱ्याच्या बकेटमध्ये टाकायला हवे. त्याचबरोबर पुनः वापर होणाऱ्या वस्तु म्हणजे प्लास्टिकच्या पाणीच्या बाटल्या, प्लास्टिकचे डब्बे इ.वस्तु पुनः वापर होईल अशा बकेटमध्ये टाकावे.

आपण ही सवय स्वतःपासून लावायची जेणे करून आपले अनुकरण आपली लहान भावंड, शेजारी-पाजारी राहणारे लोक, आपले मित्र-मैत्रिणी आपले अनुकरण करतील. आपण जेव्हा त्या केर-कचऱ्याची विल्हेवाट लाऊ तेव्हा 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' देखील तयार होईल. माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे स्वप्न देखील पूर्ण होईल. एक स्वच्छ आणि निरोगी भारत तयार होईल.

'स्वच्छ भारत अभियान' या योजनेत आम्ही सर्व विद्यार्थीनी भाग घेऊन १०० तास स्वच्छता केली. आपल्या गावातल्या प्रत्येक वस्तीत जाऊन तेथील लोकांना माहिती दिली. जिथे खूप केरकचरा होता तेथे आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी हातात खराटा, पाट्या, टिकाव, पावडी घेऊन तेथील परिसर स्वच्छ केला. घरातल्या सांडपाण्याचे जर कुठेतरी डबके साचले असेल तर त्याची देखील आम्ही विल्हेवाट लावली. मी माझ्या घरातले सांडपाणी, धुणी-भांडीचे पाणी कुठेतरी डबके साचेल आणि त्या दुषित पाण्यावर गाई-गुरे फिरतील, माश्या बसतील असे वर्तन होऊ देत नाही. तर ते सांडपाणी माझ्या घरामागच्या झाडांना जाईल अशी व्यवस्था केली आहे. आज ती छोटी-छोटी रोपे मला मोठ्या झाडाच्या रूपात दिसतात. उन्हाळ्यात आम्ही त्या झाडांच्या शितल छायेत अभ्यासाला बसतो. उर्वरित सांडपाणी शोषखड्डा खोदून ते पाणी शोषखड्ड्यात सोडले आहे. जेणेकरून ते पाणी देखील वाया जात नाही. झाडाची मुळे चौफेर असल्यामुळे ते पाणी देखील झाडाच्या उपयोगासाठी कामी पडते.

आज जिकडे पाहावे तिकडे प्लास्टिकच प्लास्टिक दिसत असते. साधी एक रूपयाची जरी वस्तु घेतली तरी तिची पॅकिंग प्लास्टिकच्या कागदात केलेली असते. अहो कधी होईल ती प्लास्टीक बंदी? अक्षरशः प्लास्टिकच्या पिशव्या गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्यांना खातांना मी स्वतः पाहिले आहे. या खाल्लेल्या प्लास्टिकने अनेक जनावरे मृत्यूला सामोरे गेलेली दिसतात. अहो, गावाच्या बाहेरर कुठेतरी भली मोठी

गाय आपल्याला पडलेली दिसते, तर ती नुसती पडलेली नसून ती मेलेली असते. ह्या प्लास्टिकने अनेक जनावरे मृत्युला सामोरे गेलेले दिसतात.

प्लास्टिकचा उपयोग करतात तर त्याची विल्हेवाट देखील चांगल्या प्रकारे लावायला हवी. ग्रामीण भागात प्रत्येकाच्या घरी चुल असते तर चुल पेटवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करून घेत चला. मी स्वतः माझ्या घराच्या मागे असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या रोज सायंकाळी गोळा करते. जेणे करून सकाळी चुल पेटवण्यासाठी त्या पिशव्यांचा उपयोग होईल.

या देशातल्या प्रत्येक तरूणानेच नव्हे तर प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाची काळजी घ्यायला हवी. प्रत्येकाने आपल्या घरासमोर किंवा शेतात एक तरी झाड लावायला हवे. झाड आपल्याला नुसती फळे, फुलेच देत नाही तर त्याचबरोबर सावली देत असते आणि दिवसा कार्बन डाय ऑक्साईड शोषून शुद्ध आक्सिजन देत असतो. असं असेल तर पर्यावरणाचा फारसा ऱ्हास होणार नाही. पर्यावरण टिकून राहिल.

माझे आजोबा म्हणायचे मी जेव्हा शेजारच्या गावात जायचो ना तेव्हा मला सगळीकडे हिरवा शालु नेसलेली घरे दिसायची. पण आज मानवाने हा हिरवा शालु काढून सिमेंट कॉंक्रीटचा शालु नेसलेली घरे दिसतात. मानवाने झाडे तोडून घरातील सुशोभित वस्तु बनवल्या आहेत. प्रत्येकाच्या घरात दरवाजा, खुर्ची, खिडकी, टेबल, कपाट, सोफा या सर्व काही वस्तु लाकडाच्याच दिसतात. त्याचबरोबर प्रत्येकाच्या घरात प्लास्टिकच्या वस्तु देखील तेवढ्याच प्रमाणात दिसतात.

प्लास्टिक म्हणजे पॉलीमर्स. कोणतीही वस्तु रेणूंची बनलेली असते. रेणू हे सूक्ष्मातिसूक्ष्म कणांपासून बनलेले असतात. पॉलीमर्सचे रेणू आकाराने मोठे असतात. त्याची रचना जणू काही मण्यांच्या मळीप्रमाणे असते. हे कार्बनचे रेणू असतात. प्लास्टिकचा मुळ गुणधर्म म्हणजे त्याला पाहिजे तसा आकार देता येतो. मात्र नैसर्गिक विघटनाला शेकडो वर्षे लागतात.

आजचे जिवंत उदाहरण म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिकच्या वस्तु, प्लास्टिकचे चमचे, प्लास्टिक कप, थर्माकॉल ताट, ग्लास आणि वाट्या इत्यादी प्लास्टिकच्या वस्तुंवर आज बंदी आली आहे. आज आपण जेव्हा दुकानावर जातो तेव्हा आपल्याला दुकानदार कागदी पिशवीत सामान देत असतो. जर कोणी व्यक्ती जवळ प्लास्टिक सापडल्यास त्या व्यक्तीस सक्त कारवाई केली जाईल. पहिल्यांदा सापडल्यास ५००० रू., दुसऱ्यांदा १०,००० रू. आणि तिसऱ्यांदा १५,००० रू. दंड आकारण्यात आला आहे.


प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणे लोकांनी थांबवावं यासाठी आज जगात सर्वत्र समाज प्रबोधन केले जाते. त्याला यशही मिळत आहे. लोकांनी प्लास्टिक पिशव्यांचा कमीतकमी वापर करावा यासाठी त्यांना समजावलं जात आहे. त्यानुसार आज अनेकांनी या पिशव्या वापरणं कमी किंवा बंद केलेलं आहे. या पिशव्यांचा पुन्हा पुन्हा वापर कसा करता येईल व तितकाच पर्यावरणाला धोका पोहोचविण्याची वेळ टाळता कशी येईल हे देखील पाहिलं जातं. तसेच पिशव्या गोळा करून त्यांचे पुर्ननिर्माण करून त्या पुन्हा वापरात आणल्या जातात. विसाव्या शतकात उत्तरार्धात जगात १ बिलियन टन इतकं प्लास्टिक निर्माण झालं व आज एकविसाव्या शतकात पहिल्या दशकातच हे उत्पादन पुर्वीपेक्षा दुप्पट झाल्याची नोंद सायंटिफिक अमेरिकन या संशोधन मासिकाने केली आहे. शिवाय हा कचरा हटवणं ही फार मोठी कठीण गोष्ट आहे. म्हणून सर्वांनी पर्यावरणाची काळजी घ्यायलाच हवी. तेव्हाच नव्याने 'सुंदर भारत, स्वच्छ भारत' तयार होईल.

**कु. वाघ राधिका संजय**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# राष्ट्रनिर्मिती व चारित्र्यसंवर्धन



स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशभर सर्वत्र आपल्या युवकांमध्ये राष्ट्राच्या पुर्ननिर्मितीविषयी खूप उत्साह दिसून येत आहे. गोष्ट निश्चितच स्तुत्य आहे. तथापि, या कार्यास आरंभ करण्यापूर्वी आपल्याला भावी भारत कसा असेल याची कल्पना असलीच पाहिजे. जसे एखादा चित्रकार एकदमच काही कापडाला रंग लावीत नाही. तसे केल्यास चांगले चित्र तयार होणार नाही. त्याला प्रथम चांगल्या तऱ्हेने विचार करून जे चित्र काढायचे त्याची आकृती मनात स्पष्ट चितारावे लागेल व मगच ते मनात चितारलेले चित्र कापडावर उतरवावे लागेल. तंत्रविशारद काही एकदम इमारतीचे बांधकाम सुरू करीत नाही. पहिल्यांदा तो ती इमारत कशी हवी ते जाणण्याचा प्रयत्न करतो. ती शाळेची इमारत आहे की रूग्णालय आहे की कसले कार्यालय आहे की राहण्याचे घर आहे? त्यानंतर मग आवश्यक असेल तशा इमारतीचा तो एक नकाशा, एक योजना आखतो, त्यात सारे बारीकसारीक तपशील भरतो व मग बांधकामाला सुरूवात करतो. त्याचप्रमाणे आपणही भावी भारताचे सुस्पष्ट चित्र समोर ठेऊन मग देशाच्या पुर्ननिर्मितीस प्रारंभ केला पाहिजे. तुम्ही काय देशाला प्रचंड लष्करी शक्तीने युक्त बनविणार? निश्चितच नाही. कारण कोणत्याही लष्करी शक्तीला दीर्घ आयुष्य लाभत नसते. हिटलर व मुसोलिनी यांच्या कपाळी काय आले ते पहा. मग काय तुम्ही देशाला अमेरिकेप्रमाणे धनाढ्य, औद्योगिक व कृषीशास्त्रात प्रगत राष्ट्र बनविणार?

हे खरे की आपला देश गरीब आहे व आपल्या जनतेला पुरेसे अन्न मिळावे यासाठी आपल्याला समृद्धी हवी आहे. पण काय फक्त भाजी भाकरीने आपली समस्या मिटू शकेल? अमेरिका व इतर तत्सम धनाढ्य देशांना त्यांच्या संपत्तीच्या मोबदल्यात मनःशांती व खरा आनंद मिळत आहे काय? नाही, तेथील श्रीमंत कुटुंबांतील तरूण मुलांकडे पहा - जीवनात मिळविण्यासारखे काहीच न उरल्यामुळे, निराश होऊन ती इतरत्र भटकत असतात. त्यांतील काही फारच श्रीमंत आहेत पण जीवनात कोणतेच ध्येय दिसत नसल्याने त्यांना नेहमी एक प्रकारचा भीषण पोकळपणा, एक प्रकारची अर्थशून्यता जाणवत असते. आपल्याला लष्करी सामर्थ्य हवे आहे - स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी, शेजारी देशांना लुबाडण्यासाठी नव्हे. आपल्याला समृद्धी हवी आहे - आपल्या गरीब जनतेने पोट भरण्यासाठी, पण ते काही आपले राष्ट्रीय ध्येय असू शकत नाही. या दोन्हीखेरीज आणखी काहीतरी हवे आहे. सामर्थ्य व संपत्ती यांच्या बरोबरच आपल्याला शांती मिळवून देईल असे काय आहे?

माझा आपल्याला सल्ला आहे की आपण भारताच्या प्राचीन इतिहासाचे अनुशीलन करावे म्हणजे आपल्याला दिसून येईल की सामर्थ्य, संपत्ती व शांतिसमाधान या साऱ्या क्षेत्रांत अशोक, चंद्रगुप्त, कनिष्क वगैरेंच्या काळी भारत किती महान बनला होता. वैदिक काळात व बौद्धांच्या काळीही उघडच आपल्यापुढे भारताला इतके महान बनविणारे महान आदर्श होते. पण मग ही अधोगती कशामुळे झाली? आपल्या पतनाची कारणे आपण शोधून काढली पाहिजेत. भावी भारताचे निर्माण करतांना ज्या आदर्शामुळे आपण पूर्वी महान बनलो ते आदर्श स्वीकारले पाहिजेत, ज्यामुळे पतन झाले त्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे आणि त्याकाळी नसलेल्या आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान या गोष्टींची जोड दिली पाहिजे.

हल्ली आपण विज्ञानाविषयी फार श्रद्धा बाळगतो. अमुक एक गोष्ट अवैज्ञानिक व म्हणून अंधविश्वासजन्य आहे असे आपण म्हणतो. पण आपला भूतकाळ सर्वस्वी विसरून जाणे, त्यात काय चांगले होते, मागची तीन हजार वर्षे कशामुळे आपण एक राष्ट्र म्हणून टिकून राहिलो आहोत, ते जाणण्याची फिकिर न करणे आणि ज्या काळाच्या कसोटीला उतरल्या नाहीत, ज्यातील काही फार तर दोनशे वर्षे जुन्या आहेत नि काहीतर अगदी अलीकडच्या आहेत त्या पाश्चात्य कल्पनांच्या मागे धावत सुटणे हे काय विज्ञाननिष्ठेचे लक्षण झाले? या आदर्शांनी पाश्चात्य देशांची समस्या काय सुटले आहे? काय त्यांना शांती व आनंद लाभला आहे? तसे तर काही दिसत नाही. मग त्या आदर्शांमागे धावायचे कशासाठी?

माझ्या तरूण मित्रांनो, आपण मनुष्य आहोत. ईश्वराने आपल्याला विवेक दिला आहे तो आपल्याला वाटेल ते जोराने सांगणाऱ्या प्रत्येकामागे आपण मेंढ्यांसारखे जाऊ नये म्हणून वापरण्यासाठी. म्हणून मी तुम्हाला सूचवितो की आपल्या भूतकाळासंबंधी व सद्यस्थितीसंबंधी सारी माहिती तुम्ही जमवावी आणि नीट विचार करून भावी काळासाठी योजना बनवावी. भावनेच्या भरात वाहवले जाऊ नका.

पहिल्या प्रथम सर्वात अधिक आवश्यक असलेली गोष्ट म्हणजे उच्च चारित्र्य. चारित्र्याखेरीज कोणतीही महान गोष्ट प्राप्त होत नाही. उदाहरणार्थ महात्मा गांधी त्यांनी चारित्र्याच्या बळाने देशाला कसे प्रभावित केले व ब्रिटीशांना भारत सोडण्यास कसे भाग पाडले? त्यांनी बंदुका नि अण्वस्त्रे वगैरेचा उपयोग केला नाही. म्हणून जर तुम्हाला भारताला महान बनवायचे असेल तर अगोदर स्वतःचे चारित्र्य घडवा व मग स्वतःचा विवेक वापरून कशा प्रकारचा भारत तुम्हाला निर्माण करायचा आहे ते ठरवा. मग प्राणपणाने त्यासाठी कार्य करू लागा. अशा प्रकारच्या अध्ययनासाठी स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ तुम्हाला भारताची संस्कृती व आदर्श यांची ओळख करून देऊन मार्गदर्शन करतील.

**कु. दक्षता पवार**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## प्लास्टिक बंदी काळाची गरज




आजकाल वेगळेच वातावरण अनुभवायला येते. पावसाळ्यात सुद्धा उकाडा जाणवतो. थंडीच्या दिवसात तर कडाक्याची थंडी केव्हा आली? केव्हा येणार? याची स्मृती जागवावी लागते. उन्हाळा हा बारमाही बाराखडीसारखा असतो. घाम आणि तहान ही तर नित्याचीच चिंता मानावी जीवनाला त्रस्त करीत असते. असे सूर, असे व्यवस्थित सूर, असे प्रतिकूलतेचा कंठशोष करणारे सूर जीवन व्यवस्थित करतात. कोणते बरे कारण असेल या व्याकुळतेला? मानव निर्मिती कृतघ्नतेला? जीवनाचे विधायक गणितं हे परिश्रमाच्या बेरजेवर, दुष्टपणाच्या शून्यातील वजाबाकीवर संपन्नतेच्या गुणाकारांवर आणि संकुचित वृत्तीच्या भागाकारावर अवलंबून असते. गणितातील जर 'कॅल्क्युलेटर' कसाही हाताळला तर 'अचूक उत्तराची' अपेक्षा कशी बरे करावी? आपले पर्यावरण कशावर निर्भर आहे? निसर्ग नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यावर मनुष्य ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे. योग्य-अयोग्य याचा विचार करण्याची

क्षमता, खरं म्हणजे पूर्ण क्षमता मनुष्या ठिकाणी असते. संवर्धन की संहार यावरच पर्यावरणाचे संवर्धन अधोरेखित झालेले असते. मनुष्याची सहिष्णुवृत्ती, स्वार्थाची चढती माजणी अन् कनवाळूपणाची उतरती भानणी यातून पर्यावरणाचे जतन कसे बरे होईल?

जतन करा, जतन करा
निसर्गाची हिरवी शाल जतन करा
जतन करा, जतन करा
अक्षय धनाचे जतन करा
जतन करा, जतन करा
समृद्धीचा संचय जतन करा.

या काव्यांशाचा मतीतार्थ लक्षात ठेवणे पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. पर्यावरण संरक्षण कसे शक्य आहे? वृक्षतोड, जंगलांची सफाई, बेसुमार खनीज संपत्तीची लुट, कॉंक्रीकटची तापदायक जंगले यावर जर अंकुश लावला तरच पर्यावरणाचे संरक्षण शक्य आहे. खरं म्हणजे ती काळाची गरज आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मनुष्याच्या मुलभूत गरजांना प्राधान्य देणारे, अग्रक्रम देणारे, भूषण ठरणारी मानवी वृत्ती पर्यावरणाला पूरक ठरणारी असते, प्रेरक ठरणारी असते, प्रेरणावर्धक ठरणारी असते. निसर्गाचे संतुलन सानिध्य ज्यावेळी बिघडते, त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडले याला कोण कारणीभूत?

आजकाल सर्व प्रकारची माध्यमे, पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्याबद्दल आपली मते आग्रहाने मांडीत असतात. विविध संघटना, पर्यावरणप्रेमी, पर्यावरणास अनुकूल आणि हितदायक गोष्टींचा भावनिक आग्रह धरतात. मग तो आग्रह वृक्ष संवर्धनाचा असो, अनावश्यक वृक्षतोडीला पायबंद आणि प्रतिबंध करणारा हट्टाग्रह अन् हक्काग्रह असो, डोंगर पठाराचे रूपांतर बिनशेतीत करण्याचा सत्याग्रहाला विरोध असे. केरकचऱ्याचे वैज्ञानिकदृष्ट्या आरोग्यवर्धक नियोजन असो, अनिर्बंध पाण्याचा अपव्यय असो, हवा प्रदुषणाची वाढती व्याप्ती असो! या प्रकारच्या साऱ्याच सामाजिक समस्यांचा निकोप समाज व्यवस्थेला घातक ठरतात, दुषणावह ठरतात, तापदायक ठरतात, असे नाही का आपल्याला वाटत?

हिरवेगार माळरान, हिरवी शाल पांघरलेली आपली मायभूमी स्वच्छ जलाशये, मग त्या विहिरी असोत, तलाव वा नद्या असोत, पर्यावरणाला बाधक न ठरणारे खोदकाम असो, बांधकाम असो, याचा पुरस्कार ज्यावेळी समाजात होत असतो, त्यावेळी पर्यावरणाचे संतुलन अस्थिर, अस्वस्थ होत असते. याबद्दल कुणाचेही दुमत असू शकत नाही.

'मनुष्याची कृतघ्नता' मग ती विषम विचारांची असो, अवाजवी कृत्यांची असो, नैसर्गिक तत्त्वांना बाधा आणणारी असो, योग्य नियंत्रण देणारी वृत्ती असो परिणाम ठरलेला. नाश! हे तत्त्व पर्यावरणालाही लागु पडणारे आहे. जलसाठ्यांचा दुरूपयोग करून चालेला का? जंगल संपत्तीचा जर विध्वंस केला तर पर्यावरणाचे कसे बरं करता येईल? खनिज उत्खनन निसर्ग नियमांचे उल्लंघन करून केले तर, पर्यावरणावर दुष्परिणाम ठरलेलाच असतो. विषारी द्रव्यांची योग्य विल्हेवाट लावली. प्रदुषण मुक्त कारखान्यांना प्रोत्साहन देण्याची वृत्ती, प्लास्टीकचा उपयोग अन् योग्य पर्यावरणपूरक नियंत्रण, कमी हवा प्रदूषण करणारी वाहते. झाडांची लागवड, अन् योग्य निगा, पर्यावरणाला विशेष बाधा न आणणाऱ्या कृत्रिम अडथळ्यांना प्रतिबंध सौरशक्तीचा अधिकाधिक उपयोग इ. कडे ज्यावेळी डोळस वृत्ती, अनुकूल वृत्ती दिसेल तिच काळाची गरज आहे. अन्यथा कोणते भीषण चित्र भविष्यात समाजात दिसेल याचा उहापोह करणारी या काव्यपंक्ती -

कॉंक्रीटची जंगले,
ठरतील संहारक पाऊले
प्लास्टिकचा उपद्व्याप,
देईल जनांना संताप,

बेसुमार वृक्षतोड,
देईल संहाराला जोड,
विषारी द्रव्याचा ताप,
होईल भितीचा बाप,
अशाने होईल प्रदूषण,
करील मानवांचे शोषण,
हे जर टाळायचे असेल तर
निसर्ग नियमांचे पालन करूया,
वृक्षवेलींचे संवर्धन करूया,
भयमुक्त, संहारमुक्त जीवन जगूया,
अन् पर्यावरणाचे रक्षण करूया.

गेल्या एक महिन्यापासून नरेंद्रजी मोदी यांनी राबविलेल्या स्वच्छ भारत अभियान १०० तास स्वच्छतेसाठी आम्ही शाळेचे व कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थीनी स्वच्छतेचा संदेश पोहोचवला. त्याचबरोबर प्लास्टिक बंदीची जाहिरात देखिल केली. लोकांनी प्रतिसाद दिला आणि म्हणून लागले की, प्लास्टिक बॅगवर राज्यात बंदी येणार! खरोखर जर असे होणार असेल तर ते फारच चांगले होईल.

प्लास्टिकची सर्वात मोठी समस्या म्हणजे विल्वेवाट लावणे. कारण प्लास्टिक हे कुजून जाऊन किंवा जाळून नष्ट होत नाही. फार तर प्लास्टिकवर प्रक्रिया करून नवीन वस्तु तयार केली जाऊ शकते आणि ही वस्तु खराब झाल्यानंतर, पुन्हा तोच प्रश्न ही वस्तु कशी नष्ट करायची? म्हणजे ही एक सायकल तयार होते. यातूनच तयार होते ती प्लास्टिक कचऱ्याची समस्या की या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची आणि जर विल्हेवाट लावणे शक्य नसेल तर?

सर्वात उत्तम पर्याय म्हणजे प्लास्टिक कचरा तयार न होऊ देणे आणि यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्लास्टिकवर बंदी. पण हे खरेखर शक्य आहे का? कारण अशा प्रकारच्या चर्चा व घोषणा बऱ्याच वेळेस झाल्या आणि गंगेला मिळाल्या. किमान यावेळेस तरी ही घोषणा फक्त घोषणा न राहता कृतीत परिवर्तित व्हावी ही अपेक्षा आणि याची काटेकोरपणे अंमल बजावणी व्हावी.

प्लास्टिक बंदी करतांना अनेक समस्या निर्माण होतात. असे प्लास्टिक बॅग तयार करणाऱ्या कंपनीत काम करणाऱ्यांच्या रोजगाराचे काय? कंपनी उभी करतांना मालकाने केलेला खर्च. त्यावरील कर्ज असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. पर्यावरणाचा विचार करता ज्या अडचणी समोर येतील त्या दूर करून त्यावर उपयायोजना करून हा प्रश्न सोडवण्यात जर सरकारी यंत्रणेला यश आले तर फार उत्तम होईल. कारण प्लास्टिकचा कचरा व्यवस्थापन ही एक गंभीर स्वरूपाची समस्या आज तयार झालेली आहे आणि त्यावर उपाय हा शोधलाच पाहिजे.

आता समजा की प्लास्टिक पिशवीवर बंदी घाळण्यात आली तर त्यातून नवीन उद्योगाला चालना मिळेल आणि तो म्हणजे कापडी पिशवीचा. कापडी पिशवीची मागणी वाढेल आणि मग ती तयार करण्यासाठी कुशल कामगारांची गरज निर्माण होईल. यातून प्लास्टिक कारखाने बंद पडून बेरोजगार झालेल्या मजूर संख्येइतकेच किंवा जास्त रोजगार निर्माण होईल. त्याचप्रमाणे कापडी पिशवी तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे कापड. म्हणजेच कापसाची मागणी वाढेल आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापसाला चांगला भाव मिळेल. बंद पडलेल्या कापड गिरण्या पुन्हा सुरू होतील किंवा नवीन कापड गिरण्या सुरू होतील. आणि त्यातून नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

- **सारांश -**

जर प्लास्टिक बॅगवर बंदी घालण्यात आली तर एक पर्यावरण रक्षणाचे कार्य होईल आणि जनावरे प्लास्टिक खाऊन मरतात तर ते मरणार नाहीत. त्याच सोबत नवीन अर्थप्रणाली विकसीत होण्यात मदत

होईल. यात शेतकरी मजूर यांना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. त्यामुळे जर प्लास्टिक बॅगवर बंदी घालण्यात आली तर तीचे स्वागत केले पाहिजे आणि ते आपण करूया.

नका नका प्लास्टिक वापरू
अगं माये अरे भाऊ पिशवीमंदी
कचरा भरू नको
गुरं ढोरं कचरा खाती,
प्लास्टिक पोटामंदी जाई.
चारा नाही त्यांच्या पोटी
प्लास्टिकचा गोळा होई.
प्लास्टिक होतं जिथं गोळा
पाण्या नाही देत वाट
धरित्री ना घेई पोटी,
खत नाही पीक भेट
समिंदरा प्लास्टिक जाता
तरास होतो जलचरा.
मासे, पाणी, मुकं जीव
त्यांचा विचार करा जरा.
प्लास्टिकला तू दूर कर,
मनापासनं दे नकार
तुझ्याकडे शहाणपण ठेऊ
नको तू गहाण
वापर तू कागद, कापड
आपलसं त्यास म्हण.
देवा दिले तुले मग
तेचा कर तू सन्मान
ही धरती आपली माय
तिला ठेव तू सांभाळून
धरत्री माय
प्रत्येकानं ठरवू मनी
प्लास्टिकला नाही म्हणून.

**कु. जाधव अश्विनी अविनाश**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## अंधश्रद्धा

बाळाला काळे टिके लावून त्यांचे संरक्षण,
झाले असते तर भारतात
बालमृत्यूदर शून्य असते!
गाडीला लिंबू मिरची लावून गाडीची सुरक्षा
झाली असती तर भारतात
अपघातांची संख्या शून्य असती
पूजा करून धंद्यात बरकत आली असती
तर भारतात
उद्योजक झाले असते.
बुवाबाबांकडे जाऊन दुःख निवारण
झाले असते तर समस्त बुवा बाबा,
भक्त सुखी दिसले असते.
कुंडल्या मिळवून नवरा बायकोची मनं
जुळवली असती तर सगळी
अरेंज मॅरेजेस यशस्वी झाली असती.
यज्ञ करून जिंकता आले असते
तर भारत एकही मॅच
हरला नसता.
चिकित्सक विचार व वैज्ञानिक
दृष्टिकोन आपल्याला प्रगत करतो.

**कु. सुवर्णा पांडूरंग इंगळे**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## आई! मला जन्म घेऊ दे!

तु जसे पाहिले जग मला देखील पाहू दे
सांग आई, बाबांना जन्म मला घेऊ दे
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तु आहेस कसे तुला कळत नाही.
ताईसंगे माझ्या मला आनंदाने जगू दे

सांग आई, बाबांना जन्म मला घेऊ दे
हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का?
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो का?
राखीसाठी दादाच्या निदान मला येऊ दे
सांग आई, बाबांना जन्म मला घेऊ दे
तु बहिण तु कन्या तु एक स्त्री आहे
काल जिथे तु होती आज तिथे मी आहे.
तु जसे विणले नाते, तसे मला विणू दे,
सांग आई, बाबांना जन्म मला घेऊ नदे
पहा मग फिरून मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे दोघांनाही येणार नाही.
डोळे येता भरून तुझे पदर मला होऊ दे
सांग आई, बाबांना जन्म मला घेऊ दे.

**कु. वसावे दिपाली खुमा**
**एफ.वाय.बी.ए.**

*****

## पोटी एक मुलगी जरूर असावी

पोटी एक मुलगी जरूर असावी
थोडी कच्ची थोडी पक्की पोळी
करून बाबाला घास भरवण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
रोज संध्याकाळी दमलास का रे
बाबा आज असं म्हणण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
लाडे लाडे बाबावर लटकेच रूसण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
लगेच राग सोडून, बाबाला मीठी मारण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
बाबाचे अश्रु हळूच पुसण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
रडू नको ना बाबा म्हणण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
मुलगी असून आईची माया देण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
शाळेत सोडायला तुच ये, असं बाबा
जवळ हट्ट धरण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
आई पेक्षा मला जास्त आवडतो,
असं म्हणण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
उमेदीने तिचा मुद्दा, बाबाला
पटवून देण्यासाठी....
पोटी एक मुलगी जरूर असावी
आई चिडल्यावर बाबाच्या मागे लपण्यासाठी
पोटी एक मुलगी जरूर असावी
बाबाला कन्यादानाचे सुख देण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
सासरी जातांना बाबाच्या खांद्यावर
डोकं ठेवून रडण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी
पाठवा सणाला, बाबाला भारी
साडी मागण्यासाठी...
पोटी एक मुलगी जरूर असावी

**कु. रविना नानाभाऊ मोहने**
**एफ.वाय.बी.ए.**

*****

## डोळयातील पाणी

नको बोलूस काही
आले सारे कळून
जायचे आहे दूर
तर, नको पाहूस मागे वळून.
तुझ्या गुलाबी डोळयांच्या कडा

नको करूस ओल्या
तु गेलीस तरी राहतील
मनात आठवणींच्या सावल्या,
तुझ्या निळ्याभोर डोळ्यांनी
मला जणू वेडावून टाकले
पौर्णिमेच्या चंद्राला जणू
ढगांनी झाकून टाकले.
सुरू जिथे व्हायची.... तिथेच
संपली कहाणी
साक्षिला ठेवले तेवढे
डोळ्यातील पाणी....

**कु. राणे गायत्री अनिल**
**एस. वाय.बी.ए.**

*****

## सच्चाई

बेटी निकलती है तो कहते हो
छोटे कपडे पहन के मत जाओ।
पर बेटे से नहीं कहते हो कि
गजरों में गंदगी मत लाओ।
बेटी से कहते हो कि,
कभी घर की इज्जत खराब मत करना।
बेटे से क्यों नहीं कहते कि,
किसी के घर कि इज्जत से खिलवाड नहीं करना।
हर वक्त रखते हो नजर
बेटी के फोन पर।
पर यह भी तो देखो
बेटा क्या करता हैं इंटरनेट पर।
किसी लडके से बात करते देख
जो भाई भडकता हैं।
वहीं भाई अपनी गर्लफ्रेंड के किस्से
घर में हँस हँस के सुनाता है।
बेटा घुमे गर्लफ्रेंड के साथ
तो कहते हो अरे बेटा बडा हो गया।
बेटी अपने अगर दोस्त से भी बातें करे
तो कहते हो बेशरम हो गई हो।
पहले शोषण घर से बंद करो
तब शिकायत करना समाज से।
हर बेटे से कहो कि,
हर बेटी कि इज्जत करे आज से।

**कु. दिपाली हेमंत मोहने**
**एफ.वाय.बी.ए.**

*****

## बाप

आईचे गुणगाण खूप झाले
पण बिचाऱ्या बापाने काय केले?
आपण गातो फक्त आईचीच गोडवी.
आईकडे पाहिले तर अश्रूची लाट आठवते,
पण बाप असतो समस्येचा घाट.
आठवते जेवण बनवणारी आई,
पण त्यात शिदोरीची सोय बापच पाही.
देवळी यशोदेचे प्रेम मनात साठवा
रामासाठी कौशल्याची झाली असेल कसरत
पण पुत्र वियोगाने मरण पावला दशरथ.
काटकसर करून देतो मुलास पॉकेटमनी,
स्वतः मात्र वापरतो शर्ट पॅन्ट जुनी.
मुलीला हवी ब्युटी पार्लर नवीन साडी
घरी बाप आटोपतो बिना साबणाची दाढी.
वयात आल्यावर मुले आपल्या विश्वात मग्न,
पण बापाला दिसे मुलाचे शिक्षण व मुलीचे लग्न.
मुलाचा नोकरीसाठी जीना चढून लागते धाप
आठवा मुलाच्या स्थळासाठी
उंबरठे झिजवणारा बाप.

जीवनभर मुलाच्या पाठी बापाच्या सदिच्छा,
त्यांना समजून घ्यावे
हीच माझी इच्छा!

**कु. दिपाली हेमंत मोहन**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## भाऊ

भाऊ रे माझा तु असा कसा रे झाला
चार दिवसाचा बायकोसाठी
आम्हाला विसरून गेला.
लहानपणी आपण एका ताटात जेवलो
आज तुला मी कसा परका वाटू लागलो.
तु आजारी असतांना आई रात्रभर जागून राहायची
ती आई सुद्धा तुला आज परकी वाटू लागली.
नको विसरू तु आई-वडील, भाऊ-बहिणीची
येईल आठवण आमची तेव्हा वेळ गेलेला असतो वाया.
एकवेळ उपाशी राहून त्यांनी तुला तुपाशी खाऊ घातलं,
तुझं लग्न झाल्यावर मात्र त्यांना तु करून टाकलं.
३३ कोटी देव मधले आई-वडील एक देव आहेत,
आई-वडीलांचा आत्मा दुखावून
तु तिर्थयात्रा करत आहेस.
करत असणार तुम्ही नवरा बायको लाख उपवास,
पण आई-वडीलंच जर उपाशी झोपत असतील तर
कसा असेल रे तुझ्या घरात लक्ष्मीचा वास.
आई-वडीलांसारखे दैवत तुला शोधून सापडणार नाही,
तु सुखी संसार करावा,
देवाकडे त्याचं दुसरं काही मागणं नाही.

**कु. दिपाली हेमंत मोहने**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## क्षणात संपले सारे

ईच्छा साऱ्या भिजल्या, स्वप्न गेली वाहून,
आई घर बांधायचं, अग गेलं ना आता राहून।
आई म्हटली नको जाऊ, पाऊस जरा थांबू दे,
मन माझं मानत नाही रात्र एवढी जाऊ दे।।
माफी मागतो आई तुझी मी हात माझे जोडूनी,
ऐकले नाही काही तुझं मी गेलो तुला सोडूनी।
बहीण माझी छोटी, करायचं होतं ना ग लगीन,
बोलली रक्षाबंधनाला भाऊ वाट मी तुझी बघीन।।
बायको सारं बघत होती डोळे आले भरून,
निघालो घराबाहेर सर्वांना बाय करून।
काय झालं काय जणू, प्रवासात मन नव्हतं लागत,
पुसले माझे डोळे मी खिडकी बाहेर बघत।।
क्षणार्धात सांकव तुटून हाहाकार झाला,
बस पुरात बुडून पाणीच आत आलं।
काय करू, कुठे जाऊ, क्षणात संपले कारे?
जीव घुटमळला, डोळे फिरले, पाणीच पाणी सारे।।
आई तुझी आठवण आली गं, जेव्हा गेलो मी वाहून
किती मोठे केलेस मला तू स्वतः उपाशी राहून।
बाबा म्हणजे सावली घराची जसा बहारदार झाड,
ऐकलं नाही, मस्ती केली तरी त्यांनी पुरविलेत लाड।।
बाहेर पडणं मुश्किल होतं, तडपलो मी आतच,
बंद पडले शरीर माझे चालले तेवढे हातच।
जमलं तेवढी दिली मी झुंज, त्या मृत्यूच्या देवाशी,
बघत होता, हसत होता, खेळत होता तो जीवाशी।।
कोणाचे रे मी काय बिघडवले, असा कसा रे मी मेलो,
माफ कर रे प्रिये मला मी तुला अर्ध्यातच सोडूनी गेलो।
प्रयत्न संपले माझे सारे, पाण्यातच रे मी रडलो,
श्वास कोंडला, जीव तडपला मृत्यूशी मी रे हरलो।।
प्रियेसेनेही रडून रडून जीव अर्धा केला असेन,
पोर आता कशी झोपतील माझी, जेव्हा मी या जगात
नसेल।

संपली सर्व नाती, क्षणार्धात संपली स्वप्न सारी,
ईच्छा राहिल्या अपुर्ण, संपली माझी दुनियादारी।।
लवकर शोधा भावानो मला खूप आठवण घरची येते,
कधी भेटते प्रिये... आई मला.... अन कधी छातीशी घेते
अन् कधी छातीशी घेते....

**कु. जाधव अश्विनी अविनाश**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## वडिलांना पत्र.....

प्रिय बाबा यांस,
आज थोडं एकटं वाटलं,
बाकी काही नाही तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावंस वाटलं....
चालायला लागल्यावर तुम्ही पहिला हात दिला होतात. पण मी गेल्यावर नकळतच कधी दूर गेला होतात. आज स्वतःच्या पायावर उभो असले तरी धडपडल्यासारखं वाटतं.
बाकी काही नाही. तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावंस वाटलं.
जेवतांना काऊ चिऊ शिवाय कधी घास पोटात गेला नाही.
आता तर चिऊ बघायला सुद्धा मिळत नाही.
काऊ चिऊसाठी पुन्हा एकदा रूसावंस वाटतं.
बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावसं वाटलं.
एकदा घरात एकटी असतांना सर्व घर रडून डोक्यावर घेतले होतं.
पण तुम्ही धावत पळत येऊन 'मी आहे, असं सांगितलं होतं.'
आज स्टेशनच्या गर्दीत सुद्धा एकटं एकटं वाटलं.
बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावंसं वाटलं....
आठवतयं.... एकदा मी पडले होते. मला खूप लागलं होतं,
त्या दिवशी तर पूर्ण आभाळ, तुमच्या डोक्यात दाटलं होतं.
आज उगाचंच अडखडून पडावंस वाटलं.
बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावसं वाटलं....
रात्री झोपताना तर तुमची मांडीच माझी उशी असायची.
तुम्ही नसतांना आईच्या कुशीत झोप नसायची.
आज पुन्हा एकदा तुमच्याजवळ झोपावसं वाटलं.
बाकी काही नाही तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावसं वाटलं.
तुमचा हात सोडून शाळेत जाणे नकोसे वाटायचे,
पण तो हात पकडून घरी जातांना मात्र कसलेच भान नसायचे,
आज मोठी झाले तरी तो हात पकडून शाळेत जावसं वाटलं....
बाकी काही नाही. तुमची आठवण आली म्हणून जरा रडावसं वाटलं...
म्हणून जरा रडावंसं वाटलं...

**कु. रविना नानाभाऊ मोहने**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

# Feminist Perspectives in Maya Angelou's Poetry



Maya Angelou is considered as one of the best known black writer of United States. She has written several volumes of poetry namely Just Give Me a Cool Drink of Water For I Die which was nominated for Pulitzer prize, Oh, Pray My Wings are Gonna Feet Me Well (1975) Still I Rise (1978) Why Don't You Sing? (1983). Now Sheba Sing the Song (1987) I Shall Not be Moved (1990). The volumes of poetry addresses social andd political issues related to Afro American life and challenges to validitty of the American values, tradition and myth.

Maya Angelou is one of the women writers who uses feminist approach in her all poetries. She once wrote *"How important it is for us to recognize our heroes and She-roes."* Her poems deal with life and struggle about women. She attempted to present black women's life among the white men and women. Angelou presented the imagery picture of women in her poetries. She speaks about women power and her behavior. The realm of the personal and it's violation are very important in Afro - American life. Angelou recognizes her insult with senility. In her autobiography The Caged Bird she writes; *"Every person I knew has a hellish horror of being called out of his name. It was dangerous practice to call a Negro anything that could be loosely constructed as insulting because of the centuries of having been naggers, figs dinges, blackbirds crows, boots and spooks."*

Maya Angelou wrote many poems with feminine perspectives. She believes greatly in the equality for people. Her experiences are reflected in her poems.

Still I Rise is one of the Maya Angelou's best known poem. This poem was published in 1978. It is about a black woman living among whites. The speaker describes her feeling in enduring her life and shows her high motivation in facing all problems. She is speaking to whites people. The whites consider black woman as devil and treated them unfairly. Angelou reveals her determination to rise above the demoralizing defeat that she faces in life and to grasp life on its own terms. In spite of calculated distortion of facts about the blacks and history she says, 'She will like dust rise still' her spirit of independence and self assertion get revealed. The speaker describes her own condition and feelings as a minority. She sings;

*You may write me down in history*
*with your bitter, twisted lies,*
*you may trod me in the very dirt*
*But still, like dust, I'll rise.*

In 'Life Does Not Frighten Me' she proclaims that life in spite of its incredible odds does not frighten her. She seems to assert that only when one is afraid of the problems that one faces, life will be source of constant fear. She presents her feminine approach through her lines speaks;

*I go boo make them shoo*
*I make fun way then run*

*I won't cry so they fly I just smile*
*they go wild Life does not frighten me at all*

In her another poem "The Calling of Names" Angelou traces historical changes and the black women relationship to a new reality. She speaks to the concerns of a historical and political black presence in World War II. In this poem, the speaker is more brave and outspoken in describing her feelings. She is bravely asks the whites to the padding in their eyes and ears because the white have ignored the speaker, therefore she asserted strongly;

*Equality and I will be free.*
*Equality and I will be free*

In 'The Lesson' the poet speaks of her zest for life in spite of memory of old tomb and rotting flesh which imprinted her consciousness. In fact, life is a death to her and in every walk of life she confronts only defeat and disappointment. Yet she stated her feminist approach through the poem and proclaims her love for life. She sings boldly that dull my eyes, yet I keep on dying, because I love to live. She is firm that only upon this world, there is certainty of sensuous pleasure.

Angelou points out the plight of black women in many of her poems. In her poem 'Southest Arkanashia' she exhortts the white men whether they have absolved of their sin of bartered flesh and broken bones.

The poem 'Phenomenal Women' also is an excellent example of importance of feminist ideas. Angelou elaborates the feminist ideas in the poem. She continue to elevate the female identity in comparison to that of man. By asserting that Man can't grasp her 'inner mystery' implying that men are incapable of fully understanding. The poem Phenomenal Woman deals with feminist approach and issues as she writes "Pretty women wonder where my secret lies / I am not cute or built a fashion model size" Angelous is clearly alluding to our culture's connection between thinness and attractiveness in women. From a feminist point of view her poem is biased, societal expectation because women are expected to almost starve themselves in order to be considered pretty.

The poem 'Woman Work' is full of feminist characteristics. After reading this poem, we understand the pain during time period. As the poems progress, there is a shift in speakers tone. She start to seems almost wishful she addresses each aspect of nature such as rain, sun and wind to cover her with sunshine and raindrop. The woman work embodies the feminist literary perspectives in many ways. She speaks and appeals to of aspect nature;

*Fall gently snowflakes*
*cove me with white*
*cold icy kisses and*
*Let me rest tonight*

In the poem 'The Lie' a woman protects herself from humiliation when her lover thretens to leave her by holding back her angere and pretending to be unmoved, even eager to see her man go. In this poem women's anger, indifference and casualness of attitude to the loss of love is revealed. She protect against the humiliation and suffering she would have to experience if she were to surrender to the man begging his love besides dealing with love and suffering it causes to women who are at receiving end always.

While presenting feminist approach Maya Angelou stated in the poem that a woman is like a caged bird whose wings are crippled and her feet are tied. Unlike man who is free bird, the caged bird according to

her women leads a life of confinement that sorely inhibits her need to fly, sing and claim the sky her own. Being trapped, she can only lift her voice in protest against imprisonment and the grave of dreams on she perches. The position of women in the society is revealed in the question asked in Sttill I Rise;

*Did you want to see me broken?*
*Boweed head and lowered eyes?*
*Shoulder falling down like teardrops,*
*Weakened by my soulful cries.*

The poem 'Men' presents image of woman muttering about men. It shows characteristics of feminist belief. There has been much how converesation concerning how women and men speak different languages and look at things differently. Maya Angelou wants us to imagine that we are at the down of a bright day when we have to offer the space for new steps of change. Her poems deal with feminist perspectives which asserts the inner strength of female.

**Gayatri Anil Rane**
**S.Y.B.A. (Dept. of English)**

*****

## Poem of Parts of Speech

Every name is called a noun
A field and fountain, street and town.
In place of noun the pronoun stands
As he and she can clap their hands.
The adjective describes a thing as magic
wand orbidal ring.
The verb means action, something done.
To read and write to jump and run.
How things are done the adverbs tell.
As quickly, slowly, badly, well.
The preposition shows relation.
As in the street or at the station.
Conjuctions joins in many ways.
Sentence words, or phrase and pharases.
Interjection cries out Hark.
I need an exclamation mark.

**Shaikh Misbah Sabir**
**F.Y.B.A. (Dept. of English)**

*****

## A Mistake

I did a mistake
Of telling it to you
For I took you as my own
What did if make difference in the world?
There were no stars with the moon
The path of life were not the same
I just told to the star
To accompany the moon
What did itt make difference in world?
It's your hobby
To pluck the bud
The blood is running
In my veins with a fire
I just told to adjust with me
What did if make difference in the world?
I did a mistake
Of telling it to you
For I took you as my own
What did if make difference in the world?

**Wagh Radhika Sanjay**
**S.Y.B.A. (Dept. of English)**

*****




**युवारंग २०१८**
युवारंग २०१८-१९ मध्ये 'सुपडा नृत्य' सादर करतांना विद्यार्थीनी.




युवारंगमध्ये 'मोबाईलचे येडं' नाटीकेमध्ये अभिनय करतांना मयुर गवळे व चेतन जाधव.




युवारंगातील विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आलेल्या 'मोबाईलचे येडं' नाटकामधील दृष्य.



**पारितोषिक वितरण**
सांस्कृतिक कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे अध्यक्ष बाबासाो. शरदचंद्र शहा, व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर आणि विद्यार्थीनी.



महाविद्यालयाचे अध्यक्ष बाबासाो. शरदचंद्र शहा पारितोषिक सोहळ्यामध्ये कु. कल्पना गवळी हीस पारितोषिक देतांना.



निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे शालेय समितीचे अध्यक्ष दादासाो. अजितचंद्र शहा पारितोषिक सोहळ्यामध्ये विद्यार्थ्याला पारितोषिक देतांना.



दादासो. बारीक यादव पगारे सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कु. पुजा भदाणे, कु. अश्विनी जाधव यांना पारितोषिक देतांना.



विविध उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थीनींचा सन्मान करतांना आप्पासो. राजेंद्र मुरलीधर वाणी.



महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात 'गोंधळ' सादर करतांना कु. पुजा भदाणे व तिचा गृप.



**सांस्कृतिक कार्यक्रम**
सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करण्यात आलेला 'जलवा जलवा' देशभक्ती पर नृत्य सादर करतांना विद्यार्थी-विद्यार्थीनी.




'शेतकरी आत्महत्या' नाटीकेमधून शेतकऱ्याची व्यथा आणि दुःख आपल्या अभिनयातून मांडतांना आकाश महिरे आणि गृप.



सांस्कृतिक कार्यक्रमात 'पावरा नृत्य' सादर करतांना विद्यार्थीनी.



सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये मंचावर 'होळी नृत्य' सादर करतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी.



सांस्कृतिक कार्यक्रमात होळी नृत्याचे सादरीकरण करतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी.



निजामपूर-जैताणे पोलिस स्टेशनात पोलिस बांधवांसमवेत रक्षाबंधन साजरा करतांना महाविद्यालयीन विद्यार्थीनी.



**स्वयंसिद्धा अभियान**

युवती स्वयंसिद्धा शिबीरात विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार.



युवती स्वयंसिद्धा कराटे शिबीरात कराटे कौशल्याचा सराव करतांना विद्यार्थीनी.




युवती स्वयंसिद्धा कराटे शिबीरात कराटे कौशल्याचा सराव करतांना विद्यार्थीनी.

# अहवाल विभाग

## विद्यार्थी विकास अहवाल

### वार्षिक अहवाल - शै. वर्ष २०१८-१९

**प्रा. के. डी. सोनवणे**
**विद्यार्थी विकास अधिकारी**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विद्यार्थी विकास अहवाल यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनात महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग कार्यरत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा केवळ शैक्षणिक विकास न होता त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धीक आणि एकूण सर्वांगिण विकास होण्यासाठी त्याचप्रमाणे सशक्त व चारित्र्यवान, प्रामाणिक, कष्टाळू युवापिढी घडविण्यासाठी हा विभाग सर्वोतोपरि तत्पर आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास अधिकारी व विद्यार्थी विकास सदस्य यांच्या सहकार्याने विद्यार्थी विकास विभागाचे कार्य संपन्न झाले. क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव विद्यार्थी विकास विभागामार्फत निघणाऱ्या परिपत्रकांप्रमाणे विविध योजना कार्यशाळा, उपक्रम, चर्चासत्र, कार्यक्रम आदिंची कार्यवाही या विभागामार्फत करण्यात आली. महत्वपूर्ण कार्यक्रमाची व योजनांची रूपरेषा पुढीलप्रमाणे.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
२) स्वच्छता अभियान
३) राजर्षी शाहू महाराज जयंती
४) क्रांतीदिन व जागतिक आदिवासी दिन
५) गुरूपौर्णिमा
६) विद्यापीठ नामकरण सोहळा
७) महात्मा गांधी जयंती
८) रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर
९) राष्ट्रीय एकता दिवस
१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाहण दिन
११) सावित्रीबाई फुले जयंती
१२) युवती सभा
१३) स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती
१४) स्वयंम शिका शिबीर
१५) राष्ट्रीय मतदार दिवस
१६) विद्यार्थी सुरक्षा अपघात योजना
१७) आर्थिक दुर्बल शिष्यवृत्ती
१८) रॅगिंग प्रतिबंध समिती
१९) महिला लैंगिक शोषण व तक्रार निर्वारण समिती
२०) व्यक्तिमत्त्व विका कार्यशाळा इ.

कार्यक्रम यावर्षी आयोजित करण्यात आले. सदर कार्यशाळांसाठी महाविद्यालयाचा प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेतर वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे विशेष सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव मार्फत विविध महाविद्यालयांमध्ये शिबीर, चर्चासत्रे, कार्यशाळा घेण्यात आलीत. त्यात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ते पुढीलप्रमाणे.

१) सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे दि. १९ ते २४ जून २०१८ रोजी विद्यार्थी विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
२) उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल येथे दि. ८.१०.२०१८ रोजी विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

३) अ.मा. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर येथे दि. ११.१०.२०१८ रोजी श्रमसंस्कार व्यक्तिमत्त्व नेतृत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४) आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी येथे युवतीसभा दि. १२.१०.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली. त्यात ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

५) विमलताई कला, विज्ञान महाविद्यालय, साक्री येथे १०.०१.२०१९ रोजी युवती सभा कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात ५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

६) सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे दि. १६.०१.२०१९ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात ०२ विद्यार्थीनी सहभाग घेतला.

७) स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला, विज्ञान महाविद्यालय, म्हसदी येथे जागतिक तापमान वाढ कार्यशाळा दि. २५.०१.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. त्यात ०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

८) डॉ. बी.आर. आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे आदिवासी विद्यार्थी जीवन कौशल कार्यशाळा दि. ३०.०१.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. त्यात ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

९) सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे रोजगार व मार्गदर्शन कार्यशाळा दि. २५ व २६ फेब्रुवारी २०१९ रोजी त्यात ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

*****

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१८-१९

**प्रा. प्रणव गरूड**

**कार्यक्रम अधिकारी**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ची सुरूवात दि. १५ जून २०१८ रोजी झाली. आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे रा.से.यो. एकक १९९६ पासून कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी रा.से.यो. एककात नियमित १५० व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरासाठी ७५ विद्यार्थी स्वयंसेवकांची मान्यता मिळाली होती.

दि. २६ जून २०१८ रोजी प्रथम सत्र आरंभानंतर रा.से.यो. एकक अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. एककासाठी बैठक झाली. यामध्ये वर्षभरात राबवण्यात येणारे उपक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराविषयी वैचारीक मंथन झाले. त्यानुसार वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

दि. २ ऑगस्ट २०१८ रोजी उद्घाटक मा.डॉ. राजेंद्र जाधव जिल्हा समन्वयक धुळे यांच्या शुभहस्ते रा.से.यो. एककाचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान उन्हाळी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. रा.से.यो. स्वयंसेवक त्यात सहभागी होते.

दि. २९ ऑगस्ट २०१८ रोजी रा.से.यो. एककामधील विद्यार्थीनी स्वयंसेविकांनी निजामपूर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन सामाजिक बांधिलकीच्या नात्याने तेथील अधिकारी व कैद्यांना रक्षाबंधन केले. मंजु गुप्ता फाऊंडेशन मुंबई यांच्या वतीने रा.से.यो. स्वयंसेवकांसाठी रोजागाराभिमुख प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले गेले. महाविद्यालयात २४ सप्टेंबर

२०१८ ररोजी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. के.डी. सोनवणे यांच्या उपस्थितीत रा.से.यो. वर्धापन दिन साजरा झाला. दि. १० ऑक्टोबर २०१८ रोजी म.गांधी जयंती सप्ताह निमित्ताने दत्तक वस्तीतील परिसर स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. दि. १७ ऑक्टोबर २०१८ रोजी गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्या वतीने आयोजित म. गांधी विचार व संस्कार परीक्षेचे महाविद्यालयात आयोजन झाले. त्यात चार प्राध्यापक व ६९ विद्यार्थी सहभागी झाले. सदर परीक्षेत प्रा. प्रविण मोरे व द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थीनी कु. अश्विनी अविनाश जाधव यांनी धुळे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला.

दि. २१ डिसेंबर २०१८ ते २७ डिसेंबर २०१८ या दरम्यान महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर दत्तक गावी मौजे टिटाणे साक्री जि. धुळे येथील जिल्हा परिषद शाळेत संपन्न झाले.

दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा शहीद जवानांना रा.से.यो. एककाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रा.से.यो. एककातील स्वयंसेवक विविध शिबीरांसाठी पाठविण्यात आले. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनातून रा.से.यो. एककाचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड्. शरदचंद्रजी शाह यांची प्रेरणा व मार्गदर्शन यातून महाविद्यालयत रा.से.यो. एककाची यशस्वी वाटचाल चालली आहे.

*****

# Report of National Seminar on Revised Assessment and Accreditation Framework of NAAC 27 January, 2018

**Prof. A.S. Meshram**
**Organizing Secretary**

**Inaugural Function -**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and Nijampur-Jaitane Shikshan Prasarak Mandal's Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane organized one day national level workshop on Revised Assessment and Accreditation Framework of NAAC held on 27 January, 2018 for affiliated colleges. The workshop was conducted into three sessions. The workshop was inaugurated at the auspicious hands of honourable chief guest Prin.Dr. R.T. Deshmukh from Aurangabad. He is renowned educationist and expert in NAAC process. Hon'ble Adv. Sharadchandra Jagannath Shah, President, Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane presided over inaugural session. Dr. Dharmadhikari Nagnath, Dr. P.P. Sharma, Prin.Dr. A.P. Khairnar, Shri. Dashrat Narayan Jadhav, Shri. Dattatray Jagannath Wani, Shri. Suhas Vishnudas Shah, Shri. Ajitchaandra Jagannath Shah, Shri. Nitin Manilal Shah were present as chief guests for the inauguration ceremony. The Principals, IQAC coordinators, teachers and various stakeholders from various colleges were present in the National Level Workshop.

Prin.Dr. A.P. Khairnar delivered introductory note in inaugural ceremony. He

focused on revised NAAC processs and presented the overviews of the workshop.

Hon'ble. Adv. Sharadchandra Shah delivered the speech on challenges before rural and tribal colleges. He also said the college organizes such type of workshops to improve the quality. He appreciated the efforts of the college for organization of national workshop on such relevant issues like revised framework of NAAC. Further he said that this workshop should inspire the colleges to achieve its academic as well as administrative excellence.

Organizing Secretary of the workshop Prof. Atish Meshram did anchoring and Joint Organizing Secretary Prof. Priyanka Sulakhe expressed vote of thanks. Prof. Ingle introduced the honorable guests in the inaugural function of the workshop.

**First Session -** The first session was chaired by Dr. D.L.Torawane from S.G. Patil College, Sakri, Prin.Dr. R.T. Deshmukh from Aurangabad conducted first session in which he pointed out challenging metrics in this framework for Rural colleges and NAAC criteria. The first session anchored by Prof. Atish S. Meshram.

**Second Session -** In the second session, eminent resource person Dr. Dharmadhikari Nagnath from Pune spoke on detailed procedure in the framework of seven criteria of NAAC. He discussed on the specific issues related to assessment and accreditation process for affiliated colleges. He also guided on Information Communication Technology based courses, services, facilities and resources adopted by the colleges for quality enhancement and sustenance. The chairperson Dr. S.R. Jadhav from Chalisgaon college remarked positively on the speech of Dr. Dharmadhikari Nagnath. He also added the relevance of NAAC for colleges and universities. The second session anchored by Prof. Priyanka Sulakhe.

**Third Session -** In the third session, eminent speaker Dr. P.P. Sharma, Vice-Principal, Muktanand College, Aurangabad delivered speech on various aspects and documentation of revised framework of NAAC. He explained deeply the procedure of uploading the necessary documents on given website by the NAAC in particular format. The third session anchored by Prof. A.R. Ingle.

**Valedictory Session -** Valedictory function was held under the chairman of Dr. P.S. Sonawane from Vimalbai Arts and Commerce College, Sakri. The total delegates in the workshop were 140 from various colleges who came from various district and state. The six delegates gave remarks about workshop.

While addressing the concluding session Principal Dr. A.P. Khairnar stated that such kind of workshops serve as the inspiring platform for the affiliated colleges which are undergoing NAAC process. He expressed satisfaction for the grand success of workshops. Dr. A.P. Khairnar would like to thanked all the advisory committee members and organizing committee members for encouraging and guiding the paarticipants too. The workshop was ended with "Jan! Gan! Man!".

The college expressed gratitude to North Maharashtra University, Jalgaon for providing funds for the workshop and also expects the same cooperation in future.

*****

## युवती स्वयंसिद्धा कराटे शिबीर

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१८-१९

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवती सभा अंतर्गत आठ दिवसीय स्वयंसिद्धा कराटे प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा.चौधरी, प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा. रामा हटकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, विद्यार्थी विकास विभागप्रमुख प्रा.के.डी. सोनवणे, माजी युवती सभा प्रमुख डॉ. व्ही. जी.गुरव, प्रा. वाय.आर. कुलकर्णी, युवती सभा समन्वयक डॉ. प्रियंका सुलाखे इ. मान्यवर मंचावर उपस्थित होते. शिबिराची सुरुवात प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा.चौधरी, प्राचार्य डॉ.अशोक पी. खैरनार, प्रमुख अतिथी प्रा. रामा हटकर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करुन केली. शिबीरासाठी उपस्थित मान्यवरांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. प्रियंका सुलाखे यांनी केले. प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा. रामा हटकर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांचे स्वागत डॉ. व्ही.जी. गुरव यांनी केले. आठ दिवसीय शिबिरासाठी लाभलेले प्रशिक्षक श्री. रामा हटकर यांनी कराटे, त्याची कौशल्ये व दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग व त्यातून करता येणारे स्व-संरक्षण या बद्दल विद्यार्थीनींना मार्गदशन केले. तसेच प्रमुख अतिथि म्हणून लाभलेले प्रा.चौधरी यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, आजच्या काळात मुलींनी रक्षणासाठी दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःचे संरक्षण स्वतःच करणे शिकायला हवे. प्रा. के.डी. सोनवणे यांनी रोज करणाऱ्या कामातून महिला कशी सक्षम बनू शकते यावर प्रकाश टाकला तसेच कोणतेही काम आत्मविश्वासाने करावे असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मा.प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले कि, महिला सबलीकरण हि काळाची गरज आहे. महाविद्यालयात राबवलेल्या विविध उपक्रमांतून महिला सक्षमीकरण केले जाते. मुलींनी या प्रत्येक संधीचा फायदा घेणे महत्वाचे असते. याच्याच माध्यमातून महिला स्वयंसिद्ध होऊ शकते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.अशोक पी. खैरनार यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. प्रियंका सुलाखे यांनी केले.

आठ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. २२/०१/२०१९ ते २९/०१/२०१९ या दरम्यान सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत करण्यात आले होते. या आठ दिवसात प्रशिक्षण श्री. रामा हटकर यांनी कराटेतील punches, kicks self defense शिकवले.

दि.२९/०१/२०१९ रोजी प्रशिक्षण शिबिराचा समारोप करण्यात आला होता. समारोपासाठी प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा. रामा हटकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, विद्यार्थी विकास विभागप्रमुख प्रा. के.डी. सोनवणे, माजी युवती सभा प्रमुख डॉ. व्ही.जी. गुरव, युवती सभा समन्वयक डॉ.प्रियंका सुलाखे इ.मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा. रामा हटकर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांचे स्वागत डॉ. व्ही.जी. गुरव यांनी केले. प्रशिक्षक रामा हटकर यांनी खेळातून व्यावसायिक दृष्टीकोनातून असणाऱ्या संधी याबद्दल मार्गदर्शन तसेच आयोजनाबद्दल मनोगत व्यक्त

केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मा.प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी केले व समारोप, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.प्रियंका सुलाखे यांनी केले.

*****

## सांस्कृतिक कार्यक्रम

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१८-१९

**प्रा. अजबराव इंगळे**

**अध्यक्ष, सांस्कृतिक समिती**

आदर्श कला महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सांस्कृतिक समितीमार्फत खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**सांस्कृतिक कार्यक्रम -** दि. ३१ जानेवारी २०१८, शुक्रवार रोजी पारितोषिक वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कला अविष्कार सादर केले. विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे आणि खानदेशातील लोककलांचे दर्शन त्यांच्या विविध कला प्रकारातून दाखवून दिले. स्त्रीभ्रुण हत्या नृत्यातून, शेतकरी आत्महत्या मुक नाट्यातून, सोशल मिडीयाचा अतिरिक्त वापर नाटकातून अशा विविधांगी विषयाला आपल्या कला प्रकारातून उजाळा दिला. एकूण ५५ विद्यार्थ्यांनी त्यांच्या २५ कला प्रकारमधून श्रोत्यांचे मने जिंकले. सांस्कृतिक महोत्सवाचे कार्यक्रमाचे उद्‌घाटनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड्. शरदचंद्र शहा होते. सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे परिक्षण सामाजिक कार्यकर्ते श्री. जगदीशचंद्र शाह, प्राथमिक शिक्षिका नम्रता बागले यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये राकेश ठाकरे यांच्या रिमिक्स नृत्याला पहिला क्रमांक आणि सुवर्णा इंगळे आणि कु. सुषमा सुर्यवंशी यांना अंबाबाईचा गोंधळ सादरीकरणासाठी दुसरे तर कु. कल्पना गवळी व तिच्या गृपला पावरी नृत्यासाठी तिसरे पारितोषिक मा. प्राचार्य महोदय यांच्या हस्ते देण्यात आले. उत्कृष्ट सादरीकरणासाठी मुलांमधून मयुर गवळे आणि मुलींमधून सुवर्णा इंगळे यांना देण्यात आले. सर्व कला प्रकारांपैकी आदिवासी नृत्य हे विशेष आकर्षणाचे केंद्रबिंदु ठरले. खानदेशी भागाची आणि आदिवाससी भागाशी नाळ आपल्या कला प्रकारातून विद्यार्थ्यांनी ताकदीने दाखवून दिली आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. पारितोषिक वितरण सोहळा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशवंत कुलकर्णी तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन समितीचे प्रमुख प्रा. अजबराव इंगळे यांनी केले.

**युवारंग २०१८-१९ मध्ये सहभाग -**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव व श्रीमती नर्मदाबाई नागो चौधरी कला आणि विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवारंग २०१८-१९ महोत्सवात महाविद्यालयातील एकूण १४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यात १० मुली आणि ०४ मुले सहभागी होते. या विद्यार्थ्यांची महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समितीने सांस्कृतिक गुणांची चाचणी करून त्यांची निवड केली.

युवारंगमध्ये सादर झालेला कला प्रकार आणि सहभागी विद्यार्थी खालीलप्रमाणे.

**१) समूहगीत -** राधिका वाघ, पूजा भदाणे, सुवर्णा इंगळे, अश्विनी गवळे, सहकार्य कासार सर, पवार सर.

**२) लोकनृत्य -** आरती गोसावी, सुवर्णा इंगळे, गायत्री राणे, कल्पना गवळी, सुषमा सुर्यवंशी.

**३) मेहंदी -** कु. दिपाली मोहने, साथीदार - राधिका वाघ.

**४) वक्तृत्व -** अश्विनी जाधव

**५) रांगोळी -** अश्विनी वाघ

**६) भारतीय लोकगीत (भारूड) -** राकेश गोरख

**७) फोटोग्राफी -** आकाश महिरे

**८) मुकनाट्य -** राकेश ठाकरे, मयूर गवळे, पूजा भदाणे, गोविंद धर्मा, सुवर्णा इंगळे

युवारंगमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला प्रकारपैकी भारूड झाली बाई मी वेडी हे एकनाथाचे लोकप्रिय भारूड (भारतीय लोकगीत) आणि समूह गीत याला प्रोत्साहन पर पारितोषिके मिळाली. पुरूष संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. अजबराव इंगळे आणि महिला व्यवस्थापक प्रा.डॉ. प्रियंका सुलाखे यांनी काम पाहिले. सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर बंधूंचे सहकार्य यासाठी लाभले.

*****

## विद्यापीठस्तरीय एकदिवसीय युवती व्यक्तीमत्त्व विकास चर्चासत्राचा अहवाल

## शै.वर्ष २०१८-१९

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय युवती विद्यापीठस्तरीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्र दि. ५/१/२०१९ शनिवार रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राची वेळ ९.०० ते ५.३० ठेवण्यात आली होती. यात चार सत्रांचा समावेश करण्यात आला होता. प्रथम, दुसऱ्या, तिसऱ्या सत्रात विद्यार्थिनींना प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले व चतुर्थ सत्रात विद्याथिर्नींनी पेपर वाचन केले. या चर्चासत्रात १०५ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय युवती विद्यापीठस्तरीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. बाबासाहेब ॲड. शरदचंद्रजी शाह यांनी स्वीकारले. चर्चासत्राच्या उद्घाटनाचे सूत्रसंचालन डॉ. प्रियंका सुलाखे यांनी केले. या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. नंदा वसावे उपस्थित होत्या. चर्चासत्राची सुरुवात चर्चासत्राचे अध्यक्ष मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह, उद्घाटक प्रा. नंदा वसावे, प्रमुख अतिथी सौ.प्रमिला अहिरे व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून केली. चर्चासत्रासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचा परिचय प्रा. के.डी. सोनवणे यांनी केला. चर्चासत्राचे अध्यक्ष मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह यांचे स्वागत मा. प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी केले. उद्घाटक प्रा. नंदा वसावे, प्रमुख अतिथी सौ. प्रमिला अहिरे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. के.डी. सोनवणे तसेच मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत मा. प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी केले. संयोजक डॉ. प्रियंका सुलाखे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांचे स्वागत यांनी केले.

चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी केले. उद्घाटकिय भाषण प्राचार्य प्रा. नंदा वसावे यांनी केले. चर्चासत्राच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय भाषण मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह यांनी केले व आभार डॉ. प्रियंका सुलाखे यांनी व्यक्त केले.

११.०० वा. चर्चासत्राचे प्रथम सत्र सुरु झाले. या प्रथम सत्राचे अध्यक्ष प्रा. राजश्री पाटील होत्या व प्रमुख वक्त्या प्रा. नंदा वसावे होत्या. आत्मविश्वास आणि युवती या विषयावर प्रा. नंदा वसावे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. त्यांनी वेगवेगळ्या प्रश्नातून विद्यार्थिनींचा आत्मविश्वासाचा स्तर तपासला आणि स्वतः मधील आत्मविश्वासाचा स्तर किती आहे तो कोणत्या मार्गाने ओळखावा याबद्दल मार्गदर्शन केले.

आत्मविश्वास वाढवण्यासाठी सकारात्मक विचार, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे, स्वतःतील कमतरता शोधणे याचा वापर करायला हवा. तसेच आपल्या चालणे, बोलणे आणि बसणे यातून आपला आत्मविश्वास दिसतो असे सांगितले. अध्यक्षीय भाषण प्रा.राजश्री पाटील यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन जगदाळे पुनम, आभार पवार दक्षता हिने व्यक्त केले.

१२.०० वा. चर्चासत्राचे दुसरे सत्र सुरु झाले. या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा.नंदा वसावे होत्या व प्रमुख वक्त्या डॉ.वसुमती पाटील होत्या. युवती व्यक्तिमत्व विकास व त्याचे विविध पैलू या विषयावर डॉ.वसुमती पाटील यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण प्रा.नंदा वसावे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन मोहने दिपाली, परिचय जाधव दिपाली व आभार खैरनार रोशनी हिने व्यक्त केले. दुपारी ठीक १.०० वाजता स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

ठीक १.३० वा. चर्चासत्राचे तिसरे सत्र सुरु झाले. या तीसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा.उर्मिला मोरे होत्या व प्रमुख वक्त्या प्रा. मीनाक्षी ठाकरे होत्या. युवतीच्या समस्या व व्यक्तिमत्व विकास तसेच चिंता व ताणताणाव या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण प्रा. उर्मिला मोरे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन मोहने संगीता, परिचय जाधव जयश्री व आभार पाटील रोशनी हिने व्यक्त केले.

ठीक ३.०० वा. चौथे सत्र आयोजित करण्यात आले. चौथे सत्र हे पेपर सादरीकरणाचे होते. पेपर सादरीकरणाकरिता १. महिला व नेतृत्व २. समाजपरिवर्तन व महिला ३. मुलगी वाचवा, मुलगी शिकवा ४. स्त्री आणि राजकारण ५. युवतींचा व्यक्तिमत्व विकास हे विषय देण्यात आले होते. विद्यार्थिनींने अनुक्रमे या विषयावर ppt ने पेपर सादरीकरण केले. या पेपर सादरीकरणाचे पंच डॉ. वसुमती पाटील व अध्यक्ष प्रा. के.डी. सोनवणे होते. यातून अनुक्रमे तीन उत्कृष्ठ पेपर वाचकांना गौरवचिन्ह देण्यात आले. या सत्राचे अध्यक्षीय भाषण प्रा. के.डी. सोनवणे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन मोहने वर्षा, परिचय सोनवणे मयुरी व आभार जाधव भाग्यश्री हिने व्यक्त केले.

